UNIVERSAL
LIBRARY
OU_184423
UNIVERSAL
LIBRARY

OUP—43—30-1-71—5,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M923.1 S48J Accession No. M1669

Author जोशी, शंकर नारायण.

Title शिव-चरित्र - साहित्य. 1930.

This book should be returned on or before the date last marked below.

श्री

भारत-इतिहास-संशोधक मंडळ

पुरस्कृतग्रंथमाला क्र. २४

शिवचरित्र-साहित्य

खंड ३ रा.

संपादक—

रा. रा. शंकर नारायण जोशी,

रा. रा. गणेश हरी खरे.

मुद्रक व प्रकाशक—

रा. रा. शं. न. जोशी, 'चित्रशाळा प्रेस' १०२६ सदाशिव पेठ,
पुणें शहर'

Post Graduate Library
College of Arts & Commerce O

शा. १८५२] किंमत ३ रु. [इ. १९३०

प्रस्तावना.

शिवचरित्रसाहित्याच्या या तिसऱ्या खंडांत ले. ३९८ ते ६७४ म्हणजे २७७ कागद प्रसिद्ध केले आहेत. पत्रें प्रसिद्धीस येण्यापूर्वी पुढील सात गोष्टी कराव्या लागतात. (१) कागदांचा पत्ता लावणें (२) कागद मालकांकडून मिळविणें. (३) नकला करणें व रुजू पाहणें (४) तारखा ठरविणें (५) कालानुक्रमानें लावणें, दुबार असलेले कागद काढून टाकणें किंवा संक्षेप करणें, टीपा देणें आणि प्रेस कापी तयार करण्यासाठीं करावी लागणारीं इतर कामें करणें. (६) प्रुफें तपासणें (७) व सूची करणें. या सात गोष्टींपैकीं पहिलीं तीन कामें आम्हीं केलेलीं नाहींत.पुढील ४ कामें बहुतेक आम्हीं केलीं आहेत. कांहीं फार्मांचीं प्रुफें तपासतांना व सूची लिहितांना श्री. दि. वि. काळे एम्. ए. यांची मदत झालेली आहे.

शिवचरित्रसाहित्याच्या पुस्तकांत शिवोत्तरकालीन कागद आलेले पाहून वाचकांस आश्चर्य वाटेल. पण कागद घराणेवार मिळतात, व सोय, एकसूत्रता, वगैरे दृष्टीनें कै. राजवाडे यांनीं घातलेल्या पद्धतीप्रमाणें ते घराणेवार छापणेंच युक्त असतें. यामुळें अशा पुस्तकांत शिवोत्तरकालीन कागद येणें अपरिहार्य आहे.

इतर खंडाप्रमाणें याहीं खंडांतील कांहीं कागद अस्सल तर कांहीं नक्कल आहेत. आंतील माहितीमुळें कांहीं कागद संशयास्पद ठरतील. याद्यांतिल मित्या व वंशावळींतील पुरुष हे नेहमीं बरोबरच असतात असें नाहीं. पण प्रत्येक कागदाची चिकित्सा करून त्यातून इतिहास काढणें हें काम कालावधीचें, विशेष कुशलतेचें व खोल अभ्यासाचें आहे. तितकी सवड नसल्यानें मूळ कागद मिळाले त्या स्वरूपांत वाचकांपुढें ठेविले आहेत.

पुस्तकास शेवटीं सूचि जोडलेली आहे. त्याबरोबरच, छापलेलीं पत्रें किंवा लेखांक कोणी कोणास उद्देशून व कशासाठीं लिहिले त्याचीहि स्वतंत्र यादी देणें फायद्याचें होईल. आणि ' शिवकालीन-पत्र-सारसंग्रह ' त्या ग्रंथांतील सर्वहि म्ह. २३४० लेखांक अशा प्रकारेंच छापलेहि आहेत. फरामीन्-उस्-सलातीन् त्या फारसी पुस्तकांतहि हा प्रकार अवलंबिला आहे. त्याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथांत करावयाचें. परंतु, त्यांतील लेखांक कालानुक्रमानें पण घराणेवार छापले असल्यामुळें शिवाय तशी यादी देणें तर तीहि पुनः लेखांकानुक्रमानें देण्यापेक्षां पाठविणाराच्या नामानुसार अकारादिक्रमानें देणें इष्ट असल्यामुळें नुसती तशी यादी देण्याची तितकी आवश्यकता नाहीं.

यांतील निरनिराळ्या घराण्यांतील कागद कोणी दिले व कोणी संशोधिले हें अनुक्रमणिकेवरून दिसून येईल. यापैकीं ३-६ प्रकरणांतील पत्रें आज प्रसिद्धीसाठीं मिळण्याच्या कामीं रा. गो. स. सरदेसाई (रियासतकार) व ठाण्याचे रा. ल. वि. भावे यांनी

सहाय दिलें, याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहों. संशोधन करण्याबद्दल संशोधकांचें आभार मानणें ज्याप्रमाणें आवश्यक आहे, त्याप्रमाणें किंवा त्याहून जास्त ज्या मालकांनीं उदारपणें कागद दिले त्यांचे आभार मानणें युक्त आहे. ते उदारपणा दाखवितात म्हणून पूर्वजांचा बरा वाईट इतिहास उजेडांत येतो. तेव्हां इतरांनींहीं असाच उदारपणा दाखवावा येवढीच सप्रेम विनंति आहे.

भा. इ. सं. मंडळ, पुणें.
श्रावण शु. ५ शक १८५२

शंकर नारायण जोशी
गणेश हरी खरे

पुरस्कार.



श्रीशिवचरित्रसाहित्य खंड तिसरा हा मंडळाच्या पुरस्कृतमालेंत समाविष्ट होऊन प्रसिद्ध होत आहे. हा खंड श्रीशिवचरित्रकार्यालयाकडून श्रीशिवछत्रपतींच्या त्रिशतसांवत्सरिक महोत्सवानिमित्त जी ग्रंथावली प्रसिद्ध झाली, त्यांतीलच एक भाग आहे. आणि याच्या प्रकाशनाचा भार चित्रशाळेच्या चालकांनीं पतकरून श्रीशिवचरित्रसाहित्यप्रसिद्धीस मोठें साहाय्य दिलें आहे; याबद्दल मंडळातर्फे चित्रशाळेच्या चालकांचे आभार व्यक्त करणें आमचें कर्तव्य आहे.

श्रीशिवचरित्रसाहित्य या नांवानें स्वतंत्र खंड काढण्यास प्रारंभ केल्यापासून पुष्कळच तत्कालीन उपयुक्त कागदपत्रें हातीं येत आहेत. साधनप्रसिद्धीचा प्रवाह जों जों खोलावत व रुंदावत जातो तों तों तिच्या आधारानें ज्यांनीं इतिहास कथन केला पाहिजे आणि आम्हीं तसें करतों म्हणून ज्यांची प्रतिज्ञा असते अशांची परिस्थिति खरोखर अधिकाधिक कठिण होत जाते. पूर्वी बनविलेला वृत्तांत स्थळोंस्थळीं चिताडून, खोडून भग्न करावयाचा प्रसंग येतो आणि ज्यावेळीं हें नूतन साहित्य द्राक्षापाकवत् सहज सेव्य नसतें आणि नारिकेलपाकाप्रमाणें बहिःकठिण, व नीरस व रुक्ष असतें त्यावेळीं तें नारिकेलकवच फोडून आंतील मधुररसाचें सेवन करणें व करविणें हें अभ्यासाभावीं ज्यांच्या आवाक्याच्या बाहेरचें असतें त्यांनीं 'ह्या कवटयांत काय आहे ?' म्हणून उपहास करावा यांत आश्चर्य नाहीं. इतकेंच नव्हे तर 'द्राक्षेसुद्धां आंबट' म्हणून त्याचें सेवन न करतांच प्रौढी मिरविण्याचा खटाटोपहि कित्येकांस आवरत नाहीं.

मोघम आरोप करून जनतेच्या मनांत कालुष्य उत्पन्न करणें हें भलेपणाचें कार्य नाहीं. कोणी म्हणतो 'अहो, हें इनामांचे व वतनांचे कागद, तेव्हां त्यांत बनावटच पुष्कळ.'

आतां इनामाच्या व वतनाच्या खटपटींत लटपटीलाहि पुष्कळ अवसर असतो हें जरी खरें आहे तरी तेवढ्यावरून सर्व इनामी व वतनी कागद बनावट म्हणून त्यांचेकडे दुर्लक्ष्य करणें अशास्त्रीय व घातक आहे. बनावटपणांतहि पुष्कळ प्रकार करितां येतील. सर्वस्वीं अगदीं निखालस बनावट कागद आणि माहितगारीनें आणि सावधगिरीनें तयार झालेला बनावट कागद हे दोन्ही बनावट असले तरी त्यांस एका मापानें मोजणें प्रमाणशास्त्राचे नियमांस धरून होणार नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे इनामी व वतनी कागदांतहि अस्सल कोणते, बनावट कोणते आणि बनावट असतील ते कसल्या दर्जाचे बनावट याचाहि निर्णय करतां येतो, आणि मग सावधपणें या कागदांची विचिकित्सा करून त्यांतून इतिहासरचनेस उपयोगी असे विश्वसनीय माहितीचे कण गोळा करतां येतात. हें काम फार श्रमाचें व जोखमीचें आहे.

पण तें तसें आहे म्हणून सर्व इनामी व वतनी कागदांस नाकें मुरडून रद्द समजणें इतिहास-कारांना शोभणार नाहीं. या इनामी व वतनी कागदांत पुष्कळदा एकतर्फी मजकूर असतो हेंहि खरें. परंतु खाजगी वादांत सहजगत्या ज्या सार्वजनिक किंवा राजकीय बाबींचा उल्लेख-येतो तो विचारांत घेणें आणि त्याचा अवांतर पुराव्याचे जोडीनें निर्णयकर्मांत उपयोग करणें अवश्य आहे. असे उल्लेख एकतर्फी असण्याचा संभव बराच कमी असतो. या उल्लेखा-पेक्षांहि बलिष्ठ व विश्वसनीय पुरावा मिळेपर्यंत हेच उल्लेख प्रमाण समजणें योग्य होईल. तसेंच स्थळांचे वगैरेहि असेच उपयुक्त उल्लेख जमा करितां येतात. स्थळकाळनिर्णयाला या अशा उल्लेखांची मदत बिनमोल होते. मात्र इतिहासाचे कामीं सावधपणा कोठेंच विसरतां येत नाहीं

घराण्यांचे कागदांत घराण्यांबद्दलची माहिती असते ती जरा विचारानेंच पत्करिली पाहिजे. त्यांत एकतर्फीपणाला वाव पुष्कळ. तथापि महजर, निर्णयपत्रें यांचे मदतीनें सत्य-निर्णय करण्यास पुष्कळ साहाय्य होतें.

असो; तर याप्रमाणें विचार केला म्हणजे या खाजगी कागदांचाहि इतिहासविरचनेस केवढा उपयोग होऊं शकतो हें ध्यानांत येईल. आणि म्हणूनच ते प्रसिद्ध करण्याचें अगत्य. मिळेल तो कागद संशोधक छापतात असाही एक प्रवाद कोठें कोठें ऐकूं येतो. तसेंहि खरें नाहीं. कै. खरेशास्त्री यांनीं एकदा या भ्रमाचे निराकरणार्थ सांगितलें कीं ऐ.ले. संग्रहाचे १०।१२ खंड किंवा पांच सहा हजार पत्रें जमविण्यासाठीं सुमारें चारलक्ष पत्रें आपणांस चाळावीं लागलीं ! हाच अनुभव इतरांचाहि आहे.

असो. श्रीशिवप्रभूचा इतिहास श्रीशिवचरित्रसाहित्याचे प्रकाशनानें अधिकाधिक विश्वसनीय व निश्चित असा पुढें येत आहे आणि लवकरच जुने बखरी इतिहास रद्द होऊन नवा शास्त्रीय व सप्रमाण इतिहास जगापुढें येईल अशी आम्हांस उमेद आहे. जनतेकडून भरपूर प्रमाणांत कागदपत्रांचे रूपानें आणि द्रव्यरूपानें संशोधनास साहाय्य मिळेल असें आजपर्यंतच्या अनुभवावरून वाटतें.

श्रीशिवचरित्रकार्यालयांतील संशोधक, कागदपत्रांचे मालक, इतर साहाय्यक आणि मुद्रक यांचे पुनः एकवार आभार मानून पुरे करितों.

नागपंचमी १८५२ }

दत्तो वामन पोतदार.
चिटणीस भा. इ. सं. मंडळ, पुणें.

संक्षेप व त्यांचा खुलासा.

अ०—अजम

अजर०—अज रख्तखाने

अधि०--
अ-आद०— } —अधिकारियान

अ आ०—आनाम

आली०—आली शान

इस्कील०—इस्कील करील त्यासी आपापले महजबेची सौगंद असे.

इस्मी०—इस्मी व रस्मी

औलाद०--औलाद व अफलाद चालवीत जाणे

क०--कलमी व कदमी

क०--कसवे

कार०—कारकुनान किंवा कारकुनान हाल व इस्तकबाल

कु०—कुयरीच्या आकाराचा

कुल०—कुलबाब, कुलकानू

तुली-कुली०—खुली-दयाम दौल

रवा०—रवान

खुदा०—खुदायेवंद

चौ०—चौकोनी

चौधा०—चौधारियान

जमे०—जमे लवाजिमात

तालीक०—तालीक लेहून घेऊन असल परतोन देणे.

दर हर०—दर हर साल, ताज्या खुर्दखताचा-सनदेचा उजूर न करणें.

दाम०
द्याम० } —दाम दौलतहू

दि०—दिवाण

देमु०—देशमुख

देस०—देसमुखान

देशा०—देशाधिकारी

न०—नकदी व जिनसी

नक०—नकदियात

नक्त०—नख्तयाती

नजर०—नजर इनायत फर्माऊन

(नि).—अक्षर निराळें, (नपासून पुढचें)

प्रति०—'प्रतिपत्' नें आरंभ होणारा

प्रो—प्रमाणें

फा.—फारशी

ब.—बहुदळी

बजा०--बजानेब

बदा.--बदामी

बराए०—बराए मालुमाती खातिरेसी आणोनु

बाजे०—बाजे उजूहाती

बिदा०--बिदानंद

बिनाबरा०--बिनाबरा इल्तमेसी खातिरेसी आणून

म०--(नांवापाठीमागें) मलिक

म०—मजकूर

मशु०--मशुरल

मर्या.--' मर्यादे'नें आरंभ होणारी

मा०--मामले

माहा०--माहाल

माहा०माहासूल किंवा महसूल व नख्तयाती

मु०—मुकाम
मुकासा०—मुकासा अर्जानी जाला आहे
मुसलमान०--मुसलमान होऊन इस्लील करील त्यास मक्केची-मुसाफेची सौगंद असे
मो.--मोर्तब
मोक०—मोकदम
रा०--राजश्री
राज०--राजमान्य
शि.—शिक्का
लं. ब.—लंबवर्तुळी
वा०--वाटोळा
ष.—षटकोनी
ष. को.—षट्कोनी
साहरे.--साहरे कानूनात
सी.--सीमा
से०--सेकिन
हज०—हजरत
हद०—हदमहदूद घालून देणे
हरसाल०—हरसाल ताज्या खुर्दखताचा उजूर न करणे
हवा०—हवालदार
हाल०—हाल व इस्तकबाल
हुदे०—हुदेदारान
हुजूर०—हुजूर येऊन मालूम केले जे
हिंदु०—हिंदू होऊन इस्कील करील त्यास कासीत गाय मारलेचे पातक असे.
क्षत्रिये कु०—क्षत्रिये कुलावतंस

———

अनुक्रमणिका.

	प्रकरण	मालक	संशोधक	पृष्ठ
१	चांबळी-सरनाईक	नाना सरनाईक	कृ. वा. पुरंदरे	१–१९
२	पुरंदर-घेरा	,,	शं. ना. जोशी	४१४
३	नागोठणें-कुलकर्णी	मंडळ संग्रह व श्री. आबा चांदोरकर यांनीं नकललेले		२०
४	बावडेकर-अमात्य			३७
५	सातारा-शिर्के			५०
६	कुडाळ-देशमुख			५३
७	सासवड-बोकील	गोपिनाथ पांडुरंग पुरंदरे हिवरें	कृ. वा. पुरंदरे	५६
८	अकोलें-देशपांडे	टाकळकर देशपांडे पंचवटी नाशिक	,,	६०
९	संगमनेर-कुळकर्णी		शं. ना जोशी	७५
१०	सोंधें-सोंधेकर	सोंधेकर गोवें	द. वि. आपटे	८३
११	बोकडबाग-मुख्य सरदेसाई	मुख्य सरदेसाई-गोवें	,,	१०८
१२	मोरगांव-गोसावी	मोरेश्वर लंबोदर गोसावी मोरगांव	कृ. वा. पुरंदरे जोशी व काळे	१३४
१३	कारी-जेधे	नागोजीराव जेधे कारी	स. ग. जोशी	१८०
१४	इंदापूर-देशपांडे	श्रीनिवासराव देशपांडे-इंदापूर	कृ. वा. पुरंदरे	१९८
१५	मंगळूर-साटे	विठ्ठल दत्तात्रय घाटे अँड-मिनिस्ट्रेटिव्ह आफिसर नगर		२०४
१६	खर्डे-पीर			२०४
१७	शिलिमकर-देशमुख	पंढरिनाथ शिलिमकर	स. ग. जोशी	२०७
१८	शिवरे-पाटील	पाटील-शिवरे	कृ. वा. पुरंदरे	२०८
१९	पोढोढी- ,,	श्रीनिवासराव देशपांडे-इंदापूर	,,	२१२
२०	बोरी- ,,		,,	२१३
२१	रहाटवडे-चोरघे		,,	२१४
२२	कोढीत-बढधे		,,	२१७
२३	खानापूर-कुळकर्णी	मंडळ संग्रह		२१८
२४	पेड-धनगर	,,		२२१
२५	कांदाट-मोरे	,,	कृ. वि. आचार्य	२२५
२६	बेलसरे-पाटील	,,	कृ. वा. पुरंदरे	२३१

२७	शिराळे-देसाई	मंडळसंग्रह		२३५
२८	बेडसिंगे-पाटील		कृ. वा. पुरंदरे	२३७
२९	शिरसवडे-पाटील	श्रीनिवासराव	,,	२३७
३०	इंदापूर-देशमुख	देशपांडे-इंदापूर	,,	२३८
३१	काझड-पाटील		,,	२४०
३२	इंदापूर-काजी	मुलाणी असिस्टंट मास्तर इंदापूर	,,	२४३
३३	किरकोळ		,,	२५३

भारत-इतिहास-संशोधक मंडळ पुणें.

शिव-चरित्र-साहित्य खंड ३ रा.

१ चांबळी-सरनाईक.

ले. ३९८ | श. १५८६ ? इ. १६६४

—॥ द अखंडित लक्ष्मी राजमान्य राजश्री **निलोजी नीलकठराऊ** व **सकराजी नीलकठराऊ** व **विसाजी नीलकठराऊ** व **त्रिबक नीलकठराऊ** इनामदार देह ताा **कन्हेपठार** यासि **बापाजी नरसिगराऊ** व येसवतराऊ **सितोले** देसमुख **मोरो विठल** व **रामाजी गोविद** व **मुकुद कान्हो** देसपाडे पा **पुणा** दडवत व अनुकर्मे नमस्कार विनती उपरी तुमचा इनाम विताा देहाये **कन्हेपठार** व **नीरथड**

मौजे **चाबळी** कास टका १८ येक	मौजे **पूर** आबेपेड व तलिया खाले खाचर आहे	मौजे **जेऊरी** झो ..... रापी आहेत बिघे १०
मौजे **कोढत** खुर्द इनाम लावणी होती ते तहवेली करिता तुटले याचे टुकडे येक	मौजे **किकर्वा** कास रुके ८८॥	झोडोरा आबे पेडी

येणेप्रमाणे तुमचा इनाम आहे तुम्हापासी दिवाणीचे फर्मान व खुदखते होती त्या सनदा तुमचा भाऊ **सकराजी नीलकठराऊ** मौजे **चाबलीस** होते सन **आर्बामध्ये पेडीगावी-हून दौड मोगलाची जाली** ते वख्ती **सकराजी नीलकठराऊ** खेडेबाराचे डोगरी होते ते दौडेस सापडिले त्यापासी सनदा होती त्या (या) त्या सनदा गेलिया म्हणौउनु तुम्ही सागितले कलो आले तुम्ही आपणास बोलिल्लेस जे आपली सनद देणे तरी तुमचा इनाम देहाये मजकुरी जमीन व झाडोरा आहे तो तुम्ही खात आहा व तुमचे वडील खात आहेत तुमच्या इनाम जमीन कास त्याचा नख्त व महसूल व पायेपोसीया पटी व बाजेबाब व वेटी बेगारी पालनूक सालाबाद चालिले आहे तेणेप्रमाणे तुम्हास भोगवटा आहे तेणेप्रमाणे

आपली जमीन खाणे व झाडोराहि आहेत तो खाने तुमचा इनाम कारकीर्दी मलिक अंबर व हैबतखान व कारकीर्दी माहाराज साहेबू व कारकीर्दी हाली राजश्री राजे साहेबाचे इनाम चालिला आहे तेपे माफिक खाणे बहुत लिहिणे न लगे हे विनति यासि आम्हापासुनु अंतर पडो ने दु यासि आण श्रीकुलस्वामींची व आपले पूर्वजाची असे हे विनती

ले. ३९९ } { श. १५९६ कार्तिक शु. १०
स. १६७४ आगष्ट २९

श्री

शिवाजी राजे याणी पत्र निलो [महादाजी] निलकंठराव नाईकवाडी किले पुरंधर निजामशाही किला बलाकाऊन भोवता मुलूख मारून खडणी घेऊन होतो इनाम गाव किल्याखाली होता हाकदस्तुरी होती शाहाजी राजे याचा घरोबा फार होता त्याजवरून पत्र पाठविले जे दादो कोडदेव आम्हाजवळ वडिलीं ठेऊन दिल्हे होते ते मृत्ये पावले आता आम्ही निराश्रीत जालो तुमचे व आमचे वडिलाचा बहूत घरोबा स्नेह यास्तव किल्या आश्राने खाली मार्चीजवळ येऊन राहू तुम्ही सांभाल तैसी वर्तणूक करीत जाऊ ते समर्थ त्याणी उत्तर लिहून पाठविले की उत्तम आहे घर आम्ही किला तुमचा आहे दुसरा विच्यार नाही आपण यावे यैसा उत्तर येताच घरात स्त्रीस व जिजाबाईस सागून आपण पंचवीस हजार मावले व पागा घेऊन गडाखाली येऊन राहिले पावसाला येथे छावणी केली निलोजी निलकंठराव वडील व पिलाजी निलकंठराव मधवे व शकराजी नीलकंठराव धाकटे यैसे तिघे बंधू होते निलोजी निलकंठराव किल्याचा कारभार करीत होते शंकराजी नीलकंठराव रिकामेच घरी होते त्यास सिवाजी राजे याजपासी ठेविले सिवाजी राजे त्यास मानू लागले तेव्हा शंकराजी निलकंठराव याणी आपले मनोगत राज्यास येकांती सांगितले जे आमचे बंधू आम्हास वाटा देत नाहीत व काही कामकाज सांगत नाहीत आंनवस्त्र खाऊन आजपर्यंत होतो आता साहेबाजवल आहे किल्याची वतनी चाकरी माझा वाटा मजला देऊन तिजाई हिशाचे कामकाज माझे मजला सोपून द्यावे यैसी येकांती सागोन सिवाजी राजे याणी मांन्य केले काही चिंता न करणे तुमचा बदोबस्त करून देऊन यैसे कबूल करून जवल ठेविले नित्ये भोजन येके ठिकाणी करावे बहूत प्यारे त्याजवर राजे करीत होते इतकियामध्ये दिपवालीचा सण आला म्हणौन निलोजी निलकंठराव याणी शंकराजीस सागून पाठविले की तुम्ही उदैक सणास किल्यावर निरोप घेऊन यावे त्याजवरून शंकराजीने सांगून पाठविले की आम्हास येकटयास येता येत नाही राज्याचा प्यार आम्हावर बहूत आहे व शाहाजी राजे यांचा व आपला घरोबा बहूत होता त्याचे पुत्रास व स्त्रीस टाकून कैसे यावे यास्तव आलो नाही आपण आमचा मार्ग न पाहावा आम्ही येत नाही तेसमई त्यानी विच्यार केला जे खरी गोष्ट आहे येकटयास येता न य यास्तव त्यासहि बोलाऊन जिजाऊ व सिवाजी राजे आणि दाहावीस लोक मानकरी यास आमंत्रणे सागून घेऊन

यावे आम्ही साहित्य करितो म्हणौन निरोप आला त्याजवरून शंकराजी नीलकंठराव याणी राज्यास आर्ज केला जे उदैक सण दिपवालीचा आहे वडिलानी आपण यावे म्हणोन विनती केली यावयास निरोप पाठविला आहे यैसीयास आपण व जिजाबाईनी आगत्य यावे तेव्हा सिवाजी राजे यानी आनमान करून उत्तर केले जे आम्हास लोकास टाकून येता नये येथे आम्ही सण करू तुमचेच आहे तेव्हा शंकराजी नीलकंठराव निरोप घेऊन गडावर आले ते येत नाहीत म्हणौन सांगितले ते समई तिघानी विच्यार केला जे शाहाजी राज्याचा आपला श्रद्ध घरोबा आसता त्यास टाकून आपण सण करावा हे उचीत नाही यास्तव कुल लोकासुधा घेऊन यावे म्हणून शंकराजीस गडाखाली पाठविले शंकराजीने येऊन समस्त लोकासुधा चलावे म्हणून आर्ज केला बहूत आग्रह करून तयारी राज्याची करविली लोकासुधा जिजाबाई व सिवाजी राजे यास खिजमतगार चोपदार खासदार मावले लोक व पागेचे बारगीर पायउतारा करून गडावर घेऊन गेले जागोजागा लोक उतरविले राज्यास जिजाबाईस व मानकरी यास घरास नेऊन बहूत मोठा सन्मान करून तीन दिवस नाहाणे व भोजने केली लोकासुधा जेवणे घातली मोठा समारंभ केला बहूत आग्रह करून भाऊबीज करून जावे म्हणौन राहाविले प्रतिपदेस भोजने जाली रात्रीस निलीजी नीलकंठराव स्त्रीसुध्धा निद्रा कली पिलाजी व शंकराजी येकत्र होऊन मनसोबा केला जे राज्यास वर्तमान सागोन निलोजीस कैद करावे आणि आपणाकडे किला घ्यावा येकाने किलेदारी करावी आणि येकाने राज्याजवळ आसावे यैसा विच्यार करून राज्याजवल आले त्यास येकांती हे वर्तमान सागितले व पूर्वीहि शंकराजी नीलकंठराव याणी आपले खास बदोबस्ताविसी विनंती केलीच होती त्यावरून राज्यानी सला दिल्हा आणि पंचवीस बारगीर खासे खासे समागमे देऊन बेडी निलोजीच्या पायात घालावयास सागितली निरोप दिल्हा ते तिकडे गेले आणि मागे याणी विच्यार केला निलोजीच्या पायात बेडी घालून आल्यावर या उभयेताचे पायात बेड्या घालून आपण किला घ्यावा यैसा मनसबा करून दोन बेड्या तयार करून ठेविल्या त्याणी तिकडे जाऊन झोपेमधे दगा करून पायात बेड्या घालून कैद करून आले राज्यास वर्तमान सागितले इकडे राज्यानेहि बदोबस्त करून ठेविलाच होता वर्तमान यैकोन घेतले आणि बोलिले जे किल्याचा बदोबस्त आम्हासच करावा लागतो तुंम्ही त्याचेच पंक्तीस बसावे यैसे बोलोन दोघाचे पायात बेड्या ठोकून दिल्या तमाम दरवाज्यावर लोक आपले बसऊन बदोबस्ती केली त्याचे लोक व त्याच्या बायका गडाखाली लाऊन दिल्या वस्तभाव मालमता सर्व जप्त केली खजिना पुष्कल सापडला तीन दिवसपर्यंत तिघे भाऊ कैदत होते चवथे दिवसी बंद खुलास करून गाव इनाम देऊन समाधान केले वस्त्रे देऊन ठेविले पुरधराखाली आद्यापि नाईकवाडी आहेत †मि॥ शके १५९६ आनंदनाम संवछरे कार्तिक शु॥ १० हस्त आक्षर हरी नारायण सरनाईक निलकंठराव इनामदार मौजे चाबली.

† मिती लिहून खोडली आहे.

ले. ४००

श. १५९७ वैशाख व. ५
इ. १६७४ मे. ४

श्री.

मशहूरल अनाम राजश्री राघो भास्कर सरहवालदार व कारकून पा पुणा प्रती राजश्री संभाजी राजे शहूर सन खमस सबैन व आलफ मा निलोजी निलकंठराऊ व शंकराजी नीलकंठराऊ व विसाजी निलकंठराऊ व त्र्यंबक निलकंठराऊ यांसी मोजे चांबिली ता कऱ्हेपठार पा मजकूर येथें इनाम कास टका एक आहे त्यावरी तुम्हीं मिरास पटी पंचवीस होनू घालूनु पैका मागता म्हणऊनू कलों आलें तरी पा मजकुरावरी मिरासपटी घातली नसतां उगेच आपले भातेने पैके मागता हे कोण रवेश या उपरी त्यांस येक रुकेयाची तसवीस न देणें आजी ता त्याचे इनामास पेशजी रुका घेतला नाही व तसवीस लागली नाहीं पेस्तरहि तुम्ही मिरासपटी व हरयेक बाबे तसवीस न देणे ताकीद असे तालीक लेहून घेऊन असल परतून देणे छ १८ सफर [2]पो हुजूर [3]सही

१ श्रीशिवच रणी तत्पर त्र्यंबक सुत मोरेश्वर

रुजूसुरु
नीवीस

सुरुषुद

ले. ४०१

श. १५९७ वैशाख व. ५
इ. १६७५ मे ४

श्री

मशरल हजरत राजश्री राघो बलाल सुबेदार + + जुनर प्रती राजश्री संभाजी राजे दंडवत शहुर सन खमस सबैन व अलफ पुणें तरफेस मिरासपटी हुजरून तो (येक) दर घातलीच नाहीं मावलांवरी पटिया घातलिया त्या कारबारी देसमुख व देसकुलकर्णी व पाटील व गाऊकुलकर्णी यांवरी पटी घा (तली) कीं हकदक खातात व काहीं गुज्यासी करितात म्हणून त्यांसि मिरासीपटी घातली यैसीयासि इनामदारास पटी घ्यावयाची काये गरज आहे त्याहीमधें पुणें तर्फेस मिरासपटी घातली नसतां मा निलोजी नीलकंठराऊ व मा शंकराजी नीलकंठराऊ व मा विसाजी नीलकंठराऊ व त्रिबक नीलकंठराऊ याचा इनाम मौजे चांबली ता कऱ्हेपठार पा पुणां येथे कास टका इनाम येक आहे त्यासी मिरासपटी देणें म्हणून राघो भास्करें होनु २५ पचवीस लाविले आहेत म्हणून कलों आले तरी ज्या माहालास मिरासीपटी घातली आहे तेथें इनामदारास हिसाबीने घ्यावे यैसा तह केला आहे

१ श्रीशिवच रणी तत्पर त्र्यंबक सुत मोरेश्वर

---

१ आकार बहुदळी आहे.
२ 'पा हुजूर' निराळे वळणाचा
३ 'सही' त्याहून निराळ्या वळणाचा. ४ पाठीवर.

त्यास जे माहालीं मिरासपटीच घातली नाही तेथें इनामदारास पैके मागणे कोण गोष्टी त्याहीमध्यें नीलकंठराऊ यास पटी मागणें हे उचित नाहीं तरी तुम्हीं राघो भास्करास येक कागद लेहून देणें आणि त्यांचे वाटे नव जाये यैसी गोस्टी करणें माा नीलकंठराऊ याचे इनामास पेशजीहि तसवीस लागली नाहीं आणि हालीं राघो भास्कर पटी मागतो याबदल तुम्हीं त्यास बहुतवजाने लेहंन माा नीलकंठरायाचे वाटे नव जातीं त्यांचा बोभाट हुजूर न ये यैसी गोस्टी करणे छ १८ सफर तालीक लेहोनु घेउनु असल परतून मााइंलेपासी देणे छ१८ सफर पाा हुजूर सही

सुरु सूद — रुजू सुरु निवीस

ले. ४०२ } { श. १५९७ ज्येष्ठ शु. ३ इ. १६७५ मे १७

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री विसाजी निलकंठराऊ गोसावी यासी-पोष्य राघो बलाल नमस्कार विनती येथील कुशल जाणोंउनू स्वकुशल लेखन करणे विशेष गोसावी पत्र पाठविले ते पाऊन लिहिले प्रमाणे अभीप्राये कलो आला व मौजे चाबलीस इनाम कास टके १ येक आहे त्यावरी (इना) मती खडणी राा राघो भास्करे होनू २५ पचवीस घातले आहेतीं ते घेतेल न पाहिजेत म्हणोंऊनू गोसावीं लिहिले तरी गोसावींच्या लिहिल्या वरून राघो भास्कराचा मजमूदार मोरो निबाजीस रोखा लिहिला आहे यावरून ते पचवीस होनू घतलि दूर करविले असेती कलले असावे कृपा असो दीजे हे विनर्ती.

सेवक दामाजी रघुनाथ [राघो बळाठाचा मुलगा] नमस्कार विनती उपेरी गो याचे आज्ञेप्रमाणे तीर्थस्वरूपास सांगोनू मोरो निबाजीस पत्र घेऊनु पाठविले असे राघो भास्करे देह ठेविला मोठा घात जाहाला कलले असावे हे विनर्ती स्नेहास अंतर पडो न देण हे विनती.

ले. ४०३ } { श. १६१० पौष शु. ११ स. १६८८ डिसें. २३

नकल

महजरनामा बीहुजूर हाजर मजालसी प्रांत वाई विलायती सुभे दारूजफर विजयापूर बतारीख ९ रबिलावल सुा हजार १०९८ कारणे महजरनामा केला ऐसा जे मनाजी शंकर

नीलकठराऊ याचा इनाम व आंबराई कारकीर्दी दर कारकीर्दी चालत आला आहे गावगना परगणे पुणे बी ताा

इनाम	आंबराई गावगना
मौजे चांबळी ताा करपठार	ताा करेपठार
जमीन सेत सिवेची पांढर	मौजे किकवी ताा
हू ल कास टका १	निरथडी जमीन कास रुके
एकूण चाहूर चार	साडे च्यार ८४॥
मौजे चांबली	ताा
सेत कास रुका १	८१॥ बागाईत
येकुण बिघे ८१० मौजे	८३ जिराईत
जेजुरी तले पौा	
सेत बिघे ८५	८४॥ यकुण बिघे ८२२॥
सदरहूमधे आबराई आहे	मौजे नारायणपूर
त्यापो राज हिसा येक १	नजीक देऊल सेत
व इनामदार माार	बिघे तीस -।-
हिसा दोन २	सदरहु पौा आबे उतार
	होता राज हिसा यक १
	इनामनफर माार हिसा दोन २

सदरहु प्रो इनाम व आबराई आहे कारकीर्द निज्यामनमुलूक व आदीलखान व सिवाजी भोसले व इस्तकबिल मिर्जा राजा व बाजी सफीखान दिवाण व घोरपडे जाहागीरदार मौजे चांबली याच्या सनदा होत्या तेणेप्रमाणे मनाजी माार इनाम व आंबराईचा ब साल खात होता ऐसियास नफर माार गनिमाकडे होता त्यावेली खाने आजम नाहारखान गोरी ईही कौल देऊन आणिला तो सिरवलास आला मागून काबिला आणाविला वाटेस येता आरवलीचे घाटी गनिमाने कुल बिसाती लुटून नेली नफर माा (र) जाहीर केले की त्या बिसातीमधे सनदा होत्या त्या गलिमाने लुटून नेल्या ऐसियास याचे भोगवटीयाचे गोही गावगना मोकदम व बाजे लोक यानजीक मनास आणिता गोही दिल्ही ती बीताा

तानाजी नाकवला मोकदम	
मौजे हरगुडे ताा.निरथडी	मडजी निगडा मोकदम मौजे
सुभानजी जाधव मोकदम	किकवी ताा निरथडी
मौजे परिंचे ताा निरथडी	चाहूजी व बावाजी
	व बालाजी व जानोजी
	कामथा मोकदम मौजे
	चांबली ताा करपठार

यानी गोही दिल्ही की मनाजी मौ माार याचा इनाम व आबराई सदरहूप्रमाणे चालत होते हलीहि चालत आहे आपणास दाखल असे सदरहू सनदाहि नफर माार मनाजीला होत्या

हे आपल्या वडलाचे जबानी ऐकले होते आपणहि पाहिले म्हणऊन सदरहू पाटील व कुलकर्णी याहि गोही दिल्ही हा महजर सहा

बी॥ देशपांडीये पा मार देहाये

नाहरखान गोडी देशमुख प्रा मार माहादाजी नामदेऊ हरकारे नामजाद हाजूर ठाणे वाई सदरहू नकलेची आसल रामचंद्र नारायण याजपासी आसे

ले. ४०४ } { श. १६१४ श्रावण शु. २
इ १६९२ जुलै ५

श्री

राजश्री गंगाजी नारायण सुबेदार व कारकून प्रांत पुणे गोसावी यांसि

—अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य——श्री संताजी घोरपडे सेनापति व कारकून दंडवत व नमस्कार सुा सलास तिसैन अलफ रा विसाजी [महादाजी] निलकंठ राऊ याणी विदित केले कीं प्रांत मारी आपला इनाम पूर्वापार चालत आला आहे

मौजे चाबिली ता कऱ्हेपठार जमीन कास १ टके

मौजे किकवी ता निरथडी जमीन कास रुके
८३ जिराइत
८१॥ बागाईत

८४॥

येणेप्रो कास जमीनीस येक टका साडेच्यार रुके चालिले आहे तेणेप्रो चालविले पाहिजे म्हणून त्यावरून हे पत्र लिहिले आहे तरी राजश्री कैलासवासी स्वामीपासून [म अ. शिक्का] सालाबाद ता साल गुा सदरहू इनाम चालिला असेल तेणें प्रो पेम्तर साल दरसाल चालवीत जाणें प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें प्रती लेहून घेऊनु आसेल परतोन देणें येविषीं राजश्री शंकराजीपंत सचीव यांचेहि पत्र निराळें आहे जाणिजे छ २९ रबिल हे[1] विनती.

विलसति ले
खना व
धि मुद्रा

---

१ या पुढील मजकूर निराळ्या वळणाचा.

ले. ४०५ } { श. १६१६ आश्विन शु. १०
{ इ. १६९४ सप्टेंबर १८

श्री

श्री
शंकराजी
नारायण

पत्र वतन सरंजामी राजश्री विसाजी निलकंठराऊ सभासद सेवक राजमडल सुा समस सितैन (तिसैन) अलफ माझले पुरातन राज्यातील से [व] क स्वामिकार्याचे येकनिष्ठ याकरिता राजश्री पत सचीव याही सरजामी केली वतन देखील चाकर सालिना होन पा।

१५००

येकूण दीड हजार होन रास

कदीम जाजती छ मा

१००० ५००

येकूण सालिना होन पधरासे रास केले आसे वजावटाव देऊन प्रा वजा करून उरले वतन पावेल चाकर हाली वतनाचे मोईनप्रमाणे हाजीर होतील त्या दिवसापासून हक पावेल कदीम वतन छ ७ सफर ता पावले छ मापासून कदीम व जाजती मिळोन पावत जाईल संदेश समक्ष
तेरीख ८ माहे सफर

सीमा

सफर सुरुसुद

बार

ले. ४०६ } श्री { श. १६१८ वैशाख शु. ९
इ. १६९६ एप्रिल ३०

राजश्री देशाधिकारी देशलेखक वर्तमान व भावी प्रांत पुणें गोसावी यांस

द अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—शेवक शंकराजी नारायेण सचीव नमस्कार सु- रसा सीत तिसैन अलफ रा निलो निलकंठराऊ व शंकराजी निलकंठराऊ व विसाजी निल- कंठराऊ व त्र्यंबक निलकंठराऊ सरनाईकवाडी किले पुरधर यापैकी विसाजी निलकंठराऊ यानी किले विचित्रगडचे मुकामी हुजूर विनती केली की आपले पिते राजश्री निलकंठराऊ येही मौजे जेजुरी ता कऱ्हेपठार प्रांत मजकूर येथे विर्हार करून अंबराई लाविली आहे तेथे जमीन कास रुका ८१ येक रुका याप्रमाणे चालत आली आहे वैशास आपल्या वडिलीहि

वा राज्यात सेवा बहूत केली आहे व आपणहि येकनिस्टपणें सेवा केली आहे पुढेहि करीत आहों तरी स्वामीनीं कृपालू होऊन सदरहू जमीन कास रुका येक देखील अंबराई इनाम करून दिल्ही पाहिजे म्हणून विनंती केली त्याजवरून मनास आणितां माारनिले या राज्यातील कदीम आणि सेवा येकनिस्टपणे केली आहे पुढेहि करीत आहेत याकरिता माारनिले याचें चालवणे जरूर म्हणून याजवरी कृपालू होऊन यास इनाम जमीन कास रुका येक देखील आबराई दिल्ही आसे तरी तुम्ही सदरहू जमीन येक रुका कासेची देखील अंबराई माारनिलेचे दुमाला करून यांस व याचे पुत्रपौत्रादि वंसपरंपरेने चालवणे प्रतां वर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें तालीक लिहून घेऊन मुख्यपत्र भोगवटिया निमित्य परतून देणे छ ८ शौवाल

श्री.
शंकराजी
नारायण

पत्रा+
वधिरयं
भाति

सुरु सुद वार

ले.४०७ } { श १६८२ आषाढ व. ५
इ. १७६० जुलै ३

श्री

चिरजीव राजश्री निलकठ माहादेव यासि बालाजी बाजीराव प्रधान आसिर्वाद उपरी येथील खुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष किले वज्रगड येथील सरनाईकी रा॥ माणको गंगाधर याची आहे त्यास रा॥ बापू सखाजी व शकराजी गणेश या उभयेतांचा विभागाचा कजिया होता याजकरिता किले मजकूरची सरनाईकी जप्त केली होती त्यास याची मनसुबी पचाईत मते होऊन बापू सखाजी खरे जाले व सकराजी गणेश खोटे जाले यास्तव किले मजकूरचे सरनाईकीची जपती मोकळी करून हें तुम्हास पत्र लिहिले असे तरी किले मजकूरचे सरनाईकीची चाकरी सुदामत प्रो माणको गंगाधर याचे हाते घेऊन वेतन पावावीत जाणे जाणिजे छ १९ जिलकाद सुा ईहीदे सितैन मया व अलफ

ले. ४०८ } { श. १६८२ आषाढ व. ५
इ. १७६० जुलै ३

श्री

राजश्री सटवोजी जाधव हवालदार व कारकून किले वज्रगड गोसांवी यांसि

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य —— श्री बालाजी बाजिराव प्रधान आसिर्वाद व नमस्कार सुहुरसन ईहीदे सितैन मया व अलफ किले माार येथील सरनाईकी माणको गंगा

+ आकार बहुदली

घर याजकडे आहे त्यास चाकरीस येत नाही यामुळे वेतन पावत नाही त्यास हाली नेहमी
श्री चाकरीस गावयाचा करार केला आहे तरी याचे हाते पूर्ववतप्रमाणे सेवा
राजारामनर घेऊन वेतन खासा व पोरगा देखील पेसजाप्रमाणे पावर्वात जाणे
पंती हर्षनाधान जाणिजे छ २९ जिल्काद पा हुजूर
चाळाजी बाजी
राव प्रधान

लेखन
सीमा

ले. ४०९ } श्री { श. १६९१ कार्तिक व. ८
इ. १७६९ नोव्हेंबर २१

अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्य राजश्री माणको मनाजी निलकठराव व बापू सखाजी निलकंठराव व शकराजी गणेश निलकंठराव गो

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार मुा सबैन मया व अलफ द्वारकाबाई कोम नारो नरसिंह निलकंठराव इणे हुजूर जेजुरीचे मुा येऊन विदित केलें की किले पुरधरचे सरनाइकीचे वतन निमे आपलें व निमे शंकराजी गणेश वगैरे सरनाईक याचें त्यास आपले वडील कर्नाटक प्रांती काही दिवस होतें उपरांत आपण चांबलीस आलों शंकराजीपंताचे तीर्थरूप गणेशपंत याचेच घरी राहिलो काही दिवस येकत्रहि होतो पुढे न बने सा निराले जालों तेव्हा वतनाचा व इनामाचा विभाग मागितला त्यासी शंकराजी गणेश थाक लागू न देत म्हणून आपण सातारियास दादोबा पुरधरें याजकडे गेलो याणी शंकराजी गणेश यास नेऊन ताकीद केली उपरांत ते चांबलीस येऊन मौजे विकवी तो निरथडी येथील इनाम जमीन आपणास दिल्ही ते पाच वर्शे आम्ही आनभविली त्यास किकर्वाकर साक्ष आहेत असे असता आलीकडे सदरहू जमीन शंकराजी गणेश याणी हिरोन घेतली आपले दोघे पुत्र होते तेहि मृत्यू पावलें नातू साहा वर्शाचा आहे तरी ताकीद होऊन माझा विभाग देविला पाहिजे म्हणून यैशीयास याचा विभाग वाजवी वाटणी प्रो न द्यावयास कारण काये येविसीचे वर्तमान मनास आणावें लागतें तरी पत्रदर्शनी निघून सरकारचा जासूद पाठविला आहे याजबरोबर जलद हुजूर जेजुरीचे मुकामास येणे दिरंग न लावणे जाणिजे छ २१ रजब आज्ञाप्रमाण

लेखन
सिमा

ले. ४१० } श्री { श. १६९३
इ. १७७१

राजश्री बालाजीपंत नाना गोसावी यांसि

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य ——श्री माहादजी सिंदे

दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष राजश्री विसाजी कृष्ण याणी हिंदुस्थानचे स्वारीत गिरमाजी मल्हार यास मेरठचें महाल सांगून लाख रुो रसद घेतली होती त्यापौ औसी हाजार रुो सरकारात माारनिलेचे राहिलें त्याची वरात बगाजी गंगाधर व विठल महादेव याजवर दिल्ही होती ते रुो उगवले नाहींत हाली सावकार यास तगादा करितात म्हणोन माारनिले याणी सागितले त्यावरून हे पत्र आपणास लिहीलें आहे तरी याचे यैवजाचा हरयेक जागा सोय करून द्यावी आथवा जागा लाऊन द्यावी म्हणजे हे उगऊन घेतलि[1] रा छ १४ मोहरम बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनती

श्री
जोतिस्वरूपच
रणी तत्पर राणो
जीसुत महादजी
शिंदे निरंतर

मोर्तब
सुद

ले. ४११ | श. १६९४ इ. १७७२

श्री.

हिसेबू एकदर खर्च परवाना इनाम मौजे चाबिली मुा गणेशपत व गगाधर मनाजी मुा किले खेलणा व पनाला सुा १११२ जमा रु.

पिलाजी निलकंठराऊ गुा गोपाल
१६ पाहिले ता तात्या
१०० हुडीचे भरतीस
७५ रोख ता तात्या
५० किता
२५ किता
७५
१९१

विसाजी निलकंठराऊ
३७ दाणे विकिले
३ कडबा विकिला
५० गुा मल्हार जोसी
९०

मनाजी शंकर गुा गगाधर
१५ घरीहून खेलणीयास जाता वाटखर्चास घेतले.
८६ पांडाहून पाठविले गुा राघो वासुदेव.
६१ गुा गणेशपत
२५ राघो वासुदेव
२३ गुा बहादूरखान
४ रोख

गणेशपंत
१ घरीहून वाटखर्च
६३ हुडीचे भरीस रुा ८१ पैकी वजा खेलणाहून हुंडी करून घरास पाठविले गुा वालकर वजा रुा १८ बाकी
६४
पैकी वजा रोख बाकी ता तात्या ११।॥ रुा गुा जानोजी कामथा

१ येथून अक्षर निराळें. २ येथून पुढील मजकूर त्याहून निराळे वळणाचा–सबंद पत्रांत तीन वळणें आहेत.

१९ बाबा बोडनिंबे
६ हुडीचे भरीस गुा गोमतीबाई
५ गुा गोमतीबाई
१५ हा केसो कावर
गुा रघुनाथभट १९ रुा

२३ हुडीस भरीस
१७ ता तात्या
४०
ठकार बा पळस टिके रुा १९ कर्ज गुा हाये
७७।= गुा नऱ्हावा नाईक
११२ गुा जानभट ढेरे
२५ गुा आतोबा
२१४।=

तेरीज
१९१ पिलाजी निलकंठराऊ
९० विसाजी निलकंठ
१५० मनाजी शकर
६४ गणेश शकर
४० जानोजी कामथा
१९ रघुनाथभट
२१४।= कर्ज

७६८।=
पैकी वजाबाकी ता तात्या रुा ११॥। बाकी रुा
७५६॥=
खर्च

बदल परवाना ३८४॥=
२६५।= अंताजीपत रुा ३००वजा
३० दहेला
४॥= सोडीविले

३४ ॥=
बाकी
११० बालकृष्ण मवाजनेनीस
रुा १२५ वजा
१२॥ दहेला
२॥ सोडिविले

१५
बाकी

९। किरकोल

५ बावाचार्ये

२ पुंडलीक मवाजना नीट करावयास

२ बालकृष्ण मवाजना काहाडावयास

-।- दफ्तरबंद

——

९।-

———

३८४॥≈

किरकोळ खर्च गुा गणेशपत

३७२

१०। जेजया वैगरे दुसाला

१ नरसा व राया जासूद

७४।- ब्याजे पडिली

२। वेणीचंद त्रीवाड

५५ पोखर हजारी

१७ कासीपत

——

७४।-

८ शिरपाव नऱ्हावा नाईक

२।≈ तोटा बा जानभट रुा १००

पैकी

३२ नकलेश्वर काजीची मोहर करायास

२ सिपारस मनसूरखान

१० समाराधना

१० कोंढाणियाखाले खर्च ताा तात्या

६७॥। रद कर्ज

३० आतोबा

३४॥। जानभट

३ नऱ्हावा नाईक

——

६७॥।

———

१९७॥≈

३। माला रुद्राक्ष ताा तात्या

-।- बदल नकल काजी ताा कासीपत

१ राघोपत मामास खर्चास दिल्हा

११०४≈ पोटखर्च पान सुपारी व धुलाई

१२ वाटखर्च तात्या

३ पेडगावीहून गावांस गेले

९ गावीहून परडियास व वीरेश्वर

पतापावे [कडे]

——

१२

१। गगाधर मनाजी

२५ जागीरदाराने खरीफावारी नेले

४ जागडा पुण्यास आन्याकडे पाठविला

तो नागविला त्यास दिले

१७॥ गडखर्च गुा तात्या

——

१७४।≈

———

३७२

———

ले. ४१२ } { ?

तीर्थस्वरूप राजमान्ये राजश्री
आन्या स्वामी वडीलाचे सेवेसी

बालके .....उपर वाईहून गंगाधराने व मनाजीपंती कागद पाठविले आहेत की तुम्हापासी परवाना आहे तो घेऊन येणे त्यावरून आणीक कागद नवा करून (घेता) त्यास चार्लास पनास + + खर्च पडतो तर तुम्ही पैका व परवाना घेऊन सत्वर येणे म्हणून दोनी तीन माणसे दो दिवसांत पा + + + यैसीयास परवाना माणसाबा पाठविता येत नाही धामधूम ये प्रकारची आहे + + ह्मा आपण खुदच घेऊन जावे बा येक माणूस पाहिजे व आपणास खर्चास पाहिजे व कागदास पडतो पुढे देऊन परंतु आपणास वेचास तूर्त पाहिजे गावात कोण्हास काही मागावे तर कुले नाहीत जे कुले आहेत ते तुमचीं आहेत पांच तिरुके तुम्हाकडे लागले याकारणे वडिलास लिहा आहे तर बालूबा खर्चास काही पाठविणे व मोरोपंतास पुसोन नवा कागद कोणे रजेने कागद तेथून करून घ्यावा तो मकोबा त्याच्या विदमाने करून बाद पडते पा करून सत्वर पाठवणे एक घडी विलंब न करणे खर्चसाठीं खोळंबा जाला आहे या कारणे बालू तुम्हापासी पाठविला आहे येथे उशीर लागला म्हणजे संग्रामखान ठाणियास फिरोन जेतील मग काम होत नाही तेथे आहेत तो ते भिडेने काम करून देतील तर बालूबा वेचाची व कागदाची बेगमी करून सत्वर सत्वर पाठवणे गडी ब रो गी यास परवानियाची तालीक दाखविली त्याचा मुर्शीफ आहे त्यास + + दिल्हे परंतु तो बेईमान आहे पुढे देणियास खलेल करणार आहे याकरिता आम्ही स्वार होऊन जातो तर देशपाडिया + + + + कागद कोणे तजविजेचा करून घ्यावा तो मकोबा करून पाठवणे वेचास न पाठवा तर आपण राहतो.....आहे तर आगडियास सेला..... पाठवणे.....

ले. ४१३ } श्री { ?

तीर्थरूप राजश्री गंगाधरपंत बापाजी वाडिलाचे सेवेसी

अपत्य बाबाने सिर सा नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान ता। माघ वहुल शष्ठी गुरुवार पर्यंत येथास्थित असे विशे[ष] येथे खोडगडे गुरव याणी कटकट माडिली आहे नारायेणा ये देउली इनाम तुमचा नाही याकरिता मोठासा कथला माडला आहे तरी पत्र पावताच येणे व आणिखी कितेक कामकाज आहे तरी पत्र पावताच शिवापूरचे मुकामी येणे अनमान न करणे बहुत काये लिहिणे हे विनती

ले. ४१४ } { १

श्रीगुरुगणेशायेगा

वेदमूर्ती विनायक गोसाई काका स्वामीचे सेवेसी

सो नागपुरीहून सुखानंद चा मस्तक ठेऊन गाणेशरित्या आनंत नमो नमो विज्ञापणा यैसा जे फार दिवस जाले आपनाकडोन पत्र येऊन वर्तमान समजल्यात न आले यैसे नमावे हरघडी आलिया मणृशाबरोबर पत्र द्वारा परामृष करीत असावा विशेष पेशजी इकडून सरमनाम पत्र पाठविले ते दादा वांकार याहाचे हस्ते प्रविष्ट जालेच आसेल पावतीचे उतर यावे म्हणून आपेक्षा त्याची पूर्ती व्हावी याविशी उत्कंठा धरून प्रत्योतर यावे याविशी सहसा आप्स नसावा दुसरे नाना तपस्वी यापासून गणेशतत्वरत्नाचे पुस्तक बाबास सांगून दादा वांकर (ओकार) याजला माझे नावचे पत्र देऊन प्रविष्ट करावे म्हणजे भाड्याचे पुस्तकाबरोबर मज प्रविष्ट होईल येथे त्याचे प्रत्यातर देऊन लौकरच मागती पुस्तक तुम्हास प्रविष्ट होईल याविशी निःसंशय होऊन बाबास तार्कीद करून पुस्त[क] पाठ[वि]ण्याचे करावे आजी आमचे मामा वेदमूर्ती आताभटजी लुले तुमचेजवळ राहिले होते त्यास आम्ही आल्या दिवसापासून त्याचे वर्तमान कागदपत्र ठेऊन समजले नाही त्यास मामा व रामाजीपंत बाबाला याचे वर्तमान साकल्ये त्याहावे हे विज्ञापणा

रा॥ येकनाथबावा याहाचे सेवेसी गणेशायेनमाहा उपरी कृपा लोभाची वृध्दी करीत आसावी हरीभाऊ येथे खुशाल आहेत मुले मानसे आनंदरूप आसेत आपलास कलावे हे गणेशायेनमाहा

चिरंजीव बाबा व बहीरबा यासी आसीरवाद

गाणपत्या श्री रावजी वाघ यासी आसीरवाद

सर्वत्र लहानथोर यासी गणेशायेनमाहा व आसिरवाद सागणे

गाणपत्या बंधुवर्ये रा॥ कृष्णाआपा यासी सा॥ नमस्कार सदैव कृपेची अभिवृध्दी होत आसावी

ती॥ स्वरूप रा॥ विनायेकभट काका व येकनाथबावा व कृष्णाआपा व राजी वाघ वगैरे सर्वत्र गाणपत्या मंडळीस वक्रतुंडाचा सा॥ नमस्कार विनंती यैसीजे सदैव कृपापत्री गौरव गाणेशरित्या करीत असावा फार काय लिहीणे हे विज्ञापना ता॥ छ २ शु॥ मार्गेश्वर रो॥ मंदवासर

ले. ४१५ } श्री { ?

२ किले पुरंधरच्या घेऱ्याची हकीकत

आसिर्वाद उपरी + + + + का घेऱ्याची माहितगिरी कसी असेल ते लेहून पाठवावे श्रीमंत राजश्री सखारामपंत बापू लग्न करावयासी गेले ते किकवीवरून अले त्याणी पुसिले त्यावरून लिहिले अहे तरी आपल्यास माहितगिरी फार आहे तर साकल्य कसे ते त्याहावे यावरून वडिलानी सांगितले त्याप्रमाणे व अलिकडे अपले कारकीर्दीस जाले ते लिहिले असे

पूर्वी नीलकठराव पुरधरी किलेदारी हकिमी सरनाइकी करून होते शाहाजी भोसले पातशाही चाकर व हेहि पातशाही चाकर पातशाहीमधे गडब(ड) होऊ लागली ते समई किल्यावरी नीलकंठराव खाले अमल शाहाजी भोसल्याचा तेयाचे साहित्य करीत व पातशाहाची अज्ञा शाहाजी भोसल्यास की पुरधरचे साहित्य करीत जाणे करी[त] असेत त्यांकडे खेडेबारे व रोहिडखोरे मावळचे फुटगाव व थोरले रुपे शाहाजी भोसल्याकडे पुणे देश सरकारांत त्यास भोसलेच फार कडून पुणे देसचा भोगवता घेत असेत शाहाजी भोसले इतबारी जाणून पातशाहानी चंदीकडे पाठविले दादाजी कोडदेव सिवाजी राजे सिवपुरी वरसाचे ठेऊन आपण चदीस गेले किल्याचे साहित्य करावे तो सिवाजी महाराजे लाहान दादाजी पंताचे काही चालेना कोली माहार मिलोन वाटा पाडू लागले किल्यास सरजाम जाऊ देईनात यैसे जाले किल्याची मोठी हालाखी जाली उपरी लोक होते ते उठोन गेले जवलिल गावचे होते ते दोनच्यार से राहिले किल्यास भरती नाही तेव्हा माहादाजी नीलकंठरायानी तजवीज करून कोली वाटा पाडितात त्यासी राजकर्ण करून कोली

१ ताम्हाणे कोली अवध्यांत वडाल त्यास बेलघाटी ठेविले
१ कालकुड नीगुड मेटी (ठेविले)
१ ढगारे बावचीचे मेटी ठेव (ले)
१ मिसाल जवळ टाकरास ठेवला
४

येणेप्रा चार नाइक्या करून दाहा दाहा दाहा अशा म्यानसी ठेविले वाटा पडेनाशा जाल्या किल्यास सरजाम येऊ लागला सिवाजी राजे लहानपणापासूनच त्याची बुध पातशाही अमल उठवावा पुडाई करावी ते किल्यासी घासो लागले कोली से पनास चाकर नीलकठरायानी ठेऊन मुलग मारावा किल्याची बेगमी करावी त्यास कोली बलावले ते म्हणो लागले आम्हास तुम्ही अणून ठेविले अम्हास सरकाची सनद करून द्या त्यावरून नीलकठरायानी पातशाहास लेहून सनदा कोल्याच्या नावाच्या अणिल्या त्यास दिल्हा तुम्हास नीलकठरायानी अणून मेटाच्या नाइक्या देऊन ठेविले त्याप्रा तुम्ही मेटी राहून किल्याची चाकरी नीलकठराव सांगतील त्याप्रा करून सुखरूप राहाणे ऐसी सनद अणून दिल्ही त्यावरी ताम्हाणे कोली याचे बुडाले त्यापासी चिन्हे जमातीत चाकर होते तेच मेटी राहून चाकरी करू लागले याप्रा च्यारी

किल्लियास आणून त्याचा गौर बहुत प्रकारे करून राजगडाखाले ताम्हाणे कोली मुख्य होते त्यास वस्त्रेपात्रे देऊन त्याणी चाकरी किल्याची करावी यैसे इमानप्रमाण करून ठेविले त्यास जागे नेमून दिल्हे

याउपरी शाहाजी भोसले चंदीकडे गेले पातशाहीची घालमेल जाली माहादाजी नीलकंठराव मेले सिवजी राजे बलावले त्याणी किला घेतला नीलकं(ठ)रायाची मुले माणसे उतरून पुणियास नेली बाजी घोलप सिवाजी माहाराजापासी होते बरे अकलवत शाहाणे माणूस जाणून किलेदारी सांगोन पुरधरी ठेविले ते किलेदारी करू लागले भोवताली घरे लोकाची त्याचे घरी लग्न मोहुर्त जाला तर पानाचा खाड व खोबरियाची वाटी गावकरानी न्यावी किल्लेदारास काही नाही तेव्हां घरा करार करावासा जाला भोवरगांव जमा करून घेरा किल्याकडे करावा यैसे कागद भोवरगावचे घेऊन जमान अमान राजिनामे घेऊन आपण निघालो देशमुख देशपांडे अणवी निघाला तो बेलघाटचे वाटेने खाले उतरोन तळवटी पुर अहे गांवचे दक्षणेस पेठेकडून वाट सासबगिरीकडे जाते ते वाटेने निघोन पूर डावे टाकिले ते समई पेट नवती सायेघाटाचे तळवटीहून हली धोडोबा अपानी विहीर खाटली आहे त्याचे दक्षणेस डोगर अेक आहे त्याच्या पायाने निघोन वरधोजी नाईक बेरडाची वहीवर गेले तेथून हली बेरड वज्रगडाखाले वाडीस राहाताते ते वाडीस जाऊन पुढे अडसरची वाट पानवडीकडे उतरते तिकडे जाऊन पानवडी हली जे पानवडीस धोडो अपानी घर बाधले ते वाडी डावी टाकून वर चढोन

नाइक्या करीत होते बेगले माहार कोल्या बराबर होते ते दाहाबारा महार बरे मर्द असेत त्यास किल्याचे दक्षणेस बावचीच्या मेटाखाली कालदरीच्या बहिरावचे उत्तरेस अदमध घरे बधोन राहावयास जागा दाखविली तेथे घरे बधोन नादत होते हली भिताडे त्याची अहेत.

या उपरी सिवजी राज्याचे प्राबल्य त्यास किल्याची अगत्य त्याचे कारकीर्दीस कोली अथवा महार गडावरी गेले नाहींत मेटीहून चाकरी करावी सकराजी नारायेणे यास सुरनिसी सांगितली पुणे देश त्यास दिल्हा सावोत्रा इनाम करून दिल्हा याप्रा चालत होते ते समई कोल्यानी घरा म्हणून घेतला नाहीं त्या उपर सिवजी राजे याचे अवतार समाप्त जाहाला नारो शंकर लहान संभाजी महाराजे धरून नेले मागे धणी कोणी नाहीं राजिक फार जाले मुलूक उजेड जाला किल्या वरील लोक नामजाद होते ते उठोन गेले त्रिबक सिवदेव सिचिवाचे मामा त्यास पुरधरी ठेविले पैसा मिलेना लोक मिलेनात गडावरील गस्त चालिली पाहिजे व सदरेस वेडा पाहिजे या करितां बेगले माहार गडावरी आणून संताजी बतदल येलदेकर यास नाइकी पहिलेच होती त्याची अलग होती ते जागा माहारास देऊन गडावरी ठेविले गस्तीची चूड धरावी व सदरेस वेडा आणून द्यावा गस्तीच्या असाम्या व वेडेकराची असामी करून दिल्ही कोली कोण्ही किल्यावर नवते याप्रो त्रिबक सिवदेव होते तो चालिले त्याचा काल जाला ते गेले पंताजी सिवदेव अले त्यापासी मुतालकीचा सिका त्याचे कारकीर्दीस कालदरीच्या बहिरावापासी गुरे मेली ते बेगल्यानी

बुधल्याचा डोगर डावा टाकून खाल्ती वाट उतरते ते वाटेने उतरून बहिरव डावा टाकून बेगल्याची घरे होती त्या अडसराने पालखी-चालोन हली कोडधयाची वाडी म्हणतात ते वाडी कालदरीची ते वाडी डावी घालून कुभोसीकडे मार्ग जातो ते वाटेने कुभासी कडे उतरले कुमवसी डावी पछमेस टाकून डोगराच्या तलवटे केतकल्यास अले केतकवले डावे पछमेस टाकून डोगर मधे लागतो तो चढोन अलीकडे उतरोन चिन्हे अपली वाडी म्हणतात ते वाडीवरून हली कोलीयानी देव अपला म्हणून देऊल बाधले त्या देवापासी अले त्या धोड्यास सेदूर लाविला तो देव अता जाला त्या देवापासून अडसर जातो त्या वाटेने पुरापासी येऊन किल्यावरी बइल घाडे गेले त्या दिवसांपासून घेरा जाला घेऱ्यात गडकरी याची घरे त्याचे घरी प्रयोजन जाल्यास किलेदारास खाड वा पानाचा व वाटी अणून द्यावा घेऱ्याचा पाटील किलेदार दुसरियास दरकार नाही

महिमाजी चिन्हे माहाराजापासी पेश जाले होते इकडील रोजमरा द्यावा आणि माहाराजानी दरमहा रुपया येक द्यावा त्याणी दोन च्या(र) वेला अर्ज घेरा इना (म) करून द्यावयाविसी केला राजश्रीनी अज्ञा केली घरा इनाम करून द्यावयाचे होत नाही दाहा चाहूर इना(म) करून देविती तेव्हां दाहा चाहूर इनाम करून दिल्हा सनदा पेशव्यावर आणिल्या गावगना इनाम घेतला परंतु शाहु माहाराजानी घरियाचा गोष्ट करून दिल्ही नाही

शिवाजी राज्यानी पूरची जमीन घेऊन पेठ वसविली त्यास सेटेपण दिल्हे नेली ते कालदरीचे माहार अविचार त्याणी कलागत केली पंताजीपंतापासी फिर्या (द) अले पंतानी कालदरीकर पटिलास मसाला केला सखदेव बाबा कुलकर्णी माहापुरुष सत्यवादी त्यास अणून पुसिले त्याणी सांगितले बाजी घोलपाची पालखी गेली त्याचे दक्षणेस गुरु मेले तर कालदरीकरा माहारानी न्यावे उतरेकडे मेले तर बेगल्यानी न्यावे ते समई बेगले खोटे जाले पैका लाविला पैका मिलेना तेव्हा संभर मोली हरकीची अविचार माहार कालदरीकडे त्यापासून घेतला पनास मोली बेगल्यापासून घेतली याप्रा पंतानी न्याय के[ला].

शिवाजी राजे याणी किला घेतला त्यास पेठ पाहिजे याकरितां पूरकर अणून त्यापासून जमीन टके घेऊन पेठ वसविली ते पेठेचा पाटिलकी चिन्हे आपली म्हणतात कृष्णाजी निबाळकर हवालदार सिचिवाकडे किला परंतु हवालदार राज्यापासून कृष्णाजी निबालकर पेठेची पाने वाप्याची सुपारी घरास माणू(स) पाठऊन नेत असे अलिकडे कोली घेतात याप्रो पेठेचा मार शाहू माहाराज अले नारायेणाचे देवली दोन लग्ने केली ते समई कोल्यानीं अलि घातला की किल्याचा घरा यात सेते अम्ही करू याचा पैका अमच्याबदल मुशाहिरा न त्याहावा घरे बाधो त्याचा घरटका म्हसीचा म्हैसटका न द्यावा लगीन मोहतूर जाला तरी पानाचा खाड व वाटी अम्ही द्यावी ऐसे माहाराजानी करून द्यावे त्यास राजश्रीनी माहादाजी येमाजी बोकील जवळ होते त्यास काका म्हणत असेत त्यास म्हणो लागले कोली काये म्हणतात ते समई माहादाजी येमाजीनी उत्तर केलें की घेऱ्याचा व किल्याचा

ध्याने अर्ज केला पेठ घर दुकान घालावयास माहाराजानी जागा करून दिल्ही परंतु बैल सोडून उभा कोठे करावा तेव्हा सायेघाटाकडे कुरन पूरच्या जमिनीपैकीं दिल्हे ते कुरण अजपावेतो चालत आहे कुरण व पेठ मिलोन पूरची जमीन किती दिल्ही हे पूरकरास पुसावे ते सागतील.

पाटील किल्लेदार हाकउत्पन्न किलेदाराचे घरास्यात सेते करितील ते बाा मुा त्याहावे टका सरकारात वसुल घ्यावा हे येकोन कोली उगेच राहिले व रा चिमाजी अपा राजपुरीच्या मनसब्यांत असे न्हावी सितेाल्याची तेथे मुकाम होता बालोबा माडवगणे याणा कोल्याची मधेस्ती करून घेरा इनाम करून द्यावासा जाला परवानकी बालोबानी घेऊन सनदा तयार केल्या मजमदार अयाब होते त्याकडे निशाणास गेल्या तेव्हां अयाब बोलिले हे नवे काम किंवा पुरातन हे अपास रुबरु पुसेन मग निशाण करून देईन तेव्हा अपास पुसिले अपानीं बापूजी श्रीपत यास बोलाविले पुसो लागले जे घेरीयाचे कसे अपानीं सनदा बापूजी पंताचे हातीं दिल्हा बापूजी पंतांनीं सनदा पाहून बोलिले घरा म्हणजे गांवचा जमीन गांव म्हणजे पुरंधर पुरंधरचा पाटील किल्लेदार घरा इनाम जाला तेव्हां किलेदार कोलियाची जाली किलेदारानी ज्या घरांत राहाव त्या घराचा घरटका कोली यास द्यावा व आम्ही राहतो ते जागा घऱ्यातील अम्हा घरजमे कोल्यास द्यावी या मागे हाकीम जाले त्यापासून इनाम कसा करून घेतला नाहीं आणि हली नवा इनाम कसा होईल यैसे बापूजीपत बोलिल्यावरी बालोबास बोलिले की गैरवाका समजाऊन असी गोष्ट करितां हे गोष्ट कार्याची नव्हे कारभारास बोल लागतो सनदा घेतल्या त्या फाडून टाकिल्या याप्रा वर्तमान आहे.

ले. ४१६ } { श. १५३७ आश्विन शु. १४
इ. १६१५ सप्टें० २५

हू

नकल

हजरत ममलकत मदारी मलिक अंबर व खान सुरूरखान साहेब वाटणी तर्फ कृष्णाजी तानप्रभु व गणेशप्रभु केदाजी प्रभु व हरदप्रभु व सोनप्रभु आउप्रभु कुलकर्णी ता। खारापाट मामले अमीनाबाद उर्फ पाली सुरू खमस अशर अलफ कारणे हुजुरून खुर्दखत बाो साहेब सादर जाले बिनाम कारकुनानी तो मजकूर बितेरीख छ ११ साबान साल-मजकूर तेथें रजा जे गणेशप्रभु कसबा नागोटाणे तो मजकूर हुजूर मालूम केले जे तो मजकुरीचे कुलकर्ण आपली तिसरी तकसीम मिरास गहदम सालाबाद आहे जुनरांत वडिल चुलत भाउ कृष्णाजी तानप्रभु करकसा करितात हे बाबे पेसजी जुनरीचे मुकामी असता हुजुरून निवाडा केला असोन तेप्हेप्रा। वर्तत नाही हरकत करितो दरीबाब सरंजामी होये म्हणून माळूम जाले तरी काजी हाकीम शरा बैसऊन सदरहू अमल खातीरेस आणून पेसजी हुजुरून अमल निवाडा केला असल तेप्हे बरहुकूम अमल कीजे निवडिले अमलास तकरार न कीजे म्हणोन रजा सिरी धरून काजी शरा व कारकून व देसाई व अदिकारी व समस्त देशक भली भली माणसें मज्यालिस करून पेसजी हरदो जणाचा निवाडा बिहुजूर काजी शरा, मुकाम जुनर जाहला होता तो कागद सन हाजीर मज्यालस आणून कागदाचा बयान निमे कृष्णाजी तानप्रभु व निमे गंबाजी व हरदप्रभु व सोनप्रभु अवप्रभु कुलकर्णी वाटणी

कारकून ता। मार

कमाल ठाणदार
अबाजी देसाई तो। मजकूर
अहमदजी सोनाजी नाइक-
वाडी तो। मजकूर
दाउदजी सरवाजी पावगी
बंदर नागोठाणे
अहमदजी खोत मौजे कानसे
इस्माइलजी खोत मौजे सांद्र

सोनार

इभराइमजी कोरडकसी कसबें नागोठणे
अबदलजी खोतु पाले

आलजी महमद दरदी
महमदजी चोरघा खोतु मौजे दिगोडे

बाबाजी बल्लाल मजमदार
मुलना माहामद अजहत काजी
हाकीम शरा मामले अमीनाबाद
अबदलजी व इस्माइल अदिकारी
तो मार
इस्माईलजी व वेठजी
दलवी मुकादम बंदर नागोठाणे
येकोजी खोतु मौजे सुकेली
मालजी खोत मौजे पलस
मियां राउ
दाद वारा तेली कसबे नागोठाणे
खोतु पत्र लोणी सुड कमसवी खोड
मौजे नीडी
तानसेठ खोत मौजे वेनसे

हे मुख्य करून समस्त सभा करून तर्फा केल्या सन सीता पासोन वाटणी

तर्फ गंबाजी व हरदप्रभु व सोनाजी आवजी		तर्फ कृष्णाजी तानप्रभु	
पलस	बेनसे	कारांड (उ)	सालिपे
निगडे	सुकेलां	सांहु	पाले
वरप	कोडगांव	कारली	नीडी
कोढवी	चिकणी	मौजे कोपेटी	वासगांव
बलसे	अैनघर	पाटणसे	गोठवसी
हैदोली	माडवसेत	कानसे	मौजे कुहरे उसर
आबडोसी	कुरनाड	पिगोडे	जाहोसी
दामेघर	जिनरे	ताबासोली	उसर
खार पालेखार	खारी पाढापूर	पाबल	खार ढोबी
खार कासु	वोवली	मौजे कडसुरे बुराडी	पाटणी कासरो घटवडी
जुडाणी	चोले	खारी काले	खारी गाधे
मोचला	आठवली	खार तरसेत	म्हैसबाड
तेलीपाले निमे	घाट निमे	खार कारावी	खार जा बे (दो ?) ला
माडवे निमे	लाजिमा गौली निमे ८८५	खार देउली	तेली मौजे पाले निमे
लाजिमा माहार	लाजिमा ताबोली	माहार कर्याती	खार घाट निमे
कोडगांव	लारी निमे पाने	पिगोडे कोसली	गोली लाजिमा
सीहू	-॥- २५	बोनसे कुहरे	८८५
नीडी	पलस	ताबसोली	सुकेली
लाजिमा हमाल निमे	हैदोली चालघर (निमे) वाईगणी निमे	बकाल निमे	ताबोली निमे लारी -॥- पाने २५
तेली कर्याति निमे	लाजिमा सराफ निमे	कोरडी कसी निमे सराफी निमे	तेली कर्याती निमे
लुगडी निमे	लग०	चालदार निमे	लुगडी निमे
		माडवे निमे	वाईगणी निमे

याखेरीज उया (पा) व उत्पन्न व मिरासी वर गाव आहेत दस्त होईल ते दो ठाई व नुकसान येईल तें दो ठाई या खो हक लाजिमा असल तो दों ठाई मिरासी वर नागवण पडल ते दो ठाई देणे.

ले.४१७ } { श. १५७२ चैत्र शु. १३
इ. १६५० एप्रिल ४

श्री

गोल

अस्सल

शिक्का फारशी

अज दिवाण तपे खारापाट उर्फ नागोठाणे मामले अमीनाबाद उर्फ पाली ता॥ देसाई व अदिकारी व सेठिये व माहाजन व खोतु व पाटेल व सिलोतरी व मढवी व माहार व बाजे मिरासदार तो॥ मजकूर व कसबे मजकूर बिदानद सुा॥ खमसैन अलफ दरीविले बावाजी कृस्ण कुलकर्णी येउनु ठाणा अर्ज केला की आपले कुलकर्णपणाची निवाड कारकीर्दी मलिक अंबर साहेब जाला होता तेप्हेप्रमाणे आपले वडिले खात होते यावरी आपले वडिल बफात जालेयावर दरम्याने अताजी तानप्रभु आपला वारीसदार मऱ्हाटेयाचे कारकीर्दी निवाडियासि कुसुर करून निवाडा करून घेतला होता तेप्हे प्रमाणे अताजी दोनी चार साले कमावीस करून खात होता तो हि बफात जाला त्यावरी आपण कमावीस करून खात होतो यावर साबाजी अनत फर्जद अताजी सन तिसा कारणे लारी से येक १०० सीरणी कबूल केलियावर (दु) माहालीचे कारकुनी मिरास त्याचे हवाले केली त्यावरोन तेणे आजी तागाइत कमावीस केली आहे तरी साहेबी आपली मिरास आपले हवाला कर्णे आणि आपला निवाड कारकीर्दी मलिक साहेब जाला आहे तेप्हे प्रमाणे आपणासी हाली महजर करून देणे आपण सीरणी ळारी दांडसे १५० देईन म्हणौनि अर्ज केला बा॥ (बराये) अर्ज खातिरेसी आणून कुलकर्णपणाची कमावीस बावाजीचे हवाला केली आहे तुम्ही कुलकर्णपणाची कमावीस याचे हाते घेत जाणे व याचे मिरासीचे निवाडियाचे कागद पेसजीचे आहेती तरी खातरेस आणून तेप्हे प्रमाणे माहाजर करून देऊनु मोर्तबु फारसी

लेखन सीमा

(पाठीवर)
तेरीख १२ माहे रबिलाखर
रबिलाखर

ले. ४१८ } { श. १५७२ आषाढ शु. ८
इ. १६५० जून २७

श्री

असल

(पहिल्या ४ ओळी अगदीं फाटल्या आहेत)

\+ + + + +

इ (हिंदी) खमसैन अलफ दादे कौलनामा ऐसा जे तुझे बाबे देसाई व अदिकारी यांचे मजकूर मालूम केले जे कुलकर्णपणाची कमावीस व वाडवांही तकसीम तान्हाजी मजकुराची आहे पेसजी पासुनू हली हजरती-साहेबास तपे मजकूर मुकासा अर्जानां जाला तर्ही तान्हाजी मजकूर कमावीस करीत होता त्यावरी कारकीर्दी सिदी गेवान अवुतालीब ठाणदार माजी तपे मजकूर या नजिक साबाजी अनंत प्रभू तान्हाजीचा चिचेरा भाई उभा राहिला त्यावरी सिदी माइलेने हुकुमा त्याचे हवाला कमावीस केली त्यावरून साबाजी येक दीड साल कमावीस करीत आहे तरा साबाजीसी कमाविसेसी निसबती नाहीं दरीत नाही तान्हाजी मजकूर वडील आहे व वाडिलाचा फर्जद आहे कमाविसेची निसबती यासी च आहे दरम्यान साबाजी मजकुरे कुसूर केला आहे तरी साहेबी तान्हाजी मजकुरास महजर करून देउनू बाा महजर + + सिर्णी लारी दीडसे १५० साल मजकुरा कारणे येक साल देईल कमावीस याचेच हाते घेतली पाहिजे ये बाबे तान्हाजी मजकुरास कौलु सादर केला पाहिजे म्हणोनि मालूम केले बराये मालुमाती खातीरेस आणोनू कौल सादर केला असे कमावीस तुझे हवाला केली असे महजर करून दिधला अजी साहेब+मुडे १५० सिरणी दिवाणात घेतली + + + काही सकदारी + + + काही फिकीर न करणे + + + तुजसी येक जरयाची निसबती नाहीं खुसीहाल होऊनू कमावीस करीत जाणे सिरणी येक साल उसूल करणे कोण्हे बाबे तालुक अंदेसा न करणे कौल असे मोर्तबु

मोर्तब
सूद

तेरीख ७ माहे रजबु
रजबु

ले. ४१९ } { श. १५७२ आषाढ शु. ८
इ. १६५० जून २७

श्री

नकल

वाटणी तर्फ तानाजी कृष्ण व साबाजी अनंत कुलकर्णी ता खारापाट उर्फ नागोठाणे मामले अमीनाबाद ऊर्फ पाली सुरू सन इहिदे खमसैन अलफ तान्हाजी कृष्ण व साबाजी अनत या हरदो जणामधे कुलकर्णीपणीचे मिरासी (ब) दल करकसा लागला यावरी

तान्हाजी कृष्ण दिवाणात उभा राहोनु फिर्यादी केली की आपले वडील घर कुलकर्णा-पणाची कमावीस आपली वाडीवेची येक तकसीम बरहुकूम निवाडा कारकीर्द मलकत मदारी मलिक अबर साहेब जाहला आहे तेप्हेप्रमाणे आपला बाप कृष्णाजी वडील व धाकटा गोविंदप्रभु व त्या धाकटा अताजी सदरहू जण येकवट घराबेयामधे होते ते वख्ती आपला बाप खात असे यावरी गोविंदप्रभु व अताजी घरामधून वेगले निघालेयावरी आपला बाप कमावीस करून खात असे अमा मिरास वाटली नाहीं यावरी आपला बाप मयेत जाला यावरी तीसरे महिने-या गोविंदप्रभु मयेत जाहला यावरी तां मजकूर नागोजी भोसला यास मुकासा होता ते वख्ती आपण नादान अंताजी दाना कुलकर्णपणाची कमावीस करीत असे म्हणोन आपणासी + दाम लाउन करकसा दोवेरफमी मिरासीची वाटणी करणे निमे मिरास तान्हाजीस देणे व निमे मिरास आपणास ठेवणे व कमावीस येक साल तान्हाजीने करणे व येक साल आपण कर्णे यैसा निवाडा करणे म्हणोन बोले यावरी नागोजी भोसले याचे कारकून रायाजी भोसला ठाणेदार व दत्ताजी त्रिमल मजमूदार तो मजकूर अंताजीचा पाठी राखोन आपणास नेऊन हुजुमी बैसउन आपणास बोलत कीं मिरासीची वाटणी करणे निमे तुज देतो व निमे अंताजीस देतो बादज कमावीस येक साल करणे व येक साल अंताजीनें कर्णे म्हणोन बोलत यावरी आपण बोले की कुळकर्णपणाचे मिरासीचा निवाडा पेसजी कारकीर्द मलकत मदारी मलिक साहेब जाला आहे तेणेप्रमाणे निवाडा करणे व वडिल घर आपले आहे कमावीस आपली व वडिलपणाची येक तकसीम कारकीर्दी मलकत मदार मलिक साहेबी दिधली आहे तेप्हेप्रमाणे देण बादज वाटणी करणे म्हणोन बोले अमा आपला बोल कोप्ही खातीरेस आणिला नाहीं आणि हुकूम करून मिरासीची वाटणी करून निमे मिरास आपणा खाले लिहिली आणि अंताजी खाले निमे मिरास लिहिली आणि कमावीस येक साल आपण-करावी व येक साल अंताजीने करावी यैसी वाटणी करऊन हुकुमे आपले निशाण घेतले यावरी येक साल आपण चालविले यावरी आपण अंताजीचे सिरी टाकिले आपणावरी हुकूम करउनु बुद्धीमधे बदबस्त साहेबा नाहीं जे वख्ती बदोबस्त साहेबा होईल ते वख्ती आपली मिरास व कमावीस व वाडीवे आपला बाप खात होता ते आपले हवाला होईल ते वख्ती आपण कमावीस करीन याबद्दल आपण कमावीस टाकिली अंताजी कमावीस करीत असे यावरी अंताजी पाणियात बुडोन मयेत जाला यावरी खान अजम हबासखान मुकासी तो मजकूर येही आपणास बोलाऊन दिलासा केला कुलकर्णपणाची कमावीस तुझी तू चालवणे म्हणोन बहुतवजा दिलासा केला कुलकर्णपणाचा कारभार आपण चालउ लागलो यावरी खान मा-इलेचा मुकासा बजावर्द होऊन सिदी अबर हवालदार कोठ जजीरे राजुरी यास मुकासा जाला पाच साले मोकासा होता ते वख्ती हि आपण च कमावीस चालवीत होतो यावरी याचा मोकासा दूर होऊन हजरती साहेब मुकासा अर्जाना जाहला यावरी साल दीड दान कमावीस आपण केलीयावरी साबाजी अनंत सिदी रेहन अबु तालीब ठाणदार यानजीक उभा राहोन अर्ज केला कीं कारकीर्दी मराठे आपले बाबे मिरास वाटणी निमे कमावीस येक साल तान्हाजीनें करावी व येक साल आपण करावी यैसी वाटणी केली आहे तर साहेबी

तेण्हे बरहुकूम येक साल आपले हवाली करणे यावरी सिदी रेहान याही मुनसफी न करितां अकस करून येकायेकी सावाजी अनंत यास पान देऊन कमावीस हवाली केली यावरी मिरासदार देसाई व अदिकारी अर्ज केला कीं वडिलपण कमावीस तान्हाजी कृष्ण याची असे त्याचे बापापासोन चालत आले आहे कारकीर्दी मलिक साहेबं निवाडा जाहाली तर तेण्हेप्रमाणे तान्हाजीचे हाते कमावीस घेतली पाहिजे म्हणोन सांगितले अमा आइकिले नाहीं यावरी साबाजी अनंत कमावीस साल दिडी करीत आहे तर साहेबी हरदम निवाडा कारकीर्दी मलिक साहेब जाहली आहे तेण्हेप्रमाणे निवाडा केला पाहिजे आपला बाप वडिलाचा फर्जंद त्याचे चिचेर भाई गबाजी केदाजी प्रभु व हरदप्रभु व सोनप्रभु व आउप्रभु या दोघास निमे मिरासीचा तकसीम दिधली आपले बापास बदल कमावीस व तकसीम येक व वाटणीची तकसीम येक येसी निमे मिरास व कमावीस दिधली कमाविसीसी व हरदो जणासी निसबत नाही आपला बाप कमावीस चालवीत असे म्हणऊन अर्ज केला यावरी साहेबी काजी हाकीम सरा व देसाई व अधिकारी व मोक्षसर लोक बोलाऊन मज्यालिस करून कारकीर्दी ममलकत मदारी मलिक आंबर वाटणी व खुर्दखते व मराम्या (ठ्या ?) चे कारकीर्दीची वाटणी आणून खातिरेस आणितां मराठ्याचे कारकीर्दीस वाटणी जाहली आहे त्यावरी गोही आहे तर या गोहीदारासी पुसणे की कारकीर्दी मलिक अंबर निवाडा होऊन वाटणी जाहली आहे कमावीस व वाडिवे तान्हाजीचे बापाची आहे तेण्हे बरहुकूम तान्हाजीने चालवावे असे असोन मराठेयांचे कारकीर्दीस वाटणी काये सबब असी केली यावरी अबदलजी अदिकारी बोलिले की मराठे याचे अमलामधे वाटणी केली आहे ती गैरमालूम केली आहे तान्हाजी राजी नव्हता हुकुमे निशाण घेतला आहे तर कारकीर्दी मलिक साहेब वाटणी जाहाली आहे त्यास राजी होता म्हणऊन गोही दिधली त्यावरून मराठेयाचे अमलामधे वाटणी जाहली होती ते बातील करून कारकीर्दी मलिक साहेब वाटणी जाहली आहे ते करार केली ते वाटणी व खुर्दखते हाजीर मज्यालिस खातिरेस आणितां तेथे वाटणी जाहली आहे गबाजी केदाजी प्रभु व हरदप्रभु व सोनप्रभु व आउप्रभु याचे हवाला साहेबी मिरासीची निमे तकसीम केली व निमे तकसीम व कमावीस कृष्णाजी तानप्रभु वडिल म्हणोउन त्यासी दिधली यावरी कृष्णाजी हयात होता तलग कमावीस करून निमे मिरास खादली तेण्हेच बारनीस वा हाली वडिलाइ खातिरेस आणिता तान्हाजी कृष्ण हा वडिलाचा फर्जंद कमावीसचा भोगवटा तान्हाजीचा बाप कृष्णजी मूळ म्हणोन तेण्हेच केला आहे त्याचे नव्हे [?] भाई गोविंदप्रभु व अंताजी येही कमावीस केली नाही व वाटणी बदल पाहतां कमावीसची वडिलाई मुलाचे तकसीमेची निा धरीत नाही म्हणोऊन कमावीस व वडिलाईची तकसीम तान्हाजी कृष्ण वडिल म्हणऊन त्याचे हवाली करून मिरासीची वाटणी केली.

गबाजी प्रभु अजि दि॥ कोनेर पंडित मजमुदार

सिदि जोहार ठाणदार

मुलना अबुल रहीमा अज इस्माईलजी देसाई ताा मार

दि॥ काजी हाकीम सरा
अबदलजी व हुसेनजी अदिकारी ता॥ मार
अगा मीर उस्तजा खोडी मौजे बेनसे
महमद दलवी मुकादम निमम पाउगी दा॥ कसबा मार
कनक सेट गोजसेट सोनार खोतु कोढवी
अबदलजी वनामजी खोड सालिणे जीनरे
बहरि दसजी खोत आवा ब्हेणा मार
विठोजी आउ प्रभु खोत निगडे
राम मेहतर गौली कसबे नागोठाणे
बदु मुकादम कोली डकसा कसबा नागोठाण
नान्हाजी सराफ तो नागोठाणे
आलीजी पाणसारा जकाती बंदर नागोठाणे

चागा सालवी मा॥ पाली
इस्माइलजी अहमदजी नाइक-वाडी ता॥ मार
बाबा सालवी नाइकवाडी मुकासाई मौजे वागणी
हिरोजी खोडी माडवसे ता॥ मार
गण पाटेल व भिवा पाटेल खोडी पलस
विसभट खोत वादगो
मलबार गोविंद खोत वोबेली
जोगीदास सेठीया बकाल मो॥ नागोठाणे
कासी खेडजी उदसी कसबे नागोठाणे
आबाजी सराफ मो॥ नागोठाणे

हे मुख्ये करून हरदो जणाचा निवाडा केला जे मिरास कुलकर्णपणाचा लाजिमा.

तर्फ तान्हाजी कृष्ण

बिा॥ वाडावे देहे

१ सुकेली १ कलप
१ कोडगाव १ अठवली
१ जिनरे १ तळेखार
१ माडिवसेत १ माडवे निमे

७॥

थैन तकसीम

१ बेनसे १ कोपेटी
१ निगडे
१ वरप १ पाढपूर
१ चिकणी १ माचेला
१ हेबली -॥- घाट
१ चिरवी -॥- माडवे

१०

हुगडे पटी
सालीना निा रयेती
लारी ३०

साबाजी अनंत व भागाई

साबाजी अनंत		भागाई
१ कोढवी	१ रेवेली	१ पलस
१ कुरनाड	१ चीलेखार	१ आंबा
१ बालस	१ खारी उडाणी	१ पालेखार
१ आबाडोसी	१ खारी वोली	—
१ येन घर	१ खारी काळी	३
—		भागाई मयत जाहल्यावरी
१०		तान्हाजी कृष्ण येणे खाणे

याखेरीज किरकोल बाब तान्हाजी व साबाजी

कसब कुले निमे तान्हाजी व निमे
साबाजी लाजीमा व रोज राती
हावखलणी (?)
गौली लाजिमा बकाल
तूप व खडाणी कोरडकसी
तांबोली लाजिमा पाउगी नीमक
पाने विडीयाची माली सेव चिटे
सराफ चाम्हार
तेली लाजिमा
रोज हाती
वाईगणी निमे तान्हाजी व निमे
साबाजी कोली मुकट निमे तान्हाजी व
निमे साबाजी लाजिमा तेली कर्याती
निमे तान्हाजी व निमे साबाजी माहार
कर्याती निमे तान्हाजी व निमे साबाजी

सदरहूप्रमाणे निशाडा केला यावरी साबाजी अनंत अर्ज केला की सदरहू वाटणी प्रो आपला आवकत चालत नाही तान्हाजी कमावीस करील आणि आपण बेकार तरी साहेबं तान्हाजीचे वाटणीमधून ज्याजती आपणास देववणे यावरी काजी हाकीम सरा व कारकू व देसाई व आदिकारी व मोक्षसर लोक बैसोन सदर + वाटणी खेरीज ज्याजती गाव दो तान्हाजी कृष्ण याचे वाटणी मधून साबाजी अनंत यास देविले यावरी हरदो जणाची समजा विसी केली की कुलकर्णपणाचा कमावीस तान्हाजी कृष्ण याच्हे कर्णे साबाजी अनंत यास

कमाविसेसी निसबत नाही बाजद पेसजी वाटणी मराठेयाचे कारकीर्दीस जाहाली रद असे उयाजती गाउ

१ जीनरे १ कलद

सदरहूप्रमाणे समजाविसी केली यास जो कोण्ही हिलाहरकत करील तो दिवाणाचा अन्याई व गोताचा अन्याई: पेसजी कारकीर्दी मन्हाठे वाटणी जाहली ती रद असे व कारकीर्दी सिदि रहान तालीब ठाणदार खुर्दखते दिधली असेत + + + असे छ ७ रजबु

ले. ४२० } { श. १५७२ आषाढ शु. १४
इ. १६५० जुलै २

× × × × हवाल सिदी अजम काजी अली सेर हवालदार व कारकून + + + × × + + बुजानेबु कारकुनानी व देसाई अदीकरून × + + खारापाट बिदानद सु॥ इहिदे खमसैन अलफ + + × छ १२ रजब पौ छ २२ रजब पाठविली तेथें मजकूर लिहिले जे तपे मजकुरीचे कुळकर्णी तान्हाजी कृष्ण व साबाजी अनंत हर्दी जण चीचे भाइ हे कुलकर्णपणाचे मिरासी बद्दल भांडत होते या वर्षी साल्गुदस्तां अखर साली तान्हाजी उभा राहोन अर्ज केला जे आपले मिरासेचा निवाडा कारकीर्दी मलिक सेक मलिक अंबर जाला आहे तेण्हे बरहुकूम आपला निवाडा करणे म्हणोउनु अर्ज केला त्यावरून तपे मजकुरीचे काजी हाकीम-सरा व देसाई व अदिकारी व देसक व भले लोक बैसउनु हर्दी जणांची हकीकत खातिरेस आणून पेसजी निवाडा जाहाला होता त्याचे गौही मोकाबला व खातिरेस आणून हर्दी जणाचा निवाडा केला वाटणीचा कागद केले त्याची तालीक बंदगीस पाठविली आहे त्यावरून रोसन होईल तरी साहेबी वाटणी खातिरेस आणोन तेण्हे बरहुकूम सुभाचे खुर्दखत नफर मजकुरास सादर केले पाहिजे वाटणी बित॥

तान्हाजी कृस्ण

बदल वाडवे	
देहाय तपे मजा	यैन तकसीम
सुकेली १	बेनसे १
कोडीज १	नितुडे १
जिनरे १	करप १
माडवे १	+ गिणी १
सालपे १	देवाळी १
अठवली १	खारी चिरटी १
तले खारी १	खारी कोपेटी १
माडवे निमे -॥-	कास मढारे १
७॥	माचेल १

घाट निमे -॥-
माडवे निमे -॥-

सुगडी साली–
न्या + + रयताळा
+ + ३०८

साबाजी अनंत व भागाई

× ×
× +
कुरेनाड १
बलसे १
+ +
उवर्सा १
यैनघर १
रेवाळी १
चोले १
उडाणी १
वोवळी १
कासु १
१०

+ +
+ +
पल्स १
× १
+ १
३

या खेरीज किरकोळ बाबा तान्हाजी कृस्न व साबाजी अनंत

कसबी कुल निमे तान्हाजी व निमे साबाजी लाजिमा व + + + ब व खडाणी

वागिणी निमे ताल्हाजी कृष्ण व साबाजी अनंत

गौली खडाणी
तुप
ताबोली लाजिमा व
पाने विडा
माली सेव
+ + + × दार

बकाल
कोर + कसी
+ + गोनिम
सराफ
तेली लाजिमा
व रोज रातीब

कोली सुक्टे निमे तान्हाजी व निमे साबाजी
लाजिमा तेली + + + निमे तान्हाजी व साबाजी
माहार कर्याती निमे तान्हाजी कृष्ण व निमे साबाजी

येण्हे प्रमाणें निवाडा केला यावरि साबाजी अनंत बोलला कीं सदरहू वाटणी प्रमाणें आपला अवकाती चाले नाहीं तान्हाजी कृस्ण कमावीस करील आणि आपण बेकार तरी तान्हाजी कृस्णाचे वाटणी मधून ज्याजती आपणांस देवणे यावरी काजी हकीम सरा व देसाई व अदिकारी व मोफसर भले लोक येही सदरहू वाटणी खेरीज ज्याजती गांव २ तान्हाजी कृस्णाचे वाटणी मधून साबाजीस देवविले यावरी हरदो जणांची समजाविसी

केली कीं कुलकर्णपणाची कमावीस तान्हाजीन करणे साबाजीचा कमाविसेसि निसबती नाहीं गाव २

मौजे जिनरे १ मौजे कळदे १

सदरहू प्रमाणे समजाविस वेलीं यास जो कोण्ही हिलाहरकत करील तो दिवाणीचा अन्याइ व गोताचा अन्याइ पेसजी कारकीर्दी मराठे वाटणी जाली ते कागद रद असति व कारकीर्दी सिदि रेहा न अबुअली हे ठाणदार खुदखत दिधले ते रद असे म्हणोउनु वाटणी करउनु निवाडा केला आहे म्हणोउनु लिहिले तरी तान्हाजी कृस्ण व साबाजी अनंत कुळकर्णी ताा मजकुरी हदों जणाचे जैसे काही कारकीर्दी मलिक अंबर चालिले होते तेप्हेच प्रमाणे हाली करार करून महाली हकीम सरी व भले लोक बैसोन निवाडा केला तोच करार केला असे दरम्यान भोसले यांचे कारकीर्दीस कमावीस केली होती ते रद्द असे सदरहू निवाडा वरहुकूम तान्हाजी कृस्ण कुलकर्णी याचे हवाले मिरास केली असे औलाद अफलाद चालविजे दरीआब कौल खुदखताचा उजूर न कीजे

ले. ४२१ } { श. १५७२ कार्त्तिक व. २
इ० १६५० आक्टा० ३१

हू

असल प्रो नकल

इ कौलनामा अजदिवाण ताा खारापाट मामले अमीनाबाद ताा बावाजी कृष्ण कुलकर्णी तो नागोठणे बिदानद सुा इहिदे खमसैनं अलफ दादे कौलनामा यैसा जे तुझे बाबे देसाई व अदिकारी तो मजकुरी मालूम केले जे साहेबी फर्माविले कीं बावाजा कुलकर्णी तो मजकूर बाहेर पाडिला आहे तरी त्याचा मुदा घेणे म्हणोनी रजा तरी नफर मजकुराचा मुदा मनास आणिता मालूम केले की आपले मिरासीचा निवाडा कारकीर्दी सिदी जोहार ठाणेदार माजी ताा मजकूर जाला आहे तेप्हे प्रमाणे हाली सिदी अजमाचा कौल सादर जाले त्या कतिबा लेहोउनु येईन म्हणोनि तेप्हे मुदा बेसम केला आहे तरी साहेबी नजर अनायेतीं करून आपला कौलु सादर केला पाहिजे मालूम जाले हक मालुमाती खातीरेसी आणून कौलनामा सादर केला असे पेशजी तुझे मिरासीचा निवाडा जाला आहे तेप्हेप्रमाणें चालउनु हालीही कौलु असे कोण्हे बाबे शक अदेशा न कीजे आपला खातिरजमा राखोनी बेशक होउनु येईजे हर कोण्हे बाबे तुवा शक धरिली आहे तरी हे बाबेही तुज कौलु असे व काकाजी प्रभु यासही बराबर घेऊन येणे आपला हिसेबु करील जेहि हिसेब पैकी होतील ते हि मुदती फुरसतीने उसूल होईल बाजद कोण्हे बाब सक न धरणे सुखे येणे जाणिजे

तेरीख १५

जिलेकादी

ले. ४२२ } { श० १६१८ आश्विन शु० २
इ० १६९६ सप्टें० १८

नकल

दा॥ बो गोविद बावाजी व रंगाजी अनंत व निलाजी कुलकर्णी ता॥ खारापाट उर्फ नागोठणे सु॥ सबा तिसैन अलफ कारणे दर बंदगी खानसाहेब आरमार साहेबाचे बंदगीस कबूल कतबा लेहून दिधला ऐसा जे साहेबी हुजूर आणून रजा फर्माविली की ईा सन इसने तिसैन अलफ ता॥ सन सीत तिसैन सरकारीचा इजारा ता॥ मजकूर आहे त्या अमलामध्ये तुम्ही चोरी केली व सेताचे देणे दिधले नाही व सेत दुतर्फाचे देणे दिधले नाही व सीरणी हक मोठबंदर दिधली नाही तरी गुन्हेगारी देणे म्हणोन रजा फर्माविली यावरी बंदगीस आपण आपले हाल जाहीर केले यावरी साहेब मेहरबान होऊन आपणास खंड रुपये २५०० दोन हजार पाचसे खंड केला तो आपण कबूल असो उगवणी करून देखील हक गाव लिहिणार व दरबार खर्च नित येती व बागा खुद दलवी कुल गुन्हेगारी देखील वसूल करून याचा वसूल ईा छ १ रबिलोवल ता॥ अखेर जमादिलोवल येकूण माहे ३ दर माहे नकद

	रुपये
माहे रबिलोवल अखेर चाद	८३३८
माहे रबिलाखर अखेर चाद	८३३८
माहे जमादिलोवल अखेर चाद	८३४४
	२५००८

येकूण दोनहजार पाचसे रुपये सदरहू मुदतीचे मुदतीस वसूल करून देऊन हा कतबा सही

गोही

दादाजी हैबतराऊ देशमुख ता॥ ओसरे आधारणे लिा॥ प्रा॥ साक्षे १

भिकाजी देसमूख व रतनाजी अदिकारी तो अस्टमी लिा॥ प्रा॥ साक्षे १

सावाजी अदिकारी तर्फे हवेली लिहिले प्रा॥ साक्षे १

तेरीख १ रबिलोवल

ले. ४२३ } { श० १६२४ आश्विन शु. १०
इ० १७०२ सप्टें० १९

अस्सल

श्री शिव न
रपतिहर्षनिदा
न मोरेश्वरसुत
भैरव मुख्य
प्रधान

इ कौलनामा अज स्वारी राजश्री पंतप्रधान तांहा खोत व रयानी तर्फ नागोठणे सुभा चेऊल सुहुर सन सलास मया व अलफ दादे कौलनामा ऐसा जे तुमचे बाबे मा गोविद बावाजी देसकुलकर्णी ताा मजकूर याणे हुजूर विदीत केले की लस्करचे धामधुमी करितां रयेत परागदा होऊन फिरं (गणा) त जात होती तें आपण अवरावर्ला तात (? खोलबून ठेविली आहे साहेबी मेहरवान होऊन रयेतीस कौल सादर केल्यानें माहालास आणून जे गांवीचा ते गावी वसाहत करून म्हणून मालूम केले बराये मालुमातीा खातिरेस आणून तुम्हांस कौल सादर केला आहे खोत पाटील रयेता बाजे खुद वाणी बकाल देखील जे गांवी (चे) ते गांवी येऊन वसाहत करून खुसीहाल राहाणे कोण्हे बाबे शब्द अदेशा न धरणे गांवोगांवी लांबे पीक जाहाले आहे ते तुम्हीं महालांत आपापले गावी रयेता खोत येऊन त्या पैकाचा आटोप करणे साऱ्याचे बाद बांधणे असतील ते आपली गांवी येऊन बांधणे पुढील कीर्दी माहासुरी करणे दरी बाब कौल असे छ ७ जमादिलोवल पाा हुजूर

पाठीवर
सुरु सुद बार

लेखना
वधि

ले.४२४ } { श. १६२५ कार्तिक शु. ३
इ. १७०३ आक्टो. २.

श्री

नकल

छत्रपति

राजश्री विसाजी भास्कर हवालदार व कारकून तो नागोठणे गोसावीं यांस

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्ये श्रो—शकराजी बाजी सभासद नामजाद सुभा पंचमहाल चेउल सुरू अर्वा मया व अलफ मा गोविद बावाजी कुलकर्णी तो नागोठणे यानी प्रतापगडचे मुकामी राजश्री—श्वामी कर्णाटक प्रांती श्वारीस गेले ते समई धामधुमे

करिता हा प्रां (त) अगदीच उद्वस जाला ते प्रसंगी आपण राजश्री पंतसचीव याची भेट घेतली त्यानी आपला दिलाशा करून कौल दिल्हा आणि सेत जुई दर सवाद मौजे बेनसे तो मजकूर रकम ढेप मुडे १॥ ३॥। दीड मुडा: पावणेच्यार मण व नख्त लारी येक हे आपणास इनाम देऊ(न) सनद सादर केली त्यावरून आपण माहाली येऊन रयेत परागंदा जाली होती त्ये आणून कीर्दीस लाविली इनामतीचे सेत अनभवीत असतां ईनामतीची सनद आली ते किले सुधागडास राहिली आपण सुधागडी येऊन सनद घ्यावी तर शामलाच्या तगादियाकरिता माहालीहून किले मजकुरी यावयास अनुकूल पडिले नाही यामुळे इनामतीची सनद किले मजकूरी ठेविली होती ते आपले हातास आली नाही याकरिता माहालहून इनामतीचा खर्च घातला नाही बाकी काढिली आहे·ब्रिता।

	नख्त टके	गला खडी
सन सीत	२४।-	६॥।२॥।
सन सबा	२२८४	८।३॥।
सन समान	२१॥॥३	७॥।२॥२॥
शन तिसा	२३।६	३८१।२॥-
सन मया	२३।७॥-	१॥३॥-॥-
सन इहिदे	३२॥॥४॥-	५॥॥१।१।
सन इसने	१८॥।-	४४३।१॥-
	१६६॥१	३७॥।३॥।२।१

येकूण नख्त टके येकसे साडेसासस्ट टके येक रुका व गला खडी पावणे अठतीस खंडी पावणेच्यार मण सवादोन पाइली येक निठवे बाकी वोढत आहे यैसीयास वतनदार श्वामीच्या पायासी येकनिस्ट राहोन माहालाची लावणी संचणी करून दिवाणाचे दस्त देत आहे श्वामी सेवेसी आपणापासून अतर होत नाही श्वामीनी कृपाळू होऊन सदरहू बाकी माफ करून सेत जुई उतरोतर इनाम चाले यैसी आज्ञा केली पाहिजे म्हणून हुजूर विदित करून माारनुले सुभाच्या नावे सनद सादर केली असे छ २० रबिलाखर पो छ १० जमादिलोवल सादर असे त्याजवरून तुम्हास हे पत्र लिहिले असे तर माारनुले कडील इनामाची सात साला बाकी माहाली वोढत आहे माानुलेचे नावे इनामतीचा खर्च लिहिणे व सेत जुइ रकम मुडे १॥३॥। दीड मुडा पावणेच्यार मण व नख्त लारी रकम १ येक रास कुल कानु देखील हाली पटी व पेस्तर पटी खेरीज येकदार यासी हुजरून इनाम करून दिल्हे असे तर तुम्ही माारनुलेचे दुमाले सेत जुइ करणे प्रति वरसी नूतन पत्राचा उजूर न करणे प्रति लेहून असल पत्र यापासी भोगवटीयास देणे छ १ माहे जमादिलाखर.

ले. ४२५ } { श. इ.

(वरील फाटले आहे.)

राहिले त्यास सिवाजी राजे बफात जाले + + + + + त्यावर रामघाट प्रांती होते त्यास संभाजी दस्त जाहा+ तेव्हा + +ला कबिला विशाळगडाखाली होते-———— + + +त + + + संभाजी राजा पाचाडास होते येसाजी फर्जंद म्हणून होते + + सरदेशमुखी दिल्ही होती त्याच्हे भारे बोस खाना केले होते तेथून ऐवजाचे वसुलावर चेऊल प्रांती खाना स्वारी जाली होती + + + आपण होतो त्यास संभाजीची खबर दस्तगीर जाहला अशी येताच + + + + +चे तफरका जाले बदा येकला ? पडिला मार्ग न चालजे नवाद पण त्यास उदेरीची स्वारी रेवदंड्याहून जात होती + + + पण रेवदंड्याहून सागरगडास म्हणून जाण्यास खाना जालो त्याही उदेरीस मरहुमी सिदी अवदुल रहिमान साहेब यानजीक नेले त्याही उदेरीस चाकर ठेविले त्यास खानसाहेब अंतर्गीरीचे मोर्चियास होते ते पासून हुजूर ठेविले आपला बाप कबिला ते प्रांती होता त्यास ते प्रांतीहून बंदीयाचे खबरीस रोले पावेतो येउन फेर रामराजा चंदीस गेला त्याबराबर गेला असेल त्यावरून चंदीकडे गेला तो अनलंग खबर नाही तिकडेच वारला मागे कबिला होता त्यास मोगलाई जाली मराठे जागा जागा लुट्ट लागले. तेव्हा त्यास चांद सावत म्हणून होता त्याच्हे लुटले वस्तवानी गुरुढोरे त्याने नेले चाकर बंदी होती ती खावयास नाही यामुळे च्यारी चहूकडे गेली त्यापैकी बापीयाची बुढी मा व खंडोजी भाई ही दोघे जे वक्ती जुनरास खाजिना आणावयास + + स्वारी गेली होती ते स्वारी राजपुरीस अली ते वक्ती हर दूजणे राजपुरीस बदे या नजीक आली हे वजेची हकीगत जाली वतनाची हकीगत मनास आणवितो व तुज कोणी आपले सागणार नाही आपली वली कैसी त्याची वली कैसी हे काही कळेना असे जाले त्यास तलास करून हे हकीकत बदगीस जाहीर करावी त्यास यामागे काही मरहुमी खान साहेबाचे अमला तरफी तरतचं मराठीयाची होती वतनाचा काही कोणाचे अमल निवाडा ऐसा प्रसंग जाला नव्हता हाली साहेबाचे अमलात मागे मालिक साहेब होते याही कितेक सजाच्या वतनाच्या वगैरे मनसुफीया नीबाडे केले ते आजलंग चालिले आहेत तैसेच साहेब मेहेरवान दुधपाणी निवाडा करितील असे समजून बंदीयाची हकीकत जे होती ते बदगीस ठेविली असे निवाडा करणार साहेब धनी माबाप असेत.

हा जे काही वतनावर भोगवटा करीत असेत याची व खादीयाची अवलाद हे वजेदी असे.

बदी याची अवलाद मूल

१ आपाजी प्रभु ताचे दामाजी मारिला त्याची अवलाद वाघोजी प्रभु त्याची अवलाद बहिराजी प्रभु त्याचे बेटे

१ बापूजी
१ खंडोजी

——

२

१ वैज प्रभु खडकीस मोसब घेऊन गेले त्याची अवलाद.

हरबाजीची अवलाद	नागोजीची अवलाद
१ वैज प्रभु	अंताजीपंत पुत्र त्याचा नागोजी माल-
१ गणेश प्रभुचे अतमाजी त्याचे	गडीस असतो
मुले दोघे	१

——

२

वैजो हरी यांची अवलाद हरबाजी व तानाजी वगैरा भाई असत
१ गणेश प्रभु यास बेटा नाही बेटिया २ होत्या

——

३

लिहिणार ठेविले होते मूळ पुरुष त्याचे व जोगणीचे रा + नंतर त्याचे सिरकाल पाडिला साा २ भाई होते त्यापैकी वडील भाई कोड प्रभु रोजगारास हे प्रांती आला तो रोहे प्रांी घोसाल येथे पतकीपणाचा रोजगार करून राहिला त्याची खबर दुसरा भाई गोज प्रभु यास मालूम जालीयावर ते प्रांतीहून त्याची बुडी व तो भाईचे खबरीस हे प्रांती रोजगारा करावे दोघा भाई गुदेरान करावे म्हणून अला गणेश प्रभु कुलकर्णी याने बापू मढवी मौजे निडी तो नागोठणे यास सांगितले होते की आम्हास कारकूनाची दरकर असे त्यास गोज प्रभु व त्याची बुडी ऐसी मौजे मजकुरी वस्तीची राहिली त्याणे त्याची हकीकत विच्यारिली अण गणेश प्रभु कुलकर्णी याचे मुलाखतीस नेला तेथे त्याणे लिहिणार ठेविला वडील भाई कोड प्रभु रोहे याचे पतकीपण चालवीत होते त्याची अवलाद रामाजी विष्णु हाली राजपुरीस असते गोज प्रभु लिहिणार ठेविला त्याची अवलाद बी ॥

तान प्रभु	अवजी प्रभु याचे अवलाद सोनाजी त्याची
१ कृष्णाची प्रभु	अवलाद
१ गोविंद प्रभुलंग	१ वामनाजी
१ अताजी प्रभु	१ दुराजी
१ साबाजी प्रभु त्याची अव-	१ रामाजी संतान नसे
लाद नाही	१ दामाजी
——	——
४	४

पौ अवलाद दोन २ बेटे कृष्णा जीचा बेटा बावाजी त्याचा बेटा गोदा- वा त्याचा कृष्णाजी हाली आहे- १

पौ अवलाद भाई ३ अताजीचे बेटे ३
१ रगाजी
१ रघुजी
—
२
याची अवलाद हली असे रंगाजी बेटा मल्हारजी १

१ अवलाद वामनाजी
१ अयाजी
१ निमजी
—
२
याची अवलाद अयाजीचा बेटा निमजी हयात असे
१ दामाजी हयात असे
१ मुराजीची अवलाद सुदरजी याचे पुत्र
१ केशव
१ चिमणाजी
१ विठल
—
३
१ अवलाद सुदरजी
१ रंगाजी
—
२

हे वजेची हकीकत असे अण याणे अयार्जा वामन महमद सफी बरार जाऊन टक्याचे बले फर्मान काढिला असे म्हणून मालुम होत असे साहेब तल कोकणचे हकीम हरयेक जमीदार म्हणबीत असेल त्याणे साहेबाचे बदगीस जाली हकीकत जाहीर करून साहेबाचे विद्यमाने वतनाचा अमल करावा त्यास अयाजी मार महमद सफी याजकडे नोकरीस होता त्याचे वकिलाने तर्तूद करून फर्मान आणिला आसोन साहेबाचे बदगीस जाहीर केला नाही सबब त्यासी पुरसीस असे की तुम्ही वतन खाता हे पुरातन तुमचे आहे की काय त्यास ते जाब देतील की आमचे पुरातन असे मग साहेबी त्याचा कतबा घ्यावा त्यावरून साहेब कीफायेत असे अगर ते म्हणतील की आम्हास आपण दिल्हेवर त्याचा कागद काढवणार साहेब धनी आहेत त्याचा कागद त्यासी केला असिला तर अवलाद असता अफलादेस पोहचत नाही यावरून तो कागद तकलिदी असे अगर हुजूर फर्मान घेतला त्यात दाखला कैसा असेल तो खातिरेस आणऊन यावर जर हा दाखला नसोन फर्मान घेतला असला

तर साहेबाची गुन्हेगारी असे की गैर वाका मालुम करून फर्मान घेतला असे असां साहेब कि (फा)येत असे आपण बंदा साहेबाचा असे चहूंकडे मीलस साहेबाचा होईल की गेले वतन दूध पाणी याचा निवाडा करून बंदीयास सर्फराज केले हा नक्षा नामोस दिन दूनियात मलिक साहेबाचा जाला असे ऐसा साहेबाचा होईल आपण बंदा पावख असे वतन साहेबाचे असे बदीयाची हकीकत जे होती ते साहेबाचे कदमा नजिक ठेविली असे साहेब धनी मावाप असेत.

ले. ४२६ } {श.१५९० वैशाख शु. १२
इ. १६६८ एप्रिल १३

श्री

मसुरुल अनाम राजश्री रायाजी भोसले हावलदार जंजिरे सिधुदुर्ग प्रति राजश्री सिवाजी राजे सुा समान सितैन अलफ बो. रामचंद्र नीलकंठ यास १ जंजिरे मजकुरीची सबनिसी साहेब मेहेरबान होऊन वतन दिल्ही आहे यास इा. पैा पासून सालिन्या तैनाति होनु १०० सेंभरी पातशाही केले आहेती सालमजकुरी सिरस्ता केला आहे तेणेप्रमाणे आदा करणे व यारेदी व कागदबाब हरनिसबति मार्जाप्रमाणे लिहिणियास देत जाणे माइले आपला मुतालिक जंजिरे मजकुरास पाठवितील त्याचे हाते सबनीसीचा कारभार घेत जाणे छ ११ माहे जिलकाद मोर्तब सुद

मर्यां
देयं विरा
जते

ले. ४२७ } {श.१५९२ मार्ग.शु. ८
इ. १६७० नोव्हेंबर १०

श्री

तादलेश्वर साहेबु

महजर मिरासीपत्र श्री सके १५९२ साधारण नाव संवछरे मार्गेस्वर सुध ८ वार सुकुरवार ते दिवसीं हाजीर मजालेसी मौजे तादली नाा टाकली तरफ राजणगाऊ पाा जुनर श्री—याचे देउली बीहुजूर

---

१ हें पत्र अस्सल आहे कारण सेवटीं मर्यादेचा शिक्का आहे. परंतु या ठिकाणीं सवयीनें शिक्याची जागा सोडली आहे. २ अक्षर निराळें. ३ सीमा षटकोनी
४ अशाच मजकुराचें व तारखेचें एक मिरासी पत्र आहे. पण छापलें नाहीं.

मौजे मजकूर

बलुते

मुलाणा सेख नुरदी वलद सेख सेकु उमर वरसे ६० व सेख वलद सेख नुरदी याची उमर वरसे वीस

निा सुरी

मोर सुतार बिन तान सुतार उमर वरसे २५ निा किकरे

तुलवटा विन जानवटा परीट अजहती मलवटा बिन दादवटा मिरासीदार मौजे मार निा मोगरी

दऊ मेहतरी बिन रुप मेहतरी उमर वरसे तीस

दावल मेहतरी विन परस मेहतरी उमर वरसे पंचवीस निा

मोर पाटील मो मौजे कोकनगाव पा— — —

जाऊ मेहतरी बिन अर्ज मेहतरी उमर वरसे ७५

खंड माहाला व नाग माहाला बिन जाम माहाला नाहावी उमर वरसे ७० याचे लेक दोग २

सेटियाजी बिन नागोजी सोनार उमर वरसे ८९ निा हातवडा

जैत माहाला जाम माहला निा आरिसा

जाख दरणा बिन रेख दरणा गुरव उमर वरसे तीस व कुदरणा बिन रखदरणा उमर वरसे वीस निा मादल

माहार विर्तिकार मिरासीदार

सिऊ नाक बिन गुणनाक उमर वरसे ५० व कु नाक बिन गुण नाक उम वरसे पचेतालीस

चादनाक बिन मालनाक उमर वरसे ७५ पाऊणसे निा इला दोर

गिरजोजी व कृष्णाजी मो मौजे चाडगाऊ पा कडेवली + ा सिवाजी सुखदेव कुलकर्णी मौजे मा

मका बिन सता माग उमर वरसे २० निा मागभाली

सत सालवा बिन दाद साल्हि- वा कुभार निा चाक

कुलवाडिये मिरासीदार

देउजी बिन तुवाजी कवाडे
उमर वरसे ७५

गोदजी बिन भिकाजी
डोहिरे उमर वरसे तीस
संताजी बिन तुकोजी निगडे
उमर वरसे ६२
दुबाजी बिन जाउजी बोस
(भोस)उमर वरसे ७०

धारोजी बिन बहिरजी
नलगे उमर वरसे ११५
सलाबत खानाचे वेलेस
उपजला

बहिरजी बिन नरसोजी
मिल्हे उमर वरसे २७
सताविस

सटवा मेहेतरी बिन नाग
मेहतरी उमर वरसे २५

मोकदम समस्त मौजे घोडे
गाऊ पाा रासिन
बीा सखोजी तानदेऊ
जोसी व कुलकर्णी मौज माा

कृष्णाजी बिन नागोजी
पायगुडे मोकदम मौजे

पाा पुणा
मादारे ताा नीरथडी

जानोजी बिन जैताजी
कवाडा उमर वरसे६०
साठी
मल गावडा बिन म्हाल
गावडा याची उमर वरसे ६०
देउजी गावडा बिन
म्हाल गावडा उमर वरसे
४० चालीस
खंडोजी बिन नारोजी बोस
उमर वरसे २०

मकाजी बिन कृष्णाजी चौ-
गुले उमर वरसे २२
नागोजी बिन रतनोजी
बोडका उमर वरसे ६०

तुबाजी बिन ताउजी खी-
(र)सागर मौजे मजकूर उमर-
वरसे३५

नाग मेहतरी बिन बहीर
मेहतरी तेली उम रवरसे ७०
निा पाहार

कोड माली बिन सत माली
जमबु उमर वरसे ३०
मोकदम व समस्त माले
देऊलगाऊ
बीा खडो सिवदेऊ कुलकर्णी
जोसी मौजे माा

राजजी बिन कान्होजी बेट
मोकदम मौजे कतकवले तपे
खेडबारे

पिलाजी बिन बालोजी वेलाकर
मौजे टाकली ना तादले ता
करडे पा कूर उमर वरसे ४०

बाजी बिन महरजी रोडे मौजे
टाकली नो तादले ता कडे पा
जुनर उमर वरसे ३० तीस

सूर्याजी बिन दामाजी राडे
मौजे देऊलगाव कोठारी पा
चाभारगोदे उमर वरसे ८०
तुकोजी मोकदम व समता मौजे
मानगाऊ पा कडे

मईलाजी बिन हिरोजी
झागडे मौजे टाकली ना तादले
ता करडे पा जुनर उमर वरसे ८०

येमाजी बिन माहादजी
सागले चौगुले मौजे माडोगण
पुराटियाचे पा कडे समत
जुनर उमर ४५

गुजाजी मोकदम मौजे सुरगाऊ
प्रा मा

बिा तान्हाजी अडदेव कुलकरणी
मौजे मजकूर — — —

— — — — — — —

येसाजी व जैतजी काळोजी व
साबाजी मोकदम मौजे कालगाव
पा कडे

बीा साबाजी दामोधर
कुलकर्णी मौजे मा

मोकदम मौजे राजणगाव ता मार

--कुलकरणी

तान्हाजी मोकदम मौजे कामठी
ता--ण गाव सा

— — — —

बिा शिंबकजी विठल कुलकर्णी मौजे
मजकूर

रायाजी आढाऊ मोकदम हाजीर नाही

आबाजी मोकदम मौजे कोरेगव्हाण
ता राजणगाऊ १

होन पाटील मोकदम
निमे व समस्त दाहीजन
मौजे बुा गा

बिा गोविद बोपदेऊ
कुलकर्णी मौजे मार
मोकदम व समस्त मौजे
निबवी पा कडे
बिा मल्हारी सविदेऊ
व कुलकर्णी मौजे मा

बिा सकराजी मेगदेऊ जोसी
कुलकर्णी मौजे मार
कृष्णाजी व मानकोजी मोकदम
मौजे ढो-ता राजनगाऊ
गोविद रतनाकर
कुलकर्णी जोसी मौजे मजकूर

सुा इहिदे सबैन अलफ सन हजार १०८० या विदमान मिरासी पत्र खरीदी मौजे तादली नाा टाकली ताा राजणगाऊ साा जुनर ये गावीचे कुलकर्ण व जोतीस निलो सोनदेऊ व आबाजी सोनदेऊ यासी सिउजी बिन जैत पाटील व माणकोजी बिन वेवोजी बोस (भोस) मोकदम मौजे तांदले नाा टाकली ताा राजणगाउ पाा जुनर याणे व समस्त बापभाऊ व बाराहि बलुते व मिरासीदार कुणबी यानी लेहोनु मिरासी पत्र दिधले मा आपला मिरासीदार कुलकरणी व जोसी कुमाजी होता त्याचे घर कुल बुडाले यावरी आम्ही गावकरी मुतालिक ठेउनु गावकुलकरण चालवीत असे व भटपण तरी आम्ही गावलोक देखील लग्न मुहूर्त घेत असो. या उपरी आम्ही व समस्त बापभाऊ व बाराहि बलुते मिरासीदार कुणबी ऐसे मिलोन विचार केला की कुलकरण व जोसीपण हे विकावे आणि टका भरी घ्यावा आणि आपल्यास मिरासीभाऊ करावा ऐसा आम्हा आवधीयानी तह केला मग आम्ही तुम्हास मुकाम रायेरीस येउनु आपखुसीने मौजे तादली नाा टाकली तरफ राजणगाऊ पाो जुनर येथील कुलकरण व जोतीस व घरवाडा ऐसे तुम्हास विकले असे तुम्हास मिरासी करून दिधले असे सुखे लेकराचे लेकरी खाउनु सुखे असणे आपल्यास आम्ही मिरासी भाऊ तुम्हास केले असे देसमुखाचे सिके व देसपाडियाचे दस्कत करून देउनु जरी कोण्ही मिरासीदार कुलकरणासी अगर जोतिसास उभा राहिला तरी आम्ही मोकदम व बाराहि बलुते व समस्त बापभाऊ व मिरासीदार कुणबी ऐसे त्यास निवारून अगर आणीक हर कोण्ही कुलकरणास व जोसीपणास हरकती करील त्यासहि आपण वारून तुम्हास कोण्हेची निसबति नाही तुम्ही सुखे लेकराचे लेकरी खाउनु सुखे कुलकरण व जोतीस खाऊन जो वाडा दिधला आहे तेथे नादोन सुखे असणे राजणगाव तर्फेच्या गावगणाचे मोकदमाचे गोंही नागर करून देऊन वाडा कुममटाचा घर आहे ते बाधोनू सुखे लेकराचे लेकरी नादणे व मला बागाईत पाटा खाले बिघे ८१० आहे तेहि तुम्हास मिरासी करून दिल्हे असे सुखे राहोन खाणे जो गावाच्या बागाईतास महसूल पडेल तो देत जाणे तुम्हापासुनु होनु १५० दीडसे कुलकरणाचे वे जोसीपणाचे घेतले असे ते आण तुम्हास कुलकरण व जोसीपण व घरवाडा व मला मिरासी करून दिधले असे सुखे लेकराचे लेकरी खाउनु असणे यासी जरी आम्ही बेइमान करून तरी श्री-देव आमचे खराब करील हा मिरासी पत्र महजर सही

ले. ४२८ } { श. १६१४ माघ शु.१३
इ. १६९३ फेब्रु. ८

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १९ अंगिरानाम संवछरे माघ शुध त्रयोदसी सौम्यवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यासी आज्ञा केली ऐसी जे विनातिपत्र पुरवणी

पाठविली ते प्रविस्ट जाली ताा सोनवले प्रा भिवडी येथील देसमुखी आपल्या वडिलानी भोगवटियानसी खादली आहे राजश्री निलोपंताच्या आजियाचे वेळेस मुतालिक ठेविला होता तोच बलाऊन देसमुखी करावयास लागला आमचे तर्फेचे १४ खून केले आहेत तीर्थ-स्वरूप कैलासवासी स्वामींचे वेलेस रदबदल केली होती त्यास तुमचे वतन तुम्हांस देऊ म्हणोन मान्य केले परंतु आजिपर्यंत तैसाचि गोस्ट राहिली प्रस्तुत मोगलाचे ठाणे तेथे मजबूद आहे काही प्रात्पवा विषये नाही परंतु वाडिलाचे वतन आपणास द्यावया आज्ञा केली पाहिजे. म्हणोन लिहिले त्यावरून स्वामी कृपाळू होऊन ताा सोनवले प्रात भिवडी येथील देसमुखीचे वतन तुम्हास आजराम-हामत करून दिल्हे असे वतनाची सनद निराली देशाधिकारी याचे नावे सादर केली असे व राजश्री शंकराजी पंडित सचीव यासहि आज्ञापत्र पाठविले आहे ते पावते करणे आणि ताा मारचे देसमुखीचे वतन पुत्रपौत्री आनभवीत जाणे जाणिजे *बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा

मर्या

देयं विरा

जते

ले. ४२९ } {श. १६१५ ज्येष्ठ व १३
इ. १६९३ जून २१

श्री

राजारामस्य

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २० श्रीमुखनाम संवत्सरे ज्येष्ठ बहुल त्रयोदसी सौम्य-वासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी सौभाग्यवति जानकीबाई यासि

†श्री।। राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वर सुत नीलकं
ठ मुख्य प्रधान

‡श्रीलक्ष्मि
नृहरि प्रीते
मुद्रा नीराजी
जन्मनः राजा
राम प्रतिनिधि
प्रल्हादस्य
विराजते

दिल्हे वृत्तिपत्र ऐसे जे तुमचे भर्तार राजश्री रामचंद्र पंडित आमात्य याही स्वामीच्या राज्यानिमित्य बहुत श्रम करून राज्याची अभिवृधिता केली आणि कीर्ति संपादिली याकारिता मानुलेश्वरी स्वामि संतोषी आहेती व तुमचे ऊर्जित करून चालवणे स्वामिस बहुत अगत्य यास्तव तुम्हांस नूतन इनाम मौजे मुरवाड ताा संगमेश्वर देह १ येक कुलबाब कुलकानु हालीपटी व पेस्तरपटी निधि-

---

* येथून अक्षर निराळें बहुधा छत्रपतींचें ‡ सीमा षट्कोनी. † आकार लंबवर्तुळ.
§ आकार अष्टकोनी

निक्षेपजलतरुपाषाण झाडझाडोरा पडले पान सहित गांव इनाम दिल्हा असे हा गाव तुम्ही आपले स्वाधीन करून तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप असणे

*[1]निदेश समक्ष

साां संमत — [1]मर्या

सचीव — देयं विरा

तेरीख २६ — माहे सौवाल — जते

सौवाल सुा आर्बा तिसैन

वार सुद — सुरु सुद बार

ले. ४३० } {श. १६१५ ज्येष्ठ व. १३
इ. १६९३ जून २१

श्री.



स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २० श्रीमुखनाम संवत्सरे जेष्ट बहुल त्रयोदसी सौम्य वासरे क्षत्रीयकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति याणी चिरंजीव ठकुबाई यास दिल्हे वृत्तिपत्र ऐसे जे तुमचे बाप राजश्री रामचंद्र नीलकंठ अमात्य याही स्वामीची सेवा बहुत एकनिष्ठपणे केली आहे आणि स्वामीच्या राज्यानिमित्य बहुत श्रम करून राज्याची अभिवृधीता केली त्यावरून स्वामी तुम्हावरी बहुत संतोषी होऊन तुम्हांस दुदभातानिमित्य नूतन इनाम मौजे कडवै ताा संगमेश्वर देह १ येक कुलबाब कुलकानु ह्याली पटी व पेस्तर पटी जलतरुपाषाण झाडझाडोरा निधिनिक्षेप पडले पानसहित गाव

---

* अक्षर निराळें १ आकार बहुदळी २ मुद्रा व सीमा ले. ४२९ प्रो.

इनाम दिल्हा असे हा गाव तुम्ही आपले स्वाधीन करून घेऊन दुदभात भोजन करून सुख-रूप पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम अनभऊन असणे* निदेश समक्ष

सां संमत
सचीव

तेरीख २६ माहे सौवाल
सौवाल सुा अर्बा तिसैन
बार सुद सुरु सुद बार

ले. ४३१ } {श.१६१५ ज्येष्ठ व. १३
इ. १६९३ जून २१

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २० श्रीमुखनाम संवत्सरे जेष्ठ बहुल त्रयोदसी सौम्य वासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणि हवालदार व कारकून वर्तमान व भावी तां संगमेश्वर यांसि अज्ञा केली ऐसी जे राजश्री रामचंद्र नीलकंठ +मात्य यानी स्वामिची सेवा बहुत येकानिष्ठपणे केली आहे व या राज्याकारणे बहुत श्रम करून राज्याची अभिवृधीता पाविवली आहे यानिमित्य स्वामि मानुलेवरी बहुत संतोशी होऊन यांचा स्त्रीस व कन्येस नूतन इनाम गाव दोन दिल्हे तां मार पैकी

सौभाग्यवती जानकीबाईस इनाम मौजे मुरबाड देह १
चिरंजीव ठकुबाईस दुदभातानिमित्य इनाम मौजे कडवई १

येकून देह २ दोनां कुलबाब कुलकानु हाली पटी व पेस्तर पटी निधिनिक्षेप जलतरु पाषाण झाडझाडोरा पडले पान सहित गांव इनाम दिल्हे आहेत हे दोन्ही गाव उभयेताचे स्वाधीन करून यास व याचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने इनाम चालवणे वर्ष प्रतिवर्षी नवीन पत्राची अपेक्षा न करणे पत्राची प्रति लिहून घेऊन असल पत्र याजपासि परतोन देणे जाणीजे ‡निदेश समक्ष×

सां संमत
सचीव

तेरीख २६ माहे सौवाल
सौवाल सुा अर्बा तिसैन
बार सुद सुरू सुद बार

---

* अक्षर वेगळें + हस्तदोषानें मागील 'अ' राहिला आहे. ‡अक्षर वेगळें व सीमाबहदळी. ×मुद्रा व सीमा ले. ४२९ प्रो.

ले.४३२} {श.१६१८ आषाढ शु. १३
इ १६९६ जुलै २

श्री

राजश्री कासी रगनाथ सभासद नामजाद सीमहाल सुभा प्रात राजापूर गोसावी यासि

अखडित लक्षुमी आलकृत राजमान्य—सेवक रामचद्र नीलिकठ आमात्य नमस्कार सुहुर सन सबा तिसैन अलफ राजश्री—स्वामीचे आज्ञापत्र राजश्री रामाजी अनंत मुख्य देशाधिकारी सरसुभा—यासी सादर आहे तेथे आज्ञा की राजश्री रामचद्र नीलकंठ याणी विनतिपत्र पाठविले तेथे लिहिले की आपणास निरोपद्रव वौशपरंपरेने चाले ऐसे वतन मेहरवान होऊन दिल्हे पाहिजे ह्मणऊन त्याजवरून वतनाचे विसी मनास आणितां मामले प्रभावली येथील आठरा माहालीची सरदेशमुखी रंगोवा नाईक याचे वडिलास आदलशाई पातशाहा होता त्याणे फर्मान करून दिल्हा आहे त्यामध्ये ता खारापाटण हा माहाल आहे परंतु खारापाटणास मुसलमान मुकासी होता त्याणे रगोबा नाईकाचे वडिलांस भोगवटा चालो दिल्हा नाही त्या आलिकडे राजश्री कैलासवासी स्वामीस हा देश हस्तगत जाहला त्या कालापासून हा काल पावेतो रगोबा नाईक याचे वडिलास अथवा रगोबा नाईक यास भोगवटा जाहला नाही वतनदारास वतनाचा भोगवटा बहुत दिवस तुटला ह्मणिजे त्या वतनास वतनदारास समध नाही ऐसे आहे या करिता या वतनास रगोबा नाइकास अर्थाअर्थी समध नाही ऐसा निर्वाह केला आणि राजश्री रामचद्र नीलिकठ भारद्वाज गोत्री हे स्वामीचे पुरातन सेवक स्वामीचे राज्य वृद्धीते पावावे ऐसाच चित्त धरून अतःकर्णपूर्वक स्वामीसेवा करीत आहेत राजवृद्धीस कारण हे सेवक ऐसे जाणोन यांजवरी मालूक होऊन तपे मजकुरचे सरदेशमुखी वतन यांस अजरामरावहमत करून दिल्हे असे हे वतन यांचे स्वाधीन करून या वतनास इनाम गाव मौजे पोवुरले देह १ व मौजे कोकिसरे देह १ येकून देह ह २ कुलवाब कुलकानु देखील हाली पटी व पेस्तरपटी जलतरु पाशाण झाडझाडोरा पडिले पान सहित खेरीज हकदार व इनामदार करून गाव चतुःसीमा भूमी पूर्व मर्यादेप्रमाणे हकलवाजेमा व इसापति पानमान पटिपछोडी यासी याचे पुत्रपौत्रादि वौशपरंपरेने सुरक्षित चालणे प्रतिवर्षी नवीन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राची प्रति लिहून घेऊन मुख्यपत्र यापाशी देतोन देणे यासी हिंदु कोण्ही कथला करील त्यास गोहत्या ब्रह्महत्या केल्याचे पातक लागेल मुसलमान कोण्ही इस्कील करील त्यास सोर मारिल्याचे पातक लागेल ऐसी पातके जाणोन यासी वतन सुखरूप चालवणे ह्मणऊन आज्ञा आहे ऐसीयासी तर्फ मजकूर हा माहाल प्रस्तुत तुम्हाकडे कमाविसीस आहे या करिता तुम्हास लिहिले असे तरी तपे मजकूचे वतन सरदेशमुखी राजश्री रामचद्र नीलिकठ भारद्वाज गोत्री याचे स्वाधीन करणे आणि सरदेशमुखीचा कार्यभाग दडक प्रमाणे मारनुलेपासून घेत जाणे या वतनास इनाम गाव व हलवाजिमा पटीपछोडी दिवाण दस्त खड वैगरे महसूल देखील आकार होईल ते बेरीजेस खेरीज दस्त लवाजिमा

इनाम देह २

मौजे पो (बु) रले
१

मौजे कोकिसरे
१

हकलवाजिमा पटी पछोडी दिवाण दस्त
दो खड व गैर महसूल आकार होईल
त्यास +रयत निसबतीने कलम २

खेरीज दस्ती बाब लवाजिमा मोईन

१ कुणबा गाव असेल त्यास
सालिना लोणच्याचा जिनस
उझे निम -॥-
१ कुभाराच्या आवियास मडके
येक
लाकडाचे भारे सालिना
दर गावास पांच ५
राहाणूक दर गावास
सालिना पंधरवडा
गुरव येक माहार येक
१ १

येकून दोन आरा कलम
येक १

इरले दर गावास सालिना येक
१
जेव दर गावास सालिना
कलम निम -॥-
पारधीस
१ डुकरास सिसाल येक
१ साबरास सात येक
१ वरकड पारधीस
भाकसी येक
———
३
येकून तीन आरा कलम
येक १

येकून सात बाब आरा कलम १

येणे प्रमाणे इनाम गाव दोन व हक लवाजिमा पटी पछोडी दिवाण दस्तास रयेत निसबतीने दरसदे कलम दोन व खेरीज दस्तीबाब लवाजिमा कलम येक व पान मान आधी सरदेसमुखास त्या उपर पूर्वदंडक वरकड वतनदारास येणेप्रमाणे चालवणे या पत्राची प्रति लिहून घेऊन असल पत्र माघारुलेस भोगवटियास परतोन देणे §छ १२ जिल्हेज

निदेश समक्ष

श्रीरामचं
द्र चरणीं नीळ
कंठ सोनदे
व शीरण
बार

++
++समु
ख्मति

सुरु सुद बार*

+ दुसऱ्या दोन पत्रांत "त्यास दरसदे रयतनिसबतीनें" असे आहे.

§ येथून अक्षर निराळें.

* या प्रमाणेंच आणखी दोन पत्रें आहेत. एक खुद्द रामचंद्र नीळकंठांनीं 'रामाजी अनंत देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सरसुभा प्रांत राजापूर" यास लिहिलें असून त्यांत आरंभीं ' स्वामीचें आज्ञापत्र तुम्हांस सादर आहे वगैरे' म्हटलें आहे. दुसरें पत्र रामाजी अनंत यांनीं " लक्ष्मण रंगनाथ हवालदार व कारकून वर्तमान व भावी तो खारेपाटण " यांस लिहिलें आहे. त्यांत आपणांस पंत आमात्य यांचें आज्ञापत्र आहे असें आरंभी म्हटलें आहे पण स्वामीच्या आज्ञापत्राचा उल्लेख नाहीं.

ले ४३३ } { श. १६१८ श्रावण शु० १
इ. १९९६ जुलै १९

श्री

‡ श्री
द्वितीयेंदुरिवा
त्यर्थं वर्धमाना दि
नेदिने अनंतसू
नो रामस्य मुद्राभ
द्रां विराजते

अज सरसुभा राजश्री रामाजी अनंत सरसुभेदार व कारकून सुभा प्रा॥ राजापूर तहा खोत कुलकर्णी व गावकर स्यानी मौजे कोकीसरे ता॥ खारेपाटण सुहुर सन सबा तिसैन व अलफ राजश्री रामचंद्र नीलकंठ भारद्वाज गोत्री यावरी राजश्री—छत्रपति स्वामी कृपालु होऊन तपे मजकूरचे सरदेशमुखी वतन यासी अजरामराहमत करून दिल्हे असे हे वतन याचे स्वाधीन करून या वतनास इनामगाव मौजे पोधुरले देह १ व मौजे कोकीसरे देह १ येकून देह दो कुलबाब कुलकानु देखील हाली पटी व पेस्तरपटी जलतरुपाषाण झाडझाडोरा पडले पान सहित खेरीज हकदार व इनाम दार करून गाव चतुः सीमा भूमि पूर्वमर्यादेप्रा॥ व हकलवाजिमा व इसापत पटी पछोडि यांसी याचे पुत्र पौत्रादि वौशपरंपरेने सुरक्षित चालवणे म्हणून राजश्री—छत्रपति स्वामीचे आज्ञापत्र त्याप्रा॥ राजश्री—पंतस्वामीचे आज्ञापत्र सादर जाहले त्यावरून मौजे मजकूर इनामगाऊ कुलबाब कुल कानु देखील हालीपटी पेस्तरपटी जलतरुपाशाण झाडझाडोरा पडले पान सहित खो॥ हकदार व इनामदार वजा करून मा॥निलेचे· दुबाले गाव केला असे तरी साल मा॥रपासून वसूल मा॥नुलेकडे देत जाणे छ २९ जिल्हेज मोर्तब सूद!

वीलसति
लेखना व-
धि मुद्रा

———

‡ मुद्रा व सीमा यांचे आकार वाटोळे.

† या प्रमाणें दुसरें पत्र " मिरासी व माहाजन व कुलकर्णी मौजे पोभुरले ता॥ खारापाटण " यास आहे. त्यांतहि " वजा " ही अक्षरे शोधवजा वर घातलेलीं आहेत.

ल. ४३४ } { श. १६१९ अश्विन शु. ३
इ. १६९७ सप्टें. ८

श्री.

*राजश्री सुभेदार व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रात मावले राजगड गोसावी यासि अखडित लक्षुमी आलकृत राजमान्ये-सेवक शकराजी नारायेण सचीव नमस्कार सुा समान तिसैन अलफ राजश्री रामचद्र नीलकठ भारद्वाज गोत्री याणी हुजूर विदित केले की मौजे केलवाडे ताा खेडेबारे येथे इनाम जमीन जिराईत चावर १येक इनाम हरि गोविद कोडलकर आपला मातुलवंश याचे नावे कारकीर्द दर कारकीर्द भोगवटा चालत होता हरि गोविद मृत्य पावलियावरी आपले आजे सोनाजी नारायेण याणी कारकीर्दी रा दादाजी कोडदेउ सदरहु इनाम भोगवटा अनुभविला कारकीर्दी कैलासवासी स्वामी आपले बाप निलो सोनदेउ यानी भोगवटा कितेक दिवस अनभविला दरम्यान **राजश्री कैलासवासी स्वामीनी देशामधे बटाई केली ते प्रसगी कुल इनाम अमानत केले होते** त्या उपरी कैलासवासी राजश्री सभाजी राजे याचे कारकीर्दीस इनाम आपण भोगवटा अनभविला आहे मध्ये **मोगलाचे राजकारण जाहले त्याप्रसगी विलायेत खराब पडिली** या करिता भोगवटा राहिला हाली राजश्री-छत्रपति स्वामीने शत्रु पराभवाते पाऊन राज्य सुरक्षित केले देश वसाहत केला वतनदाराचे व इनामदाराचे इनाम दुमाले केले तरी आपलाही इनाम चावर आपले दुमाले करून सनद सादर केली पाहिजे म्हणून विदित केले व दस्तमली हरि गोविद याचे नावे इनाम चावर येक दाखल आहे त्याचा मातृवंश राजश्री-रामचद्र नीलकठ व त्याचे वडील याणी पूर्वीपासून भोगवटा अनुभविला हाली इनाम जिराईत जमीन चावर विसापाडाचे विघियाचे दर थल चावर १येक कुलबाब कुलकानु देखील हाली पटी व पेस्तरपटी खेरीज हकदार राजश्री रामचद्र नीलकठ याचे दुमाला केला असे देह याचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरा भोगवटा अनुभउनु राजश्री छत्रपति स्वामीस कल्याण चितिति तुम्ही सदरहु चावर इनाम याचे दुमाले करणे दर हरसाल ताजा सनदेचा उजूर न करणे तालिक लेहून घेऊन असल भोगवटियासि मारनूले पासी देणे १छ रबिलोवल संदेश समक्ष

श्री शंकराजी नारायण — पत्रा वधि रयं भाति

बार सुरु सुद बार

बार — बार

---

* ह्याच तारखेचें व मजकुराचें एक पत्र शंकराजी नारायण यानें खेडेबोरच्या देशमुखांना लिहिलें आहे.

१ अक्षर निराळें. नेहमीं ' निदेश ' असतें येथें " संदेश आहे " मुद्रा व सीमा बहुदळी

ले. ४३५ } { श.१६३० आषाढ व. ६
इ. १७०८ जून २८

श्री

*स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ३५ सर्वधारी संवत्सरे आषाढ बहुल शम्टी इंदुवासर क्षत्रिये कुलावतंस श्री राजा **शिवछत्रपति** याणी समस्त राजकार्ये धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री **नारो** पंडित यासी आज्ञा केली ऐसि जे तुम्ही स्वामीचे कदीम कार्याचे सेवक आहा तुमचे सर्व प्रकारें चालवणे हे स्वामीस अगत्य व आवश्यक याकरिता तुम्हास जंजिरे **विजयेदुर्गी** राहावयाची आज्ञा केली आहे तरी तुम्ही आपल्या समुदायानसी जाऊन पहिले **विजयेदुर्गी** होतेस तैसे तेथे राहणे तुम्हास पहिले दोनी गाव होते ते करार करून द्यावयाविषी राजश्री **रामचंद्रपंडित** अमात्य यास आज्ञापत्र सादर केले आहे ते दोन्ही गाव तुम्हाकडे चालवितील तुम्ही दुसरा मनात न आणतां **विजयेदुर्गी** जाऊन राहाणे स्वामी तुमचे चालवायास अंतर करणार नाहीत. +बहुत काये लिहिणे

¶मर्या
देयं विरा
जते

ले. ४३६ } { श. ?
इ. ?

श्रीरामवरद

तीर्थरूप राजश्री ———————— **दादा** वडिलांचे सेवेसी

अपत्ये **सिवराम**ाने चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टाग नमस्कार विज्ञापना उपरी येथील क्षेम ता॥ वैशाख वद्यपर्यंत सुखरूप असो विशेष माझे वडिली पाळणपोषण केलें वडिली मला त्या मार्गात ठेविले होते ते कालवशेकडून उभयेताची दर्शने जाहाली आम्हास माहाराजानी **पा**राशरच्या माहाराजांच्या हाती दिल्हे त्याजबराबर **को**लापुरास आलो वडिलांचे आमचे दर्शन जाले माझी तो वडिलांच्या पायासी निष्ठा परंतु सागणीवागणीमुले परस्परे विकल्प वाढला त्याजवरून वडिलीं मजपासून क्रिया घेतली की आपण तीर्थरूप मिलेला मला वडिलाच्या पायाविना दुसरा विच्यार असेल तर श्री-रघुवीर साक्ष माझे वडिली चालवावे नावारूपास आणावे पुत्रत्वाप्रमाणे चालवावे थोर पदीस चढवावे हे वडिलास विदित असे कितेक मनुष्ये वडिलापासी गोष्टी सांगतील त्या वडिली न ऐकाव्या आम्ही ऐकणार नाही लिहिल्या पत्राप्रमाणे वडिलीं अतर देऊ नये आम्ही अतर कदा पडूं देणार नाही आम्ही वडिलाचे वंशपरंपरेने चालऊ वडिलाचे कुटुंब जितके असेल तितक्याचे

---

*याच तारखेचें व लेखकाचें एक पत्र रामचंद्र निलकंठ अमात्य याचे नावचें अस्सून नारो पंडितास ' विजयेदुर्गी राहो देणे' म्हणून आहे. +अक्षर निराळें. ¶ सीमा षट्कोनी.

चालऊ हा कागद लेहून दिल्हा सही सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना लक्षशतनी प्रसग वंशपरे परेने सत्ये चालवावे हे विज्ञप्ती

ले. ४३७ } { श. ?
इ. ?

* श्रीसंकर प्रसन

राजमान राजश्री भगवतराव पडित यास आज्ञा केली ऐसी जे तुम्हाकड रा रामाजीपत व इटल कृष्ण पाटील आहेत हे जे सागतील ते स्वामीचे वचन जानो त्याप्रमान मान करून स्वामीच्या दरसनास मजल दर मजल येने नारिग व केला पाठिवली आहेत ते घन बहुत लिहिन मुज्ञ असा

सातारा शिर्के.

श्री

ले० ४३८ } {शक १६४० कार्तिक व. १
इ० १७१८ नोव्हें ८

*श्री
वर्धिष्णु विक्रमो
र्वि + + + + + +
वामनी शं + भुसूनो
रसौ मुद्रा शिवरा
जस्य राजते

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबी नाम संवत्छरे कार्तिक बहुल प्रतिपदा मृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शाहु छत्रपति स्वामी याणी राजश्री पिलाजीराव बिन गणोजीराव सिर्के देशमुख मामले दाभोल यासी दिल्हे वतनपत्र यैसे जे तुमचे चुलते राजश्री देवजी सिर्के स्वामीसंनिध किले साताराचे मुकामी येऊन विदित केलें कीं दाभोलची देशमुखी देहाये दुतर्फा येक हमजाबाद उर्फ गडे विलायेत व येक जाफराबाद उर्फ खेड विलायेत येकून सातसे वीस देह व कसब व बंदर दाभोल मामले मैमून मुस्तफाबाद येथील देसमुखी वतन पूर्वी ब्राह्मणाचें त्यास या ब्राह्मणापासून अगा रजाचे कारकीर्दीस आदलशाहा पादशाहासी हरामखोरी जाली याबद्दल पादशाहानी ते देशमुख ब्राह्मण कबिल्यासमेत जहाजावरी चढऊन बारा आरबास पाठऊन मुसलमान केले देशमुखी वतन अमानत केले ते कितेक वर्शे अमानत असतां *धंमपुरी रा सूर्याजीराजे सुर्वे प्रभानवली-

---

*हें संबंध पत्र शाहु छत्रपतींच्या हातचें आहे. १। मुद्रा बदामी. २। मुद्रा अष्टकोनी.

कर होते त्याणी आपली लेंकी रा। पिलाजीराऊ सिर्के यांस देऊन सोईरक केली तेव्हा पातशाहांस विज्यापुरीं अर्ज पोहचून पिलाजीराव यास दाभोल मामल्याचा देसमुखी मागितली पादशहा मेहरवान होऊन देशमुखी वतन मन्हामत केले वतनाचा भोगवटा व्हावा तों कैलासवासी छत्रपति थोरले स्वामीस तलकोंकण कबज जाले त्या प्रसंगी वतनाचा भोगवटा न जाला त्याउपरि कितेक मुदत जाल्यावरी पिलाजीराव यांसी राजश्री स्वामीनी सोइरीक केली अपली लेंकी राजकुंवरबाई गणोजीरायास दिल्ही पिलाजीरायांची लेकी जिऊबाई राजश्री राजे यांस केली पिलाजीरायांवरी कृपा करून चालवीत होते यैसे अस्तां लखम सांवत सरदेसाई पा। कुडाल भीमगड फोंडे प्रांते फिसाहत केली कोंवण वसाहत न व्हे यैसे जाले याकारितां राजश्री स्वामीनी पिलाजीरायांस आज्ञा करून लखम सांवताकडे पाठविले ते जाऊनु त्यास भेटोन कितेक प्रकारें त्यासी बोलोन त्याचा शक तोडूंन अणभाश किया देऊनु लखम सांवतास राजश्रीचे भेटीस अणिलें महाडचे मुक्कामी भेटी केली लखम सावताचा तह करून त्यांस त्याचे वतनावरी ठेविले पिलाजीरायानी अर्ज केला जे उर्जित स्वामी करितात तरी अक्षये उर्जित करावें मामले दाभोल्चे देशमुखींचें वतन अदलशाहानी आपणास मन्हामत केले आहे त्याचा भोगवटा जाला नाहीं तें वतन अपलें अपणास देउनु चालवावे त्यावरून राजश्री स्वामीने आज्ञा केली कीं आपल्या राज्यांत वतनें द्यावयाचा दंडक नाहीं परंतु तुम्ही स्वामी कार्ये केले व सोइरीकहि तुम्हांसी जाली तरी चिरंजीव राजकुंवरबाईस पुत्र होईल तेव्हां हे देशमुखी वतन अपण देऊनु ते आज्ञा मान्य करून उमेदवार राहिले त्याउपरि राजश्री स्वामी राज्याधिकारी जाले तेव्हां तो प्रसंग करावा तरी राजकुंवरबाईस पुत्र जाला नव्हता म्हणून प्रसंग न केला यानंतर राजश्री स्वामी राज्याधिकारी जाले तांब्राचे दाटीचे प्रसंगे कर्नाटकांत चंजी प्रांते गेले तिकडे तांब्राच्या फौजा झुलपुकारखान जाऊन चंजीस वेढा घातला तेव्हा राजकारण करून राजश्री स्वामी चंजीतून निघोन वेळुरास गेले त्या वेलेस गणोजीराव मोगलाचे चाकर अस्तां राजश्री स्वामीस रात्रीचे अरणीस पाठविले व सौभाग्यवति ताराबाई व राजसबाई राजकुवरसहित चंजीऊन काढून अरणीस पाठविली या सेवेमुले राजश्री संतोशी होऊनु अक्षये वतन द्यावयास उदित होऊनु काये पाहिजे ते मागा यैसी आज्ञा केली तेव्हां गणोजी राजे याणी विज्ञापी प्रविष्ट केली जे दाभोलची देसमुखी अदलशाहानी अमानत केली होती ते अपले बाप पिलाजीरायांस मेहेरबान होऊनु दिल्ही परंतु भोगवटा न जाला त्या वतनावरी कोही वतनदार नव्हता म्हणोन चंजीचे मुकामी राजश्री खंडो बलाल चिटनवीस यांस स्वामीनी कृपाळू होऊनु दिल्ही आहे यैशास राजश्री थोरले स्वामीनी अपणास अंदण देऊ यैसे अभये वचन दिल्हे त्यांचे वचनाप्रमाणें आपणास पुत्र जाला आहे पिलाजीराव नाव ठेविले असे तरी तें वतन अपणास द्यावे वाडिलांचे अभये वचन सत्य करावें हेच अपणास मागणें आहे त्यावरून राज-

श्रीनी खंडो बलाल यांचे समाधान करून दुसरे वतन देऊं केले अणि दाभोलचे देखमुखीचें वतन गणोजी राजे यांस दिल्हे पत्रे करून दिल्हीं राजश्री खंडो बलाल चिटनिवीस यांस पत्रें दिल्हीं होतीं तेहि घेऊन गणोजी राऊ यांजपासी दिल्ही वेळूराहून राजश्री स्वामी स्वार होऊन स्वराज्यास स्वदेशास आले रामोजी सिर्के बिन कान्होजी सिर्के गणोजी रायांचे पुतणे यांजपासी वतनाचीं पत्रें देऊनु इकडे पाठविले इकडे आलियावरि रामोजी सिर्के यांणी वतन चालवावयाबदल ताकीद पत्रें मागितली ती राजश्री स्वामीनीं देविलीं त्या पत्रांत अपलें नांव घालून राजपत्रें घेतली आणि वतनाची कमावीस करू लागले अपणास वतनास दखल होउ देतनासे जाले त्याचा आमचा कथला होऊ लागला, चिरंजीव पिलाजीराऊ कर्नाटकांत राहिले गणोजीराऊ निवर्तले यैसे असतां कितेक दिवसी रामोजी सिर्केंहि भांडणी पडले त्यांचे भाऊ विठोजीराव व दौलतराऊ सिर्के व रामोजी सिर्के यांचे पुत्र कान्होजी व बहिर्जी सिर्के हे वतन बलावुनु अनभव करितातीं अपणास काही देत नाहींत तरी स्वामीनीं करिना मनास अणून गणोजीरायाचे वतन त्यांचे पुत्रास अपण बंधू अपणास दिल्हे पाहिजे म्हणून विदित केले ते स्वामीनीं अंतःकर्णास अणून याची व त्यांची मनसुफी करावी स्थल व गोत लाऊन द्यावें यैसे करून विठोजीराव व दौलतराव व कान्होजी व बहिर्जी सिर्के यांस हुजूर आणून गोतांत राजीनामे द्या म्हटले व स्थलास जाऊन वेव्हार सांगा गोतमुखें न्याये होईल त्याप्रमाणें वतन चालविले जाईल यैसी आज्ञा केली त्यास विठोजी व वरकड मान्य नव्हेत राजीनामे नेदीत नस्ती दिलात घेऊन कथले करूं लागले त्याउपरि स्वामीने चंजीस सरकारकून होते त्यामधें जे सरकारकून हाजीर आहेत ते व राजश्री शंकराजी मल्हार मोगलाईतील सैदांचे तर्फेने आले होते ते व राजश्री मानसिंग मोरे खंडेराव दाभाडे सेनापति हेहि चंदीस राजश्री काका स्वामी संनिध होते त्यांस बोलावून व राजश्री सुलतानजीराऊ निंबालकर सरलस्कर व वरकड भले लोक व कितेक परगणियाचे देशमूख देशपांडे मोकदम व मख्तसर लोक सभेस बैसवून त्यांस याचा करिना पुसिला तेव्हां समस्तानीं विदित केलें कीं देवजी सिर्के याणी करिना विदित केला तो यथार्थ आहे वतन गणोजीराऊ सिर्के यांस दिल्हें रामोजी सिर्के त्याचे पुतणे म्हणून त्याणी वतनाची पत्रें त्यांपासी देऊन इकडे पाठविले तेवढीयानेंच रामोजी व त्याचे भाऊ वतन अनभऊ लागले वतनाचे खावंद विठोजी व दौलतराव व कान्होजी व बहिरजी सिर्के हे खोटे यैसे कलो आलें त्यास सदरेवरून उठऊन दूर केलें स्वामीस थोरले कैलासवासी स्वामींचें वचन प्रतिपालावें व कैलासवासी राजश्री काका स्वामींचें दत परिपालण करावें हें अगत्य वडिलाचें चालवावे हेहि अगत्य म्हणून तुम्हावरी स्वामी कृपाळू होऊनु मामले दाभोलची देसमुखीचे वतन तुम्हासच बाहाल केले असे तुम्ही व तुमचे पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेने वतनाचा उपभोग करून दंडकप्रमाणें वतनाची सेवा करीत जाणें य

बतनास रामोजी सिर्के याचे पुत्रास व विठोजी सिर्के व दौलतराऊ सिर्के यांस समंध नाहीं जाणिजे *लेखनालंकार (सीमा)

रुजु सां
मंत्री

बार सुद सुरु सुद बार बार

कुडाळ देशमुख.

ले० ४३९ } {श० १५८६ श्रावण शु. १०
{इ. १६६४ आगस्ट २२

श्रीमेरुलिंगाची

सीवाजी राजे

† माहाजर बतारीख ८ माहे मोहरम बीहुजूर हाजीर मजालसीयानीं प्रो का कुडाल स्वस्ती श्री सालिवान सके १५८६ क्रोधीनाम संवछरे स्रावण सुध दसमी सुक्रवार

			रायाजी बिन भान पडित कनोजा (कट्यार)
चांदखान बिन कमाल खान सरणोबत किले चदन (कट्यार)	सीकरखान हुदेदार का कुडाल (शिक्का फारसी)	साबाजी बिन तुकाराऊ कनोजे (शिक्का फारसी)	
सूर्याजी बिन रामजी येसवतराउ बाणकरी (एक निशाणी)	विसो पुंडलिक सर (गुन्हो) समत देहाये पा। कुडाल (शिक्का फारसी)	नखोजी ना। बिन तुकाजी ना। पिसाल देसाई मो उझर्डे पा। वाई	विठोजी ना। कोडे देसमुख ता। खेडबारे
	आबा सेटी बिन हर सेटी सेटिया का। बुधण (तागडी)	चांगोजी बिन धारोजी सेटिगा (खंजीर)	खानाजी बिन चिमनभाई (खंजीर)

---

* येथून अक्षर निराळें व सीमा षट्कोनी † असाच (याच तारखेचा व एकाचेच हातचा) दुसरा महजर. बापूजी बिन रतनोजी नाईक यास सूर्याजी नाईकाने लिहुन दिला आहे मजकूर दोहोंचा एकच आहे. फक्त आम्हास तेथें तुम्हास वगैरे योग्य ते फेरफार आहेत

विसाजी माभलेस्वर देसकुलकर णी बी कलम खु

बापूजी नागोजी देस कु- लकरणी

गगाजी पाा बिन नरसीन्ह पटेल वा सारे नाडगौडा वा मोकदम वा तान्हाजी चौगला काा मजकूर (नांगर)

गणसेटी व बक्सेटी सेटिया व ख- ड सेटिया माहाजन काा माार (तागडी)

आबाजी वा बाजी बाबाजी काा माार (एक चित्र)

बाबाजी पटेल मौ सेते (नांगर)

बापूजी अ- वसरा (कात्री)

बहिरोजी म्हेतर दरजी (कात्री)

पदाजी ह्येतरीया दुलाई (कुंचला)

बाघोजी सालवी व बाकोजी सालवी कुभार काा माार (चाक)

भाल ठाकूर (एक चित्र)

राया बिन भानजी व खड बिन भिऊ चाभार.

लिग जोसी

जाउजी भ- डसी

कान्होजी व घाटा राउत

सुा खमस सितैन अलफ कारणे जाहाला माहजर ऐसे जे सूर्याजी नाईक बिन तुबाजी नाईक देसमुख पाा कुडाल यास बापूजी पाा बिन रतनोजी नाईक देसमुख पाा मजकूर याने हाजीर मज्यालसी या हुजूर लेहून दिल्हे माहाजर ऐसे जे आम्हास माहाराज राजश्री ———— राजेसाहेब भोसले यानी दस्त करून नेउनु किले वासो टियावरी साल येक अदबखाना राखोन कैदसा ठेविले मग अपले बाबा मुले लोकी मध्योवर्ती पडोन अपणास करारती बाधले त्यास हर सेटी सेटिया काा बाउधाणे व अणिक तिघ जण जमान जाहाले जे बेकुसूर दिवाण नफराई करावे वा करारतीचे पैके उसूल करून द्यावे म्हणऊन सोडऊन गावास आलो करारतीचे पैके जबर उसुलातीस जागा नाही म्हणउनु आपले बापभावास आपले तकसीमेचे इनाम विकितो म्हणउनु पुसिले त्यावरी ज्यासी टाकले (टोकले) तो घेणे नेटके (नेटके) तरी मी आणिकास विकितो म्हणऊन सदरहू बिरादराचे रजावरून काा कुडालस येउनु को मजकुरी हकमधे आमचे तकसीमेचे

हकाचे ऐवजे जमीन बिघे १५ वाडा भिताडा नजिक बेलाचे सेतासेजारील दादमदाल अम्ही खात आलो ते सदरहू जमीन पधरा बिघे तुम्हास विकत दिल्हे दर बिघेस होन १ येकून होन पंधरा तुम्हापासी घेउनु अवलादी व अफलादी लेकराचे लेकरी तुम्हास मिरासी करून दिल्हे असे त्यास हिला हरकर्ता अगर फितवा फादडा कराविया निसबत नाही मौजे कसबे मजकुरी बिलगाचे हक व पेठेचा हक व बाजे आमचे तकसीमचे कानु कायदा आम्ही घेउनु तुम्हास जमीन दिल्हे ते सालाबाद खाउनु सुखे असणे आमचे तरफेचे भाऊबंद दाईजे कुसूर केलिया आम्ही निवारून यास अनुसारिखे करील त्यास—आण असे व आपले बेतालीसाचे सुकृत असे(सीमा षट्कोनी.)

ले० ४४० } {श.१५८९-९०
इ. १६६७-६८

(वाटोळी फारसी-मुद्रा)

मुसाफेचे

कार्साचे

अज दिवाण **किले चंदन** तां मोकदमानी वा रयानी देहाये पा कुडाल मु॥ किले मजकूर सु॥ समान सितैन व अलफ दरीविला किले मजकुरीचे विलाती **सिवाजी भोसलेचे** तसविसी करिता कुल खराब पडिले देसाई वा देसकुलकर्णी वा मोकदम वा बाजे रयेता परागंदा होऊन परमुलकासी गेले विलातीत दिवे लागण नाही ऐसे जाहाले किले नाजुक सरहदेचा पाहून विलातीचे मासुरी बदल **सूर्याजी** नाईक देसाई याचे तफवासी होता नफर मजकूर मौजे **नीब** पा **वाईचे** थलात उभा राहून सदरेसी वा जमातीस अपले अहवाल सांगितले जे **सिवाजी भोसलेने** आपले घर लुटून तलफ केले वा आपले गुरे वासरे वा घोडी नेली वा आपले बहीण + + + + + + अदबखानेत ठेऊन दंड घेतले होन ३०० वा सिलकावणी होन ६० घेतले जे पेसजी किले मजकुरीचे विलातीच व जमातीचे गुन्हे वा नाईकवाडी याचे गुन्हे घेऊन गेले होते ते खडणी देतो म्हणौउनु सोडून आणिली आणि खडणी दिल्ही नाही म्हणौउनु गुन्हे लाऊन अपणासी सदरहू नागवण घेउनु ये वख्ताच खाविया नाही ऐसे केले त्यावरून जमायती सरगुन्हो वा नाइकवाडीयानी किले मा नफर मजकुराचे बाबे इलतमास केले जे विलाती खराब त्याकरिता दिवाण बाब वा तनखे ठाणकार वा कारकून वा वख्त हसम पावत नाही त्या करिता वख्त बेहाल जाहाले असेती किला नाजुक असे देसाई मजकुराचे दिलासा करून बदल निवाला इनाम चावर १ देऊन विलातीचे मासुरी करविले जे किला नुवानत होईल वा दिवाण बाद व रझ न खा कारकून वा हसम पावेल बराये इलतमास खातीरेसी आणून **सूर्याजी** ना बिन

तुबाजी नाईक देसाई मजकूराही बदल निवाला इनाम चावर १ दिल्हा असे बी तफसील

कसबे कुडाल		मौजे सरताळे	
चावर	-।-		-।-
आराथल जमीन		अराथल जमीन	
१०	वाडापैकी		-।-
८ ५	भोसा मोढा	८१०	बेदपैकीं
८१५	गुरविक	८२०	कोलकाईपैकीं
	-।।-		-।-

येणेप्रमाणे कुलबाब कुलकानु देणा माहासूल नख्त यातीं

\+ + + + + +

\+ + + + + + +

नवीन तालीक लेहून घेऊन असल मिसेलीं परतून दीजे पेस्तर × यासी × कोण्ही इस्कील वा खलेल करील × × × त्यासी मुसलमानासी—सौगद असे वा हिंदू ब्राह्मणासी——असे मो (फारसी)

सासवड वोकील.

ले. ४४१ } {श. १५९३ फाल्गुन व. ११
{इ. १६७२ मार्च १५

श्रीशंकर

राजश्री कारकुनानी प्रा सिरवल गोसावी यांस

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य——सेवक × विठल पिलदेऊ सुबेदार व कारकून सुभा तो मावाले नमस्कार विनंती सु॥ इसने सबैन अलफ मौजे एलके प्रा मजकूर येथील कुलकर्णी व जोतीस निमे मा यमाजी रंगनाथ वोकील याणी खरीदी केले आहे बर-हुकुम महजर देसक प्रा मजकूर केला आहे तरी सदरहू महजर प्रमाणे जोतीस व कुलकर्ण निमे माइलेच्या दुमाले केले आहे तेणेप्रमाणे दुमाल करणे छ २५ माहे जिल्काद तालिक लेहोन घेऊनु असल माइलेसी फिराऊनु देणे

*श्रीशिव	§मोर्तब
चरणी शर-	सुद
णागत विठ-	
ल पिलदेव	पो छ ४ माहे सौवल
नीज भक्त	

× विठल पिलदेऊ अत्रे गराडकर § षटकोनी. * चौकोनी.

ले. ४४२ } { श. १६२९ फाल्गुन शु. ५
इ. १७०८ फेब्रु. १५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित संवत्सरे फाल्गुन सुध पंचमी भानुवासरे क्षत्रिय कुलावतस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी देशमूख व मुकदम कसबे सासवड यासी आज्ञा केली ऐसी जे माहादाजी एमाजी बोकील याणी हुजूर येऊन विदित केले की कसबे मजकुरी आपणास वाडा देसमूख मुकदम याणी देऊन पत्र करून दिधले आहे ऐसे असोन सांप्रत ते जागियास हरकत मांडली असे तर स्वामीने पारपत्य करून आपला वाडा हरप्राा आपणास देविला पाहिजे म्हणून विनंती केली त्यावरून हे आज्ञापत्र तुम्हास सादर केले असे की पत्र करून दिल्हे आहे तेणेप्रमाणे याचा वाडा याचे हवाली करणे हरकत फितवा न करणे परतोन बोभाट आलिया ताकीद होईल जाणिजे +निदेश समक्ष

¶ मर्या
देयं रा
जते

† ᵕ श्री ०
शिव नरपति हर्षनीधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
प्रधान

सुरू सुद बार

ले. ४४३ } { श. १६३४ वैशाख व. १
इ. १७१२ मे १२

श्रीवटेश्वर

बाहिरव विठ्ठल

स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शक १६३४ नंदननाम संवत्सरे वैशाक वदी १ प्रतीपदा भृगवासरे तदिनी राजेश्री भगवंत गंगाधर बोकील यासी देशमूख व मोकदम व देशपांडिये कर्याती सासवड लेहोन वृतीपत्र दिल्हे ऐसे जे सेत नजीक श्री—खंडी १॥ दीड थल करून पुरातन दिल्हे आहे त्यास तुम्ही सेताचा सारा पूर्वी गला खंडी १॥ व नक्त टके ३० देत होतेस त्याप्राांच घेऊनु येणेप्राा दरहरसाल याच शिरिस्तियाप्रमाणे चालऊनु गावास आदिक उणा टका पडेल तो गांवसमधे समजोन तुम्हासी समध नाहीं हे आम्ही शफतपूर्वक स्मरोन दिल्हे आसे लेकराच्या लेकरी आनभवणे ये गोष्टीस आम्हापासून अंतर पडेल तरी श्री—यांची आण असे व वाराणसीमधें गोहत्यचे व ब्रह्महत्यचें पातक असे व आपल्या बेताळीस पूर्वजाची आण असे हे पत्र सही

*मोर्तब
सुद

+ अक्षर वेगळें ¶ चौकोनी † वर्तुलाकार. * चौकोनी.

ले. ४४४ } {श. १६३९ मार्ग. व.४
{इ. १७१७ डिसें. १०

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबी संवत्सरे मार्गशीर्ष वहुल चतुर्थी भोम्वासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा **शाहु** छत्रपती स्वामी याणी राजश्री **बा**पूजी **श्री**पती यास आज्ञा केली ऐसी जे **गं**गाजी **ए**माजी याचे पुत्र भगवंत **गं**गाधर व राजश्री **मा**हादाजी **ये**माजी **बो**कील याणी विदित केले की कसबे **सा**सवड का मजकूर येथील ठाणियाची चिटणिसी व ठाणियाचे लोकाची सबनिसी हे वतन आपले पुरातन कारकीर्द दरकारकीर्द पूर्वी चालत आले तेणेप्रमाणें कैलासवासी थोरले राजे छत्रपती स्वामी व राजश्री कैलासवासी **आबा**स्वामी उभयतांच्या राज्यांत चालिले त्या उपरी धामधुमेकरिता ठाणियाची मजबुदी नाही म्हणून वतनी हुदेहि चालिले नाही अलीकडे राजश्री **बा**ळाजी पंडित प्रधान याणी कसबे मजकुरीच्या ठाणियाच्या स्थलावरी कोट बांधोन ठाणे बैसविले लोक ठेऊन मजबुदी केली आहे तरी स्वामीने पूर्वी चालिल्याप्रमाणें सबनिसी व चिटनिसी दोन्ही हुदे आपले वतन आपणास चालवायाची आज्ञा केली पाहिजे म्हणून त्यावरून तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले आहे तरी तुम्ही **म**हादाजी **ये**माजी व भगवंत **गं**गाधर उपनाम **बो**कील यास चिटणीसी व सबनिसी ठाणे मजकूरचे वतन पुरातन चालत आल्याप्रमाणे चालवणे हरदू वतनाची सेवा घेत जाणे वेतन चालत आल्या प्रमाणें देत जाणें पेस्तर यास व याचे वंशपरंपरे वतन चालवणे या पत्राची प्रती लेहोन घेऊन हे मुख्यपत्र भोगवाटियास याजपासी परतोन देणे दरहरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे जाणिजे *बहुत काय लिहिणे.

सुरू सुद बार बार

‡मर्या
देयं रा
जते

ले. ४४५ } {श. ?
{इ. ?

श्री

यादी माहितगारी मंडळ

१ श्रीमंत महाराज **शा**हू राजे दिलीहून आले शके १६२९ या सालात येऊन **चं**देन **चं**दन किल्यानजिक राहिले **ता**राबाईसाहेब **सा**तारियासी होतीं त्यांही **शा**हुराजे याजवर खुळ माजविले नंतर **ध**नाजी **जा**धवराव याजवर मराठे बेदिल जाले होते ते वेळेस **बा**लाजी **वि**श्वनाथ आबाजीपंत **पु**रंधरे व **खं**डो **बा**लाल चिटनिवीस या त्रिवर्गानी समेट करून सात हजार मराठे जमा करून **शा**हुराजे यास शके मार किले **चं**दन **व**दन येथील मुक्कामी भेटले कलम.

---

* अक्षर वेगळें. ‡ चौकोनी.

१ शके १६३० वैशाखमासी धनाजी जाधवराव याची व महाराजाची लढाई जाली जाधवराव याचा मोड जाला नंतर मारनिले पळून मोगलाईत गेले त्या उपरी त्यांजकडील सेनापतिचे पद दूर करून दाभाडे यासी दिल्हे. कलम

१ परशरामपंत प्रतिनिधी खुलास मिळाले हा दोश ठेऊन पारपत्य करित होते ते वेळेस खंडेराव चिटनिवीस याणी बक्षीस मागोन प्रतिनिधी त्याची त्यांजकडे काईम राहिली कलम

१ पिंगले पेशवे यांजकडे नाकर्तेपणा आला सबब त्याजकर्डाल पेशवाई काढून त्याम श्री देवी प्रतापगडची माहाराजाची कुलस्वामीण देवी तेथील पेशवाई त्यास देऊन दाहा हजाराचा सरंजाम चालविला तो हली पिंगले खाऊन आहेत त्याजकर्डाल पेशवाईचे पद काढून बालाजी विश्वनाथ कोकणस्त ब्राह्मण देशमूख ता। श्रीवर्धन प्रांत कोकण यास शाहूमहाराजानी कृपा करून दिल्हे शके १६३५ या सालात त्याजकडे पद जाले त्या दिवसापासोन पेशवे प्रधान कोकणस्त आहेत कलम

———

ले. ४४६ } { श. ? इ. ?

श्री

†यादी

१ प्रथम जजिरा येथे कोली याचा + + + होता सन खमस इसरीन तिसा मिया या सालात बहिरवखान निजामशाही पातशाहाकडून येऊन इतबारराव कोली यास पातशाहाकडे नेले आणि पातशाहानी इतबारराव कोली यासी जजिरचे अमलदारीचे काम सागितले त्याणी पाच वर्षे आमल जजिरे येथे केला.

१ सन समान इसरिन तिसा मियात बहिरवखान जजिरचे आम (ला) वर आले त्याजपासून पातशाहीतून जजिरा येथे आमलदार येत गेले

१ सन समान समानीन तिसा मिया या सालात मलिकंबर यासी वजिरीची वस्त्रे पातशाहीत जाली.

१ सन सीत आर्बैन व आलफ या सालात सिवाजी महाराज याचा आमल सुरू जाला शके १५९६ आनंदनाम सवत्छरे सन खमस अर्बैन व आलफ या साली राज्याभिषक जाला शके १६०२ रौद्रनाम सवत्छरे सन इहिदे समानीन व अलफ या साली महाराज कैलास वासी जाले

१ शके १६१० सन तिसा समानीन व अलफ या साली संभाजी राजे यासी धरून सगमेश्वराहून नेले. पुढे दोन वर्षे मोगलाई होती भालेराई जाली

१ सन तिसैन व आलफ या साली खैरातखान साहेब स्वस्तान जजिरा याणी मुलूख

† यातील मुसलमानी सन चुकीचे असावेत. मूळाप्रमाणें लिहिली आहे.

काबीज केला तागाईत सन सलास सलासीन अखेर पर्यंत पुढें सन मजकुरी बाजीराव बलाल पेसवे वैशाखमासी जजिऱ्याचे म्हसल्यास आलें.

१ सन इहिदे खमसैन व आलफ या सालात आनाजी दतो याही पाहाणी केली बिघवणीची केली.

सदरहु प्रमाणे लिहिले आहे × × बेशाख रुजू पाहून ध्यावे.

अकोले देशपांडे

ले. ४४७ } {श. १५५१ आश्विन शु. १०
{इ. १६२९ सप्टें. १६

श्री

तालीक मा असली

अज दिवाण ठाणे पा आकोले ता कारकुनानी व देसमुखानी व मोकदमानी कर्याती राजोरू पा मार बिदानद सुा सलासीन अलफ खुर्दखत रा छ माहे— पौ छ ७ माहे सफर तेथे रजा बो तिमाजी गगाधर कुलकरणी कर्याती राजोरू हुजूर येऊनू मालूम केले जे कर्याती मजकुरीचे कुलकरण आपली मिरासी आहे हाली सिवाजि बायदेऊ आपला गोत्रज आपली तकसीम आहे म्हणौऊनू कुसूर करितो त्याची तकसीम लाभत नाही आपले वडील खात आले आहेती ता कारकीर्दी मा मदार मलीक अबर आपण खात आलो आहे भोगवटा ऐसा असोनू नफर मा नवी जिकीर करनू करकसा करितो तरी साहेबी आपले कुलकर्न आपले दुमाला केले पाहिजे दरीबाब खुर्दखत मन्हामती होय म्हणौऊनू मालूम केले बराय मालुमाती मालूम जाले तरी सदरहु हकीकर्ता बालोजी देसमुखास पुसतां बालोजी देसमूख कर्याती हवेला जाब दिधला की आपली उमर वरसे पनास जाली आहेती तिमाजीचा भोगवटा जाला आहे म्हणौऊनू हुजूर गोही दिधली तरी तुम्ही याचे वतन कारकीर्दी मलीक अबर मालुमाती गोही बालोजी देसमूख याचे हवाला करणे तालीक घेऊनू असेली खुर्दखत फिराऊनू देणे म्हणौनू रजा रजे हुकूम अमल करणें विसाजी पासुनू कुलकरणाचे काम घेत जाणे मोर्तबसूद

तेरीख ८ माहे सफर

ले. ४४८ } {श.१५५१ (?)
{इ. १६२९-३० (?)

श्री

रुजू सिका. ता

अजरख्तखाने मसुरल हरजती राजश्री दादाजी विस्वनाथ साहेबू दाईम दौलतहु बजानेबू कारकुनानी पा आकोले बिदानद सुा सलासीन इसरीण ? अलफ तिमाजी व सिवाजी कुलकर्नी हे हुजूर आले का राजूर पा मा कुलकरनाचा करकसा होता म्हणौनू हरदोजनी

कडी वाद सांगितला मुनसफी करितां माहाली गोही साक्ष आहेती यावेगला निवाडा होत नाहीं म्हणौनू काा माचे कुलकर्न अमानत केले असे पेस्तर माहादाजी रंगनाथ माहालास येतील ते वख्ती गोही साक्षी पाहोनू निवाडा करितील मुनसफी करिता ज्याचे होईल त्याचे दुमाला करितील तश्रीफ दिधली आहे ते ठाना जमा करणे तुम्ही तालीक घेऊनू असल सिवाजीस फिराऊनु देणे मोर्तबु

लेा ४४९ } { शा० १५५१ ?
{ इ०१६२९-३०?

नकल राजीनामा + + + + × +
+ गणे संगमनेर सुा स ... ...
काजी अहमद हाकिम खा दिलावरखान
... ...पा मार
नागोजी महादेऊ कारकून × + सावदे व अज + त
पा मार अमीनलमुलकी खा
+ मा पनाले
बहजूर खुद ... ...

हरदो देसमुख काा सगमनेर ... ... चेथील कागदाचे सिरस्ताबदल व कसब्या-बदल करकसा करीत होते हाली सदरहूने तह केला तेणेप्रमाने हरदो जनी वर्तने बितफसील कलमे सात

शिस्त सदर तिमाजी कसबा तिमाजीने म्हणावा (?)
कुलकर्णी यानें लेहावे बेरीज सिवाजीने घालावी
व सदर बेरीज तिमाजीने कसबाची तकरीर अगर कतबा
त्याहावी अक्षरे थोप सिवाजीने करावे कसबाचे कुलकर्णी याने लेहावा
करियात बेरीज तिमाजीने घालावी कसबाचे बाबे हरयेक बाब ज ज ह
तिमाजीनें आपले गांव व सिवाजीने लु दिवान कारबार हरदो देसमुख
आपले गाव तरफवार त्याहावे करणे
कसबांची रोजकीर्द
काा मजकूरचे कुळकर्णी याने मजमूचे
दफतरीं रसद लेहवावी
व कुलकर्णी कसबे मजकूर लाग
त्याने लेहावी ०
दफतरीहून हुजत घ्यावी

सदरहू प्रमाने निवाडा केला असे येणेप्रमाने हरदोजनी वर्तने या निवाडलिख अमलास जो हिला हरकत नवी जिकीर करील तो दिवानचा गुन्हेगार व गोताचा अन्या मोर्तबशूद ताा २७ माहे सवाल

ले. ४१० } { श. १५५४-५५?
{ इ. १६३२-३३?

श्री

तालिख

+ + तुबाजी दादास तिमाजी गंगाधरे लेहोनु दिधले यैसे जे सुा सलास सलासीन अलफ आपली तकसीम हवेलीचे कुलकरण गाव ९ आहेती तेथील मुस्याहिरा व इनामती व सनवार व तश्रीफ दिवाणातील येईल व याखेरीज आणिक उत्पन्न होईल त्याची तक्षीम देखील थूगो बुा गाव कुलकरण

तुम्ही घेणे रुके -।६आठरा दर टकियास आपण घेणे दर टकियास वाटा व चाकरीचे रुके -।।६ तीस टकियास घेणें जो चाकरी करील तेणे येणेप्रमाणे घेणे

सदरहू प्रमाणें वर्तत जाणे तुम्हास देणे जरा एक मुलबाई जा त ना खोटी करील त्यास वाडिलाची आण व आपले कुलस्वामिनीची आण असे व याखेरीज नागोजीचे ताा गाव ८ खरेदी केले आहेती त्यापाा एकोजी गांव ४ बाकी गाव ४ हे याचे पैकी होनु ४।। तेवा जेवेरी ती देणे मग ते ही सदरहूप्रमाणे वाटूनू खाणे तोवरी तेथील उत्पन्न कलातरावारी जे येईल ते खाने मग मुदल पैके होनू ४।। साडेचारी देणे तुम्हास साल गुा ताा हली अस्विन सुध पाडवा तुम्हास पावले असे हे लिहिले सही व आपले + + + गावगणा कुलकर्णी येवूनू तेथें + + + तरी सदरहूप्रमाणें वाटूनू देणे हे सही कानडे हरी दर साले बाल वेगले करूनू पुढे जो रुका साधेल तो वाटूनू सदरहूप्रमाणें खाणे सही

यासी साक्षी विसाजी हरदेऊ

ले. ४११ } { श.१५४०-१६०० ?
{ इ. १६१८-१६७८ ?

श्री

माहाराज श्रीमनोहरदासजी माहाराज साहेबू.

-।।छ अर्जदास्त महाराजाधिराजश्री-सेवेसी सेरीकर देशमूख व मोकदम कर्याती राजूर पा आकोले सेवेसी अर्जदास्त विनती बाा ताा तेरीख माहे साहेबाचे कृपादृष्टीकरून सेरीकराची बखेर सला वत असे बाा साहेबाचा परवाना राजश्री सायेजी साहेबास सादर जाला तेथे रजा जे माणकोजी देसपाडियास हुजूर पाठवणे येथे गोविद धोडो आला आहे तरी माणको मजकुरास पाठऊनु देणे म्हणौन रजा तरी येथे राजश्री साहेबी माणकोजी मजकुरास राजश्री परसो सायेजी व हिरोजी देशमुख औरंगाबादेस रायाजि देशमुखाचे समजाविसी बदल पाठविले याबराबरी माणकोजीस पाठविले आहे यैसीयास वतन तो कदीम पिढी दर पिढी

माणकोजीचे देसपाडियेपण आहे गोविद मजकूर नाहक खलेल करीत आहे वेसीयास माणकोजी औरंगाबादेहून आलियावरी साहेबाचे सेवेसी येईल,
(पाठविर वाटोळा मराठी शि.)

ले. ४५२ } { श. १५६०-१६००?
इ. १६३८-१६७८?

श्री

रामराम

॥ द

श्री सकल गुण अलकृत राजमान्ये राजेश्री केसोपत व माणकोजीपत देसपाडिये यासि हिरोजी देसमुख व रायाजी देसमुख व देसपाडिये पेा आकोले अनुक्रमे-नमस्कार + + + विनति उपरि तुम्हाला कागद पाठविला मनास आला ली (पुढील कांहीं (मुद्रा) ओळी नाफत्ता)

स ठाऊक नाही यावरी गोविद धोडोस प्यादे पाठवुनू बोलाघनु दरबारास आणिले त्यास ताकीद करून पुरसीस केली तेणे जाब दिधला कीं आपण परवाणा घेतला नाही महालास पाठविला नाहीं परवाणा घेवूनू महालास पाठवुनू ते आपली गर्दन मारिली पाहिजे यैसा नेम केला आहे तरी गोसावी याची तहकीकातीं करून वा कैद आमल असला तो आम्हास साबे हुजूर पाठविला पाहिजे म्हणवुनू लिहिले तरी गोविदाचा बाप धोडावा त्याने आमिना पासी परवाणा हजीर मजालिसी हुजूर दाखविला. यावरी आम्ही हाजीर मजालिसी हुजूर पुसिले कीं तुवा परवाणा आणिला आहे तो दाईमुदाई दोघे दरबारी उभे राहोनू घेतला आहे कीं देस गैबती घेतला आहे यावरी त्यानें जाब दिधला कीं दाईमुदई दोघे उभे राहोवुनु परवाना घेतला आहे. (अपूर्ण)

ले. ४५३ } { श.१५६०—१६००?
इ.१६३८-१६७८?

श्री

रामराम

॥ छ

श्रीमत प्रहुड प्रताप दिनकर (खंडे) स्वरी सदा येसबत राजमान्य राज(श्री) हिरोजी देसमुख गोसावी यासी ×× लुखजी व इलोजी देसमुख क ॥ राजूर—ति लेहावया कारणे यैसे जे मानकोजी तुबदे व केसो त्रिमल यास महजर करुनु देणे आम्हास बोलावा तेधवा येवूनू हे काम मनी धरने अगती कामकरणे आम्ही तातडी गावास आलो कीं राजश्री सेखदार + बोली जातातीं म्हणउनू भेटीस अतर पडले.

ले. ४५४ } { श. १५७० वैशाख शु २
{ इ. १६४८ एप्रिल १५

श्री

नकल महजर हाजीर मजालसी सदर ठाणे पा आकोले बिहुजूर तपसील तेरीख १ रबिलाखर

काजी व खत्री हकीमशा

काजी हकीम	खतीब पा
पा मा	मजकूर
बमोहर माइले	बमोहर मा
	इले

हवालदार व कारकून

राजश्री मल्हार	नरसो चंद
राउ हवालदार	रस मजुम
बमोहर मा-	दार का
इले	मार
सेख बुद ह	
वाले का मा	लग
मोहर माइले	•

देसमुखानी व मोकदमानी व सेटिये

देसमुख पा मजकूर

जाउजी देसमुख

पा हवेली

बमोहर माइले

जेसजी देसमुख

नागर माइले

मोकदम व सेटिये कसबे आकोले

सेटियाजी झोले	बाबजी फर्जद	म्हउजी गुरव	बाबसेटी	मेडजी
कर मोकदम	सदार्जा धुमाल	मोकदम	सेटिया	सेटिया
नागर माइले	मोकदम नागर मा	नागर माइले	तराजू	तराजू

देसपांडिये पा मजकूर

(कोरी जागा)

नाइकवाडी पा मजकूर

सूर्याजी नाईक	रभाजी नाईक	देउजी (?) नाइ-	अंचुलजी
वाडी पा मार	वाडी कटार	कवाडी कटार	नाईकवाडी
कटार			कटार

मोकदम गावगणा

काउजी मोकदम

मौजे उ ष खु म वा डं या

सुा समान अरबन अलफ सन हजार १०५७ कारणे महजर केला यैसाजे नरसजी पानसारा व येसाजी पानसारा माहाल आवटबोलावीं कसबे आकोले पाा मजकूर हे हुजूर जाउनु खुर्दखत बिनाव कारकून छ ११ रबिलौवल सानी (?) आणिले तेथे मजमून की नरसजी व येमाजी पाणसरे मालुम केले जे किर्दीमुल अयाम आपली मिरासी पाणसारगी पाा मजकूर असोन लाइनी देउजी नाइकवाडी व रतनजी... ...हे हरदोजण फर्यादी साहेब हजूर करितो तरी साहेबी नजर येनायेत करून बरहक, निवाडा केला पाहिजे बराये मालुमाती हाकीम शरा व देसमुख व देसपांडिये वगैरा मोख्तसर लोक बैसऊनु बरहक मुनसफी निवाडा करून भोगवटे तसरुफाती मनासी आणिता नाइकवाडी यासि निसबती नाहीं नरसजी व येमाजी पाणसारगी केली आहे येसी गोही मुकाबला जाला यावरी नाईकवाडी दूरी करून देउजी व रतनजीचा कागद आत्मखुसीचा लेहोन घेतला की आपली व आपल्या बापाची वडीलाची मी [रा]सी पानसारगी नव्हे खाली जागा मिया राजियाचे कारकीर्दीस आपल्या बापे भिउजीने पानसारगी चालविली ते वख्ती खाली जागा चालविली ते मसमु नव्हे आपली मिरासी नव्हे पाणसारगीस आपणास निसबती नाहीं यैसा काजी हाकीम शराचे सनदेनसी कागद लेहोनु दिधला असे यावरी पाणसारगी याची यासी मोकरर केली आहे याजपासून पाणसारगीची खिजमती घेणे व यास महजर निवाड माफीक देसपाडियांचे दस्तुरे करून गोही निशानिया करून देवणे ताकीद असे यैसी रजा बाा रजा महजर देसपाडी लिहिला यावरी शिवाजी बायेदेऊ कुलकर्णी कसबे आकोले हा येउनु सदरहु मजालसीस बोलिला की सदरहु माहाल कसबे निसबतीचे आहेती हे लिहिणे सालाबाद पिढी दर पिढी आपले आहे. आणि देसपाड महजर लिहिला आहे. बहुकूम आपणावरी होतो आपली मिरासी वुडते यावरी सदर व देसमुखी सिवाजी बायेदेऊ यासि हुकूम केला की हुजूरील रजा आहे तुवा हुजूर जाणे यावरून सिवाजी बायेदेऊ हुजूर मेला संगमनेरी दुसरे रोजी सिवाजि येकनाथ व तिमाजी गंगाधर देसपाडिये येही आले मग देसमुखी हर दोजणास बोलीले की तुम्ही लाइनीच भांडता सालाबाद पिढी दर पिढी चालिली आहे तैसे लेहो नवी जिकीर करणे काये.....स आहे हे लिहीने सिवाजि बायेदेऊ कुलकर्णी कसबीयाचे बा ये येणे लिहीले हा निवाडा हवालदार राजश्री मल्हारराऊ हवालदार या हुजूर बसोन सिवाजी बायेदेऊ याजहाती महजर लिहिविला असे देसपाडीही महजर लिहिला असे तो रद असे सदरहू मजालसीयाने पानसारगीचा बुनयादि मनासि आणिली नरसजी व येमाजी पानसारे यासि मिरासी होये देऊजी व रतनजीचा बाप भिऊजी नाईकवाडी येणे मिया राजियाचे वेले पानसारगी केली ते नरसजी व येमाजीचा बाप तुमजी हे परागंदा जाले होते याचे कोन्ही हजीर नव्हते खाली जागा होता याकरिता भिऊजीने पानसारगी केली परी त्याची काही मिरासी नव्हे याची मिरासी होये भिऊजीचे लेक देऊजी व रतनजी हे लाइनी उभे राहीले होते ते दूर केले असे तरी त्यासि पानसारकीसी निसबती नाही नरसजी व येमाजी पानसारगी याची मिरासी होये त्याचे बुमाल्य केली असे इही पानसारकी याप्रमाणे यासि हिलाहरकती करील तो दिवाणाचा गुन्हेगार व चोताचा अन्याई हा महजर सही.

ले. ४५५ } { श. १५७० मार्गं. व. ७.
इ. १६४८ डिसें. २६

ताा नबाबसाहेबू

राजीनामा येसाजी व बालोजी देसमुखमानी काा राजूर पाा आकोले सुाा तिसा अबैन अलफ राजीनामा लेहोनू दिधला यैसाजे आपली निमे देसमुखी कदीम होय हली आपण नाकाम व नातुवणा सबब तर्फ घसरली सालबसाल कमी होती गेली याबदल—साहेबी हुजूर बोलाऊनू आपला वडील भाऊ नेऊजी देसमूख त्याचे हवाला समुदी देसमुखी केली ते आपण खुसनुद दिधली असे हली महालास कसबे राजुरास येऊनू समस्त मायेवत लोक जमा करुनू त्या हुजूर आपण नेऊजीस देसमुखी दिधली असे तेणे सुखी देसमुखी करणे त्यास आपण हिला हरकती करू तर दिवानीचे गुन्हेगार व गोताचे आन्यायी हा राजीनामा सही

(कागदाच्या उजवीकडे कोऱ्या जागेंत)

येसाजी (नां. चि.)
बालोजी (नां. चि.)
बीाा बयाजी सिवदेवू देसपाडिया काा मजकूर

तेरीख २०
जिलकादी

गोही

गोपाळ घुगरी बकाल
वाऊजी मोकदम मौजे वाकी
जैतपा करारा काा माा
बापूजी मालोजकर काा माा
पीलजी निरोडा काा माा
लुखजी वनजारा काा माा
खंडोजी सोनार
चाहू परीट
रामजी चाभार

बालोजी परडेकर बकाल
वाऊजी माा चिंचोड
बाहिरजी सीदा काा माा
अंताजी वनजारा काा माा
येसाजी गभीर काा माा
जाखो व देऊ तेली
कुमाजी लोहार
निरा महार व हणमता
महार पाडेवार काा माा

ले. ४५६ } { श. १५७१ आश्विन शु. ११
इ. १६४९ आक्टो. ६

नवाब कारतलबखान

अज रख्तखाने खुदायवद खान—साहेब तुली दयाम दौलतहू बजानेब साऊजी देसमुख पाा आकोले सुाा खमसेन आलफ (फा. शिक्का) सन हजार १०५९ हुजूर मालूम जाहले जे साहेब काम दिल वखतेसी करितोस परगणाहि कुली वसूल होईल यावरून तुझी माकुलाती

व मेहनाती जाहीर जाहाली हाली येसाजी व बालाजी देसमुख राजूर याम दिलासा देउनू आणौनू आबादानी करणे येबाबे कोताई न करणे (ष. फा. मो.)

तेरीख ९ माहे सौवाल

ले. ४५७ } { श. १५७९ मार्ग. शु. ४
इ. १६५७ नोव्हें. २९.

नकल नबाब काहारतलबखान

छ सियादत पनाहा मिरा सैद दाऊद सेखदार व कारकुनू पा आकोले व आमल बद सवान मत बाशद किताबत (फा. वा. शि.) पाठविली हाकीकती मालूम जाली दादाजी व येकोजी मोकदम सोली मा याचे बाबे लिहीले होते अर्दास हुजूर छ ८ रोजी गेली आहे तेथे हाकिकती नफर मजकुराची लिहीली आहे जबाब सादर जालियावरी पेस्तर देसपाडेया बराबरी लेहोन पाठऊनू तेणेप्रमाणे आमल करणे व बादी पाठविली ते तिचे पैके राघोजीबराबर देसपाडीयाबराबरी पाठविले तो आपल्या हुजुर जाऊजी देउमुख यांच्या हवाला करणे रुपये २० वीस करा होनू ६८ इजारदारासी पटा देऊनू बिदा केले यासि देणे स देसपाडे याचा कथला आहे तरी ते शहराचा साल मजकुरीचा हक अमानत करणे पेस्तर अम्ही येऊनू खातिरेसी अणौऊनू ज्याचा हक लाजिमा असेली त्यास देउनू व रखमी गुरवीन कसबे धारफल राघोजी विस्वनाथ रुपये २० खुद घेतले होते ते तुम्हापासूनू घेऊनू अमारत येकबाल पन्हाहा यास पावले वा मूतन ऊ ब रुपये ३ हजार सात आहेती त्याची ताकीद बहुत आहे हर्राफ व रबीपैकी तहसील करुनू अमानत ठेवणे ये बाबे गाफली न करणे हे किताबत (ष. मो. फा.)

छ २ रबिलोबल

सुा समान खमसैन आलफ

सन १०६७

ले. ४५८ } { श. १५८० आश्विन शु. ६
इ. १६५८ सप्टें. २२

श्री

ताालीक वा + +

वा मोहर खोज्या

मोकदमानी देहाये काा राजूर पा आकोले + + गोविंद देसपाडे काा मजकूर याचा हक हा सन १०६८ ताा सन १०६९ जो चालत आली आहे तेणेप्रमाणे त्याच्या दुमालीं कीजे उजूर न कीजे तालिक घेऊनु असली फिराऊनु दीजे मोर्तबू धोडोवास

अदबखाणी राखिली होता फर्जद हाजीर नव्हता म्हणऊनु केसो त्रिमल लेहावा पाठविली होता यावरी याच्या याचे दुमाले केले असे मोर्तबू

तेरीख १४

मोहरमू

ले. ४५९ } {श.१५८३ चैत्र व. ११
इ. १६६१ एप्रेल १५

श्री

तालीक (तत्कालीन)

अज रख्तखाने राजश्री चत्रोजी राजे साहेबू दाईम दौलतहू ताा बजानेबू कारकुनानी व देसमुखानी पाा अकोले सन १०७१ तुबाजी गंगाधर देसपाडिया पाा माा हुजूर येवुनू मालूम केले जे आपले देसपाडेपण ताा राजूर पाा माा करोसी दर करोसी चालत आले आहे हली धोंडो गोविंद नहक करकशा करितो म्हणउनु मालूम केले तरी पेसजा धोंडो मजकूर हजूर येउनू खुर्दखत नेले आहे तरी तुम्ही त्यावरी नव जाणे तुम्ही आपणा हुजूर रयेता बोलावूनू खातीरेस आणूनू ज्यास रयेती राजी असेली व जो वेतनदार असेलाली त्याचे दुमाले करणे तकरार उजूर न करणे मोर्तबू

तेरीख २५

साबानू

ले. ४६० } {श. १५८३ पौष शु. १४
इ. १६६१ डिसें. २४

श्री

तालीक

दसखत बाा रेऊजी देसमुख कर्याती राजोरू पाा आकोले सन १०७१ साहेबाचे बदगीस तकरीर केली यैसी जे तुबाजी गंगाधर व धोंडो गोविद हे नफर मजकूर तरफ मजकुरीच्या देसपाडेपणाबदल करकसा करिताती साहेबापासी फिर्यादी जाले साहेबा सदरहू नफर मजकुरांची हकीकती खातिरेस आणिली व सनदा पत्राहि मनासि आणिलिया यावरी आपणास बोलाउनू फर्माविले की तरफ मजकुरीचे देसपाडेपण कोणाचे हे जाहीर करणे तरी बेदरी पातशाही होती तधी बालोजी माडको बोली (?) त्याची मिरासीचे देसकुलकर्ण तो निपुत्रिक होता त्यास फर्जद नव्हता तो आपल्या दादीयाचा सासरा तेणे आपल्या

आजीपासी दिल्हे यावरी आपलिया वाडिलास नागवण पडली दिवाणातून खंड जाला त्यानिमित्य लुखोजीस देसपाडेपण विकले हे तकरीर सही.

तारीख ११ जमादिलोवल

ले. ४६१ } { श. १५८३ पौष शु. १५
इ. १६६१ डिसें. २५

तालीक

सेख अली फत्ते पा अकोले सन हजार १०७१ यास अमानतपना साहेबी फर्माविले की तुबाजी गागाधार व धोडो गोविद देसपाडेपनाबद [ल] करकसा करितात तरी तुम्ही बुढे पीरीमर्द आहा तुम्हास सवगद आहे जे हक हिसाबी असेल ते जाहीर करने यावरी सेख अली तकरीर बोलिले की कारकीर्दी माजी अमल दक्षनी जागीर याकूदखानास होती त्याचा सेखदार दताजी माहाली होता तव याचा झगडा जाला पहिले रगोजी धोडोजीचा चुलता देसपाडेपण करीत होता त्यामधे व कान्होजी तुबाजीच्या भावामधे करकसा जाला सनदा कागद कुल रगोजीचे हुजूर आनिले त्या सनदात गफलत केलिया रगोजी मजकुरास अदबखानास राखिले होते ... ... मोगलाईमधे कारतलबखान रदार तेही अमानत के जनुसद कुलीखान

१२ जमादिलवल हे नकल मा। असल मगाजीपत खासनीस अमीनाचे पाच भाऊ या + + त्रिबक+पत तेही लिहिला असे

ले. ४६२ } { श. १५८३
इ. १६६१-६२

राजश्री तुबाजीपंत देसपाडे संत यास रखमाजी जाखदेऊ कुलकर्णी मौजे भोजापूर पैा आकोले सन १०७१ लेहोन दिधले यैसे जे तुम्ही मौजे मा। अमिनाबराबरी आले तेयावरी तुमचे व धोडो गोविंद याचा राजुरीच्या देसपाडेपणाचा झगडा होता यावरी तुम्ही आपणापासी कागद भेंडाले १ व गाथोडे लहान १ त्यात कागद मिरासीचे तुमचे होते ते कागद गोविंद धोडो येवून आपले सुणेपासून मागोन नेले ते तुमचे तुम्हास दिधले बाकी गाथोडे लहान तुम्ही मागो लागले तीयावर आपले सुणेस पुसिले तिने सागितले की गोविद धोडोने भेंडाले दिधले [दु] सरे गाथोडे लहान दिधले नाही यावर आपण गोविदास पुसिले की तो घरीहून कागद नेले त्यता भेंडाले १ दिधले दुसरे दिल्हे नाही ते देने यावरी गोविद धोडो बोलिला की धोडोपंताबराबर यावास गेले आहे ते आपण आणून देऊन हे लिहिले सही बी।। वों

गोही

सोमाजी देसमुख
नरसो विस्णु देसपांडे

रायाजी देसमुख
कोंड पाटील पिपले
केरोजी व माणकोजी
मोकदम मौजे
भोजापूर

ले.४६३ } { श. १५८४ माघ शु. ८
इ. १६६३ जाने. ७

तालीक

राजश्री तुबाजी गगाधर देसपांडिये कर्याती राजोरू पा आकोले सन १०७२

बासि

जेसजी	माणकोजी	कृष्णाजी
देसमुख	देसमुख	देसमुख

लेहोनु दिधले यैसे जे तुमचे देसपांडियेपण कर्याती राजोरीचे मिरासी आहे यैसी-बासि तुम्हास देसमुखी व मोकदमी व रयेतीने राजीनामा लेहोनु दिधला यावरी गोविद धोंडो दरबारास जाऊनु परवाना घेऊनु आला म्हणो लागला की आपली मुनसफी करनु आपणास हुकुमी परवाना दिधला तरी हाली रयेतीने आपणास राजिनामा लेहोनु दिधला आहे यावरी गोही करणे याजवरून आपण गोही केली असे ते रद असे तेणे आपली अकल चोरून राजिनामेयावरी आपली गोही करून घेतली आहे ते आपलीच गोही रद असे हे लिहिले सही

तेरीख ७ जमादिलाखर

ले. ४६४ } { श. १५८६ श्रावण शु.१
इ. १६६४ जुलै १४

(दोन ओळी फारसी मजकूर व दोन फारसी शिक्के)

सके १५८६ क्रुधी नाम सवत्सरे स्रावनु सुद पाडिवा ते दिवसी राजश्री हिरोजी देसमुख पा आकोले यार्चाया घरासी तुबाजीपंत व माणकोजीपंत देशकुलकर्णी व बकाल व खेत्री व साली वगैरा लोकही होते तेथे बोली निघाली जे सवबाजी व यसाजी उभ वर्ग सावरचोलेसी पलोन गेले आहेती तेथून सागोन पाठवितात जे राजश्री नाउजी देसमुखास तुबाजीपंती जहर देउनु मारिले मिया डमेद खोजा सेकदार होता त्याचे अमली मारिले यैसे जानजी बकाल व दादजी तेली मेहतरी वगैरा जे कोण्ही येतसे त्याहाती यैसोचि सांगोन

पाठविताती मग हे तहकीक करावयास भिउजी देसमुख व मुधाजी नायक लोणेकर यांस पाठविले यैसे जे हे खरे असेली तरी यास हिरोजी देसमुख म्हणताती जे आपण ही तुमचे या कार्याबदल पाठीसी आहो आणि खोटी अमल असेली तरी खोटियाचे पाठीसी आपण नाही यैसे सवबाजी व येसाजी व इद्रोजी मोकदम (म?) वगैरा प्रजा होत्या मौजे सावचौल हणवंताचे देउली बैसले होत्ये त्याजपासी भिउजी व मुधाजीने पुसिले जे तुम्ही लोकाहाती सागोन पाठविता की देसमुख तुबाजीपंती जहर देऊ (नु?) मारिले तरी हे खरे कराल मग सवबाजी व येसाजी बोल्लिले जे मिया उमेद ठाणगावास (?) स्वारी करून गेला होता ते वख्ती आपण ही बराबरी होतो मौजे ठाणगावीं आंबियाखाले हिरोजी देसमुखाचा डेरा होता तेथे रात्री हिरोजी आपणासी बोल्लिले त्यावरून आपणहि बोल तो यैसे उतर दिधले यावेगले आपणास ठाउके नाही यैसे समस्ता हुजूर हणवताचे देउली बोलिले या उपरी भिउजीने व मुधाजीने सवबाजी व येसाजी याचा निरोप घेउनु स्वार आलो मग थुगावासी आलो त्याची उतरे याजपासी सागितली मग हिरोजीने उतर दिधले यैसे जे आपण काही या गोस्टी बोलिलो नाही मग तेथून मुधाजीचे निरोप घेउनु आकोलियास तव आलो तुबाजीपंताची भेटी जाली तेही वर्तमाण पुसिले जाला वर्तमाण सदरहुप्रमाणे सागितला असे हे लिहिले सही वोली अडसष्टी असे

गोही

	बिा मुधाजी लोणेकर
गोविंद जोसी	*पत्र प्रमान त्रिक
* गोबिद बळाळी	वीसाळ साक्षी
* घुगरी पा	पत्र प्रमाने साक्षी
आकोळे	देवाजी परडेकर
* गगाजी वेदे	माणकोजी दडनाक महाजन
राघोजी देवीगीरकर	* कोनेरी दडनाक महाजन
* गणावा घुगरी	हिरोसाव खत्री
पुना साव खतरी उकरडा	ठीक (सीक ?)
सोमाजी साली	

---

* या सह्या बाळबोध अक्षरांत आहेत.

ले. ४६५ } { श. १५८६ कार्तिक शु. २
इ. १६६४ आक्टो. ११

(फा. ब. शिक्का)

ताा तर्फ शार व देसमुख व देसपांडिये काा राजूर पाा आकोले व मोकदम व रया देहाये मजकूर सुाा सन खमस हजार १०७४ बिदानद काा राजूर इजारदारासि इजारा सायेर आहे त्यापैकी इजारदारी व वरखदाद राजी होऊनू आपल्या इजारीयापैकी हरबाजी तुबाजीस इजारा पथक काा राजूर इ।। छ रबिलाखर ताा छ १७ रजबू मख्ता बेरीज रुपये ४०८ हरबाजी तुबाजीस इजारदारी गुता केला आहे. तो वसूल करील तरी काा मजकुरीची कमावीस हरबाजीचे हवाले करणे जेणेमाफीक पेसजी कमावीस चालिली आहे तेणे माफीक अमल करणे उजूर न करणे मोर्तब (फा. ष. मो.)

तेरीख १ रोज माहे रबिलाखर.

ले. ४६६ } { श. १६०३ वैशाख शु. ९
इ. १६८१ मे १६

श्री

हकीकत जबानी भोगाई सतीण रंगोपंताची श्री(स्त्री) रंगोपंत रामाजीपंताचा पुत्र रामाजी हरबाजीचा भाऊ धाकटा हरबा लुमाजीचा पुत्र भागाईनें राजूरच्या देसपांडिये-पासी हकीकत सागितली सुाा सन इहिदे समानीन. अलफ सके १६०३ दुर्मति नाम सवत्सरे वैशाख शुध नवमी शणवार ते दिवसी हकीकत सागितली प्रथम हरबाच्या मारि-यार्चा हकीकत रखमाई बाईल लुगडीयासि दिवा लागून जलून मेली होती तिजला सासुर-वास सासूने केला होता ते दुःख पोटी होते यैसीयासी दिवियाची वाती पदरास लागून जलोन मेली ते रामाजीपंताच्या आगा वारे होवून खेलो लागली वारिया मधे रागे करचा पायी सासूच्या तोडावर मारी तिच्या जिवाचा आकांत करी यावर एके दिवसी बोलिले की पिंपरकणीयाकडे न जाणे देशमुख मारा करू पाहतात हे गोस्त अमान्ये करून देसमुखाबराबर हरबा गेला त्या बराबर कान्हाबा हा तुबाजी गंगाधराचा भाऊ होता येते वेलेस हरबा देसमुखाबराबर जात होता पिंपरकणाचे सिवेसी हरबा झोडून पाडिला जिवोचि पुरा केला मागे कान्हाबा अंतरे येत होता तो त्यासी चुकावून राजुरास घरास आला तो रामाजी आघूल करीत होता एक पाव भिजविला होता तों कान्हाबाने हांक मारली की घर बुडविले हरबास देशमुखी जिवेच मारले यावर रामाजी तैसाच उघडा बोडका दीड गांव भोये आकोलीयास येऊन संतापासि हाक मारली सदरहू खुनाचा समाचार सांगि-तला यावर गोत्रज अवघे येवून हरबास आगी पाणी दिधले उत्तर कार्य केले विटाळ फिटली-यावर रामाजी हरबाचा धाकटा भाऊ शहाणा होता हरबा बराबर कारभार करीत होता तैसाच औधेजणी राजुरी ठेविला त्यासि कुलकर्णाचा कारभार करू लागला दाहा वीस वर्षे केली त्यावर चिसाजी हरदेवू हरबाचा पुत्र हरबा मारिला ते समई गर्भापोटी होता

तो सोबई विसाजीचा माय आजी तिने वाढविला हाहि रामाजी बराबर कारभारास वागत असे त्यावर देशमुखी गावई करून माणिक वोझर पा कोतुल तेथे गेले होते रामाजी विसाजी तेथेच गेले होते तेथे रामाजीस सापे खादले उपाव करून बरा जाला नव दिवस जाले होते कान्होजी नेऊजी देशमुखाचा भाऊ साईकाली घरास आणिला त्यास पुसले की काका तुमचे वीख उतरले की नाहीं यावर घरात जाऊन रामाजीचे बायकोस म्हणो लागला की काकी वाटीत तूप घालून दे की याचे वीख उतरले की नाही हें पाहूं म्हणवून तूप बलात्कारेच वाटीत घालून त्याचे तोंडी लावीताच गलिया पासीं फडू आला तेच समई प्राण गेला त्याच मरणें मेला. ऐसे दोन खून हरबा व रामाजी हे खून देशमुखी केले यावर देसमुख गावास आले सोबई विसाजी पंतहि गावास आले विसाजीपंत देशकुलकर्णाचा कारबार करू लागले यावर आपमरणेच राजुरी मेले त्याचे दोघे पुत्र व स्त्री उमाबाई मेली त्याची सून एक आहे ते माहेरी आहे धामधुमेआधी वर्स दोन राजुरी आपले घरीच मेले हे लिहिले सही रामाजी पंताचे संतान कन्या दोही वडील कन्या जिजाई तिचा पुत्र सखोजी त्रिमल हाली मौजे पिंपलगाउ जोगा पा करडे तेथील कुलकर्ण करीत आहे दुसरी कन्या धाकटी चापाई तिचा पुत्र अंताजी दादो

गोही

रघुनाथ जोसी अकोलेकर

विनायेक जोसी याचे पुत्र

ले. ४६७ } { श. १६०७ कार्तिक शु. ७
{ इ.१६८५ आक्टो. २४

श्री.

राजश्री विसाजी माणकेश्वर देशपाडिये पा अकोले यासि

सयाजि देशमुख मोकदम.

(नां. वि.)

हाराजी
(नां. वि.)
देसमुख †

मौजे थूगौळ बुा पा मजकूर सुा सन हजार १०९६ कारणे तुम्हास लेहोन् दिधले ऐसे जे तुमचे सेत वाडिलाचे मौजे मजकूरच्या सिवेस व मौजे वासेराचे सिवेसी आहे ते कहदसाला साले साटी सतर पडिले आहे ते तुम्ही किर्दी करणे यावरी तुम्ही म्हटले कीं

† वहुदळी

आपणास इस्तावा सात साला बीलामख्ता दर चाहुरी शा ६०८. साठी बाल तरी किर्दी करून तरी तुम्ही सात साला इस्तावेमाफीक किर्दी करणे माफीक इस्तावे टका वसूल करणे बी ता

सन १०९७	सन १०९८	सन १०९९
दर चाहुरी शा	दर चाहुरी शा	दर चाहुरी शा
८८.	१६८	२४८.
सन ११००	सन ११०१	सन ११०२
दर चाहुरी शा	दर चाहुरी शा	दर चाहुरी शा
३२८.	४०८.	४८८.
सन ११०३	लग्न	
दर चाहुरी शा	०	
६०८.		

सदरहू प्रमाणे कीर्दी करणे साल बसाल जे कीर्दी कराल त्यास माफीक इस्तावा शा वसूल करणे यासिवाये सादीलवार व पटा वगैरे बाबर्ता व बेठी बिगार जेवा आवा तुम्ही न देण जोवरी तुमच्यानी कीर्दी होईल तोवरी कीर्दी करून खाणे आन टका वसूल करणे जेव्हा तुमचे खातिरेश येईल तेव्हा टिकणे हे लिहिले सही

तेरीख ५ माहे जिल्हेज

ले. ४६८ { } { शा. ? इ. ?

श्री.

यादि आमलदार शा ता

कारांकर्दी चागस्ताखान गुमास्ता	कारकीर्दी सलाबतखान
कारकीर्दी (अस्पष्ट)	आमल जमाल खान
आमल चादबिबी	आमल दौलतखान लोधी
आमल सादतखान	अमल मलिक अवर यापैकी जागीर रहीम
अमल मिया राजा	याचे वेळेस धाकोजी देसमुखी हाती घरून
कारकीर्दी स्याहाजी जागीर त्रिबकजी	रंगोजी कहून लेहाविली पेस्तर निवाडा करून
अमल मोगलाई	रंगोजी दूर केला
१ मिरजा आबदुल फता	आपले मिरास
१ जानजी करदू अमल खालिसा शिवाजी	१ घरठाणा
गोविद सेख धडीचे जो एक साल केले	१ विहीर
	१ टाके
	१ आबे

१ अमल अनाजी नारायण सेखदार
१ अमल बिन्हाबनदास
१ अमल मिर्जा मुकीम
१ अमल विसाजी गोविद सैद बडीचे जोर
येक साल केले
१अमल द्वारकादास
१ अमल मदन मोहन
१ अमल कारतलबखान सिवाजी मोर (?)
देऊ आपला भाऊ कथला केला म्हणौनू
अमानत केला ताा सन १०६५ सन
१०६४ हिमाईत अमीन धोडोवाने केले
झा सन १०६८ताा सन १०७२
व सन १०७३ साल निमे
२॥ जागीर मिर्जा इभराहम
१ अमल च्यतरोजी साल

—

३॥

संगमनेर-कुळकर्णी.

ले. ४६९ } { श. १५३२ वैशाख शु. ९
इ. १६१० एप्रिल २१

(अष्ट. को. फा. व शिक्का फा. मजकूर)

अज रख्तखाने खुदायेवंत मलीक सर्ज्या मलिकंबर खुर्ला दयाम दौलत्हू बजानेव कारकुनानी हाल व इस्तकबाल परगणे संगमनेर वावी सुा सन असर व अलफ बिदानद की वजारतमाब दतो नागनाथ कुलकर्णी (डावीकडे बहु-दळी फा. शि.) हाजूर मालूम केले की बाजी पाा व त्रिंबक पाा मोकदम रया.....ताऊजी सदाफुले व भाऊ भोरड वतन पा कालवाबा व असू ढोण्या व भिऊजी तेली व समस्त राया व दाजी व गोधल कुलकर्णी काा राहाते येही अर्जदास्त बंदगी हजरतीचे पाठविले की आपला थल मौजा संगमनेराखाले पहिले होता त्यास परगणा जरीब जाला ते वेलेसी लाग चावर ५४८।१ केले त्या तरफ नागोजी देसकुलकर्णा चावर २७८८३ पैकी तरफ मजकुरावरी चावर १३॥ तनुरकि केली आणि आपला गाव कहीदीम जमीन जुमला चावर ८०८ होता त्याजवरी चावर १३॥ येकूण चावर ९३॥ केले म्हणवूनू आपण कमलजी देसमुख व तुका मायदेव देसकुळकर्णी याजपासी होय न होय करावयासी गेलें तेहां उभय मिळे जे बिरा-बाच्या बनाची जमीन खाले आहे म्हणवून [illegible] जमीन [illegible]

UNIVERSITY

आहे त्यास आपण उत्तर दिधले जे तेथे जे कोण्ही सेत करितील त्याचे वाटोळे होते तुम्ही आपल्या गावावरी जमीन चढऊ नका त्यास तेहि आइकिले नाही म्हणवूनू आपण बंदगी हजरती आलो मुदा मकसूद जाहीर केला जे देसमुख व देसकुलकर्णी आपली आकस करितातां आपली नादणूक त्याखाले होत नाही त्यावरून बदगी हजरतीचा हुकूम जाला जीं दिवाणीची शेरणी कबूल करणे तुमचा मौजा आहे तो कसबा अलहिदा परगणीया सिवाये आहाल करून रजे बरहुकूम आपण सीरणी होन तीन हजार कबूल केले ते दर महीन्या होन से ५०० से देऊनू सा महिन्या होन तीन हजार ३००० वसूल करून म्हणऊनू गणेश पाटील बंदगीस व ओलेसी ठेविला होता मा महिने जाले होन पावले नाहीत म्हणऊन गणेश पाटिलास ताकीद जाली हुकूम जाला की हतीचे पाई देणे त्यावरी गणेश पाटिलाने अर्ज केला जे आपण नावाचे पाटील आहो गावामधे कारभार कुलकर्ण्याचा आहे हाली यमाजी कुलकर्नी याचे घरा जयेमंगल घोडा आहे तो लायेक बंदगी हाजरती आहे व रामाजी गोरीयाचे घरी + + + + किमतीचा आहे यैसीया दोन्ही वस्ता हाजूर आलीयाने होन मजकूर वसूल होतील आणि सेतकरास जीवदान दिल्हेस होईल त्यावरून यमाजी कुलकर्णी व रामाजी गोरी यास तलब केली की घोडा व हिरा हाजूर घेऊन येणे मग यमाजी कुलकर्णी घोडा घेऊनू हाजूर आला आणि रामाजी गोरीयाने हिरा मोकद मापासी दिधला आणि म्हणो लागला की आपण काही हाजूर जाणार नाही, मग तो हिरा तेज पाटील व भोनू भोरडे व आसू ढोप्या व भिऊजी तेली व दाजी कुलकर्णी घेऊन हाजूर आले मग यमाजी कुलकर्णी + + घोडा दाखविला तो बंदगी हाजरतीने खूस केला घोड्याची किमत होन ३००० तीन हजार जाली ते होन येमाजी कुलकर्णी याचे दरा घातले मग येमाजी कुलकर्णी यास आपण बजीद जालो जे होन आपणासी कर्ज देणे हे होन आपण दिवाणात देऊन शेरणी बेबाख करून गणेश पाटिलास सोडऊन गांवास घेऊन जाऊनु मग तुमचे होन गावी आपण देऊन यावरून यमाजी कुलकर्णी यान होन १००० तीन हजार आपणास दिधले ते आपण दिवाणात सेरणीबाबतीं होन ३००० तीन हजार भरिले गणेश पाटील सोडिविला मग हिरा बदगी हजरतीस भेटविला तो हिरा रीक्षवतापासी दीधला तेही त्या हिरियासी खोडी कैफ आहे म्हणऊन जाहीर केले तो कसबे मजकुरीहुन हवालदाराची अर्ज दास येऊन पावली की रामाजी गोरी यान हिरा मोकमाच्या हवाला करून हजूर पाठविला आणि तो लेकरे बाल आपली घेऊन आपले पातनाही टाकून येदिलशाहीचे सरहदेमधे वाईस गेला त्यावरून इतराजी जाली हुकू [म] ाला की हिरियाचा धणी काये सबब पलाला तरी तुम्ही गावास जाऊन त्यास घेऊनु येणे याचा हि हिरा त्यास देउनु मग आपण रजा घेऊन गावास आलो अवघी रयेती मेलऊन कीकती जाहीर केली तीन हजार होनाची पटी करून मागितला तरी आपणामधें काहीं ाकती नाही देशमुखी व देसकुलकर्ण त्या दोहीं वतनाचा हक अदावा जो खाईल तो हे ोन देईल यैसा तह करून बदगीस अर्जदास्त लिहिली आहे तरी मेहरवाणी करून येमाजी

कुलकर्णा यास कसबे मजकुरांची देशमुखी व देसकुलकर्णाची सनद सादर जालिया गांवांतील कुल कैफती तुटेलीं आणि गाव आबाद होईल बराये अर्जदास्त खातिरेश आणून नजर आबादानीवरी देउनु येमाजी बिन बहिरजी इबन केसोजी कुलकर्णी यास कसबे मजकुरांची देशमुखी व देशकुलकर्ण मिरासी करून दिधले असे याचा जो गहदम व रो (?) मुशाहिरा भोगभोगवटे चालत आले असतील तेणेप्रमाणे येमाजी मजकुरास देत जाणे हाली नफर मजकूर सेरणी होन २०० दोनीं से भरिले आहेतीं त्यास इनाम जमीन देसमुखीस चावर १८ येक व देसकुलकर्णास चावर नीम -॥- येकूण चावर १ ॥ दीड दिधला असे येणे प्रमाणे नफर मजकुरास सनद व तसर्राब देशमुखी व देसकुलकर्णाची देउनु महालास बोहडाविले असे सदरहु प्रमाणे गहदम व रो (?) मुशाहिरा व भोगभोगवटे व हाली इनाम चावर दीड नफर मजकुरासी देणे आणि दर हरसाल खुर्दखताचा उजूर न करणे तुम्ही तालीक घेउनु असल नफर मजकुरापासी राहो देणे ¦ मोर्तबु सुद रुजु सुरनिवीस

तेरीख ७ माहे सफर

बार सूद सुरु सूद

———

ले. ४७० } { श. १५४० ज्येष्ठ व. ५
{ इ. १६१८ मे २३

नकल

अज रख्तखाने खुदावद मलक आबर दुवाम दौलतहूं बजानेब दाउदखान ठाणेदार का संगमनेर वावी बिदानद सुरुसन तिसा आशर आलफ मोकदम व च्यायान कसबे मजकूर आर्जदास्त छ २९ जमादिलावली आली राा छ १७ माहे जमादिलावल तेथे मजमून की कृष्णाजी नरसीह कसबे मजकूर कुलकर्ण सिरजोरीने करितो प्रजावरी बाकी रहात नाही आणि बाकी लाइनी काहाडून फाजील नख्त घेऊन जातो येणेकरून प्रजा रजीस होताती कुले गयाल होताती नाा मजकूर काही मिरासीदार नव्हे गैरमिरासी होऊन कुलकर्ण करितो व मसाहती सेती बेरीज आहे ते एक आणि गावात येऊन बेरीज आणीक करितो प्रजेस तेच वख्तीं रोखा लिहून देत नाही कारकुनासी सागितले तरी सरजामी करीत नाहीत साल्गुदस्ता रयेतींचे फाजील तहसील कृष्णाजीने नेली आहे ते दोविली पाहिजे व कृष्णाजीचे रयेत खुशनुद नाही म्हणोन लिहिले* होते तरी कुलकर्णी गैरमिरासी होऊन रयतीस रजीस करितो व नसल्या बाकी काहाडतो या अमलाची तुम्ही तहकीकी करून वाजबी पुरसीस करीत नाहीत तुमचे ठाणे ते जागा आसता तुम्हास इतकी खबर नाही काये माना आहे आता तमाम आमळ खातरेस

---

† अक्षरांचें वळण निराळें. * येथपयतच्या मजकुरांचें व याच तारखेचें एक पत्र मलिकंबरानें संगमनेरचे मुकदम व रयत यांस लिहिलें असून ठाणेदारास हकीकत सांगा म्हणजे तो निकाल करील असे आश्वासन दिले आहे.

(आघू) न सरजामी कीजे रयतीचा दिलासा करून कार्दी मामुरी होय तो आमल की रयेतीची फिर्याद येऊ न दीजे कोन्हाची कोसीस न कीजे मो सूद
रबु सूद ता ता १८ माहे जमादिलावर

बार सूद शुरू सूद

ले. ४७१ } { श. १५४० भाद्र. शु. १३
{ इ. १६१८ आगष्ट २३

(फारसी मजकूर)

अज रस्तखाने खुदायेवंद खान मा ता सर्के मा अंबर कुली याम दौलतद्दू बजानेब कारकुनान पा ता सगमनेर बिदानद सुा तिसा असर अलफ पंताजि रखमांगद कोकिल कसबे मजकूर हुजूर येऊन मालूम केले जे कसबे मजकुरीचे कुलकर्न आपली मिरास पिढी दर पिढी आहे आपले वडीली नरसो दादो भानजा त्यास यारेदी ठेविले होते तो चालवीत होता त्यासी खुदाई जाली त्यावर त्याचा फर्जंद कृस्णाजी नरसीह आजवर चालवीत होता हाली तमाम रयेती साहेबापासी हजूर येऊन फिर्याद जाली जे कृस्णाजी कुलकर्ण चालवितो मिरासी नव्हे सिरजोरी करून तमाम कसबा रजीस केला मोकदमास मागे घालून सिरजोरीचे अमल करितो म्हणोन मालूम केले साहेबी कृस्णाजी दूर करविला तर मिराम आपली आहे आपनास देवविले मालूम जाले हाली पंताजी रखमांगद मिरासी म्हणोन कसबे मजकुरीचे कुलकर्ण दिधले सुगडी देऊन पाठविला असे या पासून कुलकर्णाचे काम घेने कृस्णाजीपासून पेसजीजे कागद वा हिशोब रयेतीच्या मुकाबलियाने घेऊन याचे हवाला कीजे तालीक घेऊन आसल नफर मजकुरापासी असो देणे मो तेरीख १२ माहे रमजान

ले. ४७२ } { श. १५६०—१६००
{ इ. १६३८—१६७८

श्री

दर बदगी नबाब साहेब

• •ल अर्बदास्त अज बदगी बदे कमीन बदेगानी बदे हिरोजी दादजी दे (समु)ख व कृस्नाजी जानो देसपाडिया + + व मोकदम व माहाजन कसबे + + + जुनर व पेठा व देहाये सा ता मजकूर मीसाजद

दा ता ता तेरीख १९ माहे रजब साहेबाचे नेक नजरेकरून बखेर सलाबत असे

---

‡ याच आशयाचें एक पत्र (मिति श. १५४० आश्विन शु. ४ इ. १६१८ सप्टेंबर १३) संगमनेर परगण्याच्या ठाणेदाराकडून संगमनेरचे रयत व मोकदम यांस असून त्यात तंताजी रखमांगद याजकरवी संगमनेरचें कुलकर्ण (कागद देऊन) घेत जावे असा हुकूम आहे.

बां साहेब सलामत साहेबाचा परवाना कमीनास सादर जाला तेथें रजा जे हिरोजी कृष्ण कसबे संगमनेरीचा कुलकर्णी हा कुलकर्ण करीत असतां *देवाजी पंतोजी आपले कुलकर्ण म्हणौउनु हुजूर येउनु मालुम केले तरी हर दो नफर यासि समत मजकुरास तुमा (?) नजीक पाठविले आहे तरी तुम्ही बैसोन बरहक मुनसिफी करून याचा निवाडियाचा पत्र करून दिधलिया तेणेप्रमाणे खातीर मुबारकेस आणून विले लाउनु म्हणौउनु रजा रजे हुकूम कमीने मजाल्सी करून हर दो वादियापासून राजीनामे आपिले लिहुन घेतले का पा (चजण ?) जो निवाडा करितील तेणेप्रमाणे आपण हर दो जण आइकोन यासि जो हिला हरकती करील तो खोटा म्हणौउनु हर दो जणी लिहून दिधले त्यावरी काजीची मोहर व दाहा जणाच्या साक्षी करून ठेविले त्यावरी आग्रवादी देवाजी पतोजी त्याची तकरीर लिहून घेतली ...चा पछमवादी हिरोजी कृष्ण याची तकरीर लिहून घेतली हर दो जणाच्या तकरीरा खातिरेसी आणिल्या तेथे देवाजी पंतोजीच्या सनदेस मजमून की रयती हुजूर जाउनु फिर्यादी जाली की कृष्णाजी नरसीह मिरासीदार कुलकर्णी नव्हे जोरावरी करितो म्हणौउनु हुजुरून दूरी करून पताजी रखमांगद कोकील मिरासीदार कुलकर्णी आहे म्हणौउनु रयेतीने सांगितले त्यावरून सनद (नफर ?) मजकुराला देउनु कुलकर्ण दिधले नफर मजकूर माहालास येउनु ठाणाची चिठी घेतली ते खुर्दखत व ठाणाची चिठी कमीने मनास आणिल्यावरी हिरोजीस पुसिले की तुझी सनद कैसी आहे ते दाखवणे त्यावरून हिरोजी मजकुरे आपली सनद आणून दाखविली तेथे मजमून मिरासी कुलकर्णी ऐसा नाही मालुमातीचे खुर्दखत आहे व ठाणाची चिठी नफर मजकुरापासि नाही येणे प्रमाणे मनास आणून कर्मीन बोलिला का माहालीची व थलीची सडी आणउनु तेणेप्रमाणे हर दो जणाचा निवाडा करून यावरी हर दो वादी राजी होउनु सडीवरी मदार ठेउनु सडी पत्रे लिहिली + + करिता हिरोजी मजकूर राजी नव्हेची नाराजी जाला ते सडीचे कागद मकूफ राहिले यावरी पाचजण मजाल्सी बोलिले की सडी वेगली मुनसिफीदारी मुनसिफी कैसी करावी म्हणौउनु हिरोजी मजकुरास माकुल केले की सडी आणवणे सडी प्रमाणे निवाडा होईल त्यास आपण राजी आहे म्हणौउनु हिरोजीने कबूल केले त्यावरून मागती सडीपत्रे लिहून तयार केली दुसरे रोजी माणूस आणून स्वार करविता हिरोजी मजकूर फडीहून गैर हाजीर होउनु गेला असे यावरून देवाजी पंतोजी कर्मीनाचा निरोप घेउनु साहेबाचे बदगीस आला असे बदगी रोसन होये हे अर्दास +

---

* या पत्रावर तारीख नाही पण देवाजी पंताजी व हिरोजी कृष्ण या नामावरून या पत्राचा काल श. १५६० ते १६०० चे दरम्यान असावा. वादी प्रतिवादीचे वडीलही श.१५४० त भांडत असल्याचें (ले.४७१) वरून दिसतें. प्रस्तुत वादी प्रतिवादी (ले.४७१) मधील वादीप्रतिवादींचे मुलगे असल्याने वरील काळ ठरविणें युक्त आहे.

+ पाठीमागे वाटोळा शिक्का आहे त्यांत ' हीरोजी बीन दादजी हाडे ' ही अक्षरे आहेत.

ले. ४७३ } {श.१६१९ भाद्र.व.१२
इ. १६९७ सप्टे २

(फारशी मजकूर फाटला आहे.)

द बो नरिाजी वा नरहर इा गोजाजी गुमास्ते माजुल (?) त्रिमलराऊ व विठलराऊ कोकिल कुलकर्णी काा संगमनेर सुबे कुजस्ते बुनियाद सुद सन ११०७ कारने लेहोन दिधले यैसा जे आपणास माधवराऊ कुलवरणी काा माार बदल मोहसबा सावि क व दफ्तरे १५ पधरा सालासी याबदल घेऊन आले त्यासी आपण दसोजी पाटील काा माार यासी हाजीर जमान देऊन खरा जालो येकरार करिता मी कुल दफ्तरे माहासबा साबकि आपले तुहदियाचा व दादो बीरदेऊ आपला भाऊ त्याजपाशी सिरस्ता कागद मतलबा आहेत कुली गुमास्ते मनसुबा देऊन मामला फरुक करून येका महिन्यांत बिला उजूर फारीख करून यासी नवदीगर न करून हा मुचलका लेहोन दिधला सही कागद कचे पके कुल बिला उजूर देऊन बिा

तेरीख २५ माहे सफर
सन ४१ जुलूसवाला
गोही (उजव्या बाजूच्या समासातल्या सह्या)

(नाग.चें चित्र) कु.....ल व रुहोजी चानसुली व मल्हरजी खैर व सालोजी भाडरे.....ना. चि आनदराऊ आा देसमुख पा सुपे शाहिदी सूद (फारशी शिक्का व त्यांत नांगराचें चित्र) आजो मल्हार व भगवत विनायक कुलकर्णी काा मजकूर (हें नांव पत्राच्या पाठीवर आहे.)

ले. ४७४ } {श. १६५४ माघ. शु.५
इ. १७३३ जाने. ९

(फारशी वाटोळा शिक्का व फारशी तीन ओळी मजकूर)

आज्ञापत्र समस्त राजकार्ये धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान ताा मोकदमान कसबे संगमनेर सुा सलास सलासीन मया अलफ हैबतराऊ याणी हुजूर विदित केलें कीं कसबे मजकूरचे कुलवर्ण आपुले आहे आपले पुतने व गुमास्ते कुलकर्णावरी आहेत त्यासी आपला रुसूम सुरलीत देत नाहीत तरी ताकीद करावी म्हणौन विदित केले त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी हक रुसूम व इनाम इत्यादिक असेल ते सुदामदप्रमाणे सुरलीत चालवणे हिला हरवत न करणे हैबतराऊ याचे अवश्यक जाणोन यांचे कुलकर्णाचा हकरुसुमात हरकत न करणे जाणिजे छ ३ शाबान पा हुजूर

ले. ४७१ } { श. इ.

यादी माधवराव बिरादर देशमुख आनदराव नाईक देशमुख पो संगमनेर याच्या धाकट्या घराण्यातील असता वडीलपणा आपले वतनाचा निमे वाटणी ध्यावी आणि सिका दुसरा करून ध्यावा म्हणोन वाद घालून कज्या उपस्थित करून तकलुबी मालुमाती साधने दाखवितात तो बिरादर धाकटे याचे साधनाचे उपयोगी नाहीत त्याचा तपसील येणेप्रमाणे

१ महजरनामा हाजर मज्यालस सन आर्बा तिसैन तिसा मयाचे साली (श. १५१५ इ. १५९३) लिहिला आहे त्यांत अकरा हजार होनाचा व वतनाचे वांटणीची काही येक संभुत नसता खडोजी बिन कमलोजी बिरादर धाकटे काही दिवस कारभार करीत होते तेव्हां कुभाड करून देशपाडे पो मार याचा गुमास्ता तुको मायदेव म्हणोन होता त्याचा गुमास्ता कोडाजी दामोधर यास हातासी धरून खडोजीने आपल्या साधनाचे उपयोगी पुढे मागे पडेल म्हणोन आपल्या घरींच कोडाजीचे हाते महजर लेहून त्याजवर कोडाजीचे बिकलम घालून महजर करून ठेविला त्यास काही दिवसानी तुको मायदेव गुमस्ता असता देशपाडेपणाचा वारसा करू लागला सा देशपाडे याणी तुको मायदेव यास मलिक अबर याजपासी नेऊन फर्जात करून देशपाडेपणास खोटा पडला तेव्हा तुको मायदेव याचा गुमस्ता कोडाजी याचे हाते कुभाडाचा महजर घरात लेहून खोट्या गुमस्त्याचे बिकलम घालून मजकूर साधनाचे उपयोगी पडेल म्हणोन करून ठेविला होता तो बिरादर धाकटे याचे साधनांचे उपयोगी नाही यास वर्ष २१६

१ शके १५९३ (इ. १६७१) विरोधी नाम संवत्सरे या साली खडोजी बिन मलजी देशमुख आनंदराव नाईक याचे वडील घराण्यातील देशमुखीचा कारभार करीत असता खडोजीस कामाकाजामुळे महाराजानी रायगडास नेले होते मागे निमे देशमुखीचे विभागी म्हसके त्यात नागोजी देशमुख याजकडे वडीलपणा त्याचे धाकटे घराण्यातील भिवजी म्हसका कारभार करीत होता त्याचे चितात की सेलके व म्हसके या दोही तक्षिमात भावाबंदाची वाटणी नाही याजकरिता सेलके याचे तक्षिमेत वाटणीचे कुभाड करावे म्हणजे आपले तक्षिमेत चाल पडेल ऐसा विचार करून संताजी बिन खडोजी सेलके लहान घराण्यातील याचे नावाचा कागद खडोजी बिन मलजी रायगडास असता त्याचे नावे पत्र लिहा यांत मार की तुझे बारा गाव वतनी व जमीन चावर येक विघा साडे बारा हजारास आपण गाहाण ठेविले आहे सोलावे वर्षी खडून घेउ म्हणोन कागद तयार करून त्याजवर आपली नाव निशाणी शिक्का करून खडोजीची बायको घरी होती तिजला भुलथाप देऊन तिजपासून त्या कागदावर सिका करविला तो कागद भिवजी म्हसका आपल्या साधनास काढितो व माधवराव सेलके ही आपल्या साधनास धरितात. त्यास खडोजी हजर नसता मागे-भिवजीने कुभाड करून खोटा कागद करून खडोजीचे बायकोस भुलथाप देऊन सिका करविला त्यास बारा गाव व जमीन याची वाटणीच कोणी दिल्ही घेतली नसता कल्पित कागद करून साधनास धरितात त्याचा उपयोग नाही त्यास१३८ वर्षे.

१ मौजे पोयेगाव व मौजे ग्रेस येथील सिवेचा काजिया होता त्याचा निवाडा मामलेदार याणी करून पत्र करून गावकरी यास दिल्हे त्याजवर खडोजीची साक्ष आहे साा पत्र साधनास काढितात त्यास खंडोजी काही दिवस कारभार करीत होता त्यावेलेस पत्रावर साक्ष घातली असेल म्हणोन धाकटे बिरादराचा वडील होतो असा अर्थ नाही तेव्हां ते पत्र वडीलपणाचे साधनाचे उपयोगी नाही यास वर्षे

१ हिसेनामा परमानंद अमीन याचे वेलचा चोहो सिक्याचा आहे तो दरम्यान तकलुफी खोटा कोणी करून दिल्हा नाही सिके खोटे केले त्या पत्रा प्रो चाललेहि नाही असे असता तो हिशेनामा खोटा तकलुबी साधनाचे उपयोगी नाहीं त्यास वर्षे

१ हिसेनामा दुसरा वगैरे कागद सुभानजी बिन संताजी धाकट्या घराण्यातील कुभांडी होता त्याणे पूर्वी औरंगजेब पातशाहाचे वेलेस नगरचे मुकामी जाऊन तकरीर केली + + वतनाची वाटणी नवीन करून द्यावी आणि खडोजी देशमुख याणे पनास हजार रुा खाले आहेत ते घ्यावे तेवां सरकारची तलब खडोजी देशमुखास जाहाली खडोजीनें तमाम प्रगणे मारचे पाटील जमा करून नगरास नेले तेव्हां चौकसी करून मनास आणिता खडोजीचे आगी पैका लागू न होय सुभानजी खोटा पडला त्यास कैदेत ठेवावा असे ठरले तेव्हां सुभानजी गैरहाजर जाहाला .नंतर खडोजी देशमुख यास सरफराज करून परवाना दिल्हा की सुभानजी खोटा या भावे परवाना बजिनस आले त्यास सुभानजी कुभांडी त्याणे खोटी पत्रे करून ठेविलीं ती साधनाचे उपयोगी नाहींत तीं पत्रे

१ हिसेनामा दुसरा सन १०३२ (श. १५७४ इ. १६५२) सालचा म्हणोन आहे तो.

१ राजानाम्याचा नकल आहे सन १०९९ (श. १६११ इ स. १६८९)

१ शाहिदीनामा ठाणे कसबे सिनर सन

३ पारसी परवाने अस्तखान वगैरेयाचे वेलचे आहेत

४ कमलोजी देशमुख बिरादर याचे नावे दिवाणच्या हुजती

१०

१ मौजे समनापूर पो मा येथील पाटिलकीचा काजिया होता त्याचा निवाडा हर्काम सेरा काजी ठाणेदार व देशमुख व देशपांडे पो मार याणी करून त्याचा महजर केला त्याजवर धाकटे घराण्यातील त्याची सही नाव नागर आहे म्हणोन त्या महजराची नकल साधनास दाखवितात त्यास धाकट्या घराण्यातील खडोजी कारभार करीत होता त्याचे नाव नागर सही केली असल्यास वडीलपणाचे साधनास उपयोग काय त्यात नकल आहे. असल कोठे नाही

\+ + + + +

सोंधें-सोंधेकर

ले. ४७६ } { श.
{ इ.

श्री

राजश्री सदासीव नाईक गोसावी यांस

-॥ द अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्य—प्रती राजश्री राजाराम छत्रपति उपरि सांप्रत तुम्ही पत्र पाठविले ते पाऊन वर्तमान कलो आले लिहिले कीं आपणाकडील इत्यर्थ करायास रा माधवरायास पाठविलें आहे त्याचे विनंतीप्रमाणें भाषापत्र लिहून पाठविलीयां द्रव्याचा निर्वाह करून देउन म्हणोन तरी तुम्ही पूर्वी माधवरायासमागमे पत्र पाठविले त्यावरून स्थलाचा व द्रव्याचा निर्णय करून भाषापत्र लिहून देऊन मा। बयाजी विठल व रायाजी रखमांगद यांस तुम्हापासी पाठविले आहे त्याबा पठाणाच्या व साउकरांच्या हुंडिया करून पाठविलीया आहेत त्यास वाइदा चुकोन गेला अद्याप पैका प्रविस्ट जालियाचे उतर आले नाही याकरितां त्या लोकांचा बोभाट जाला आहे तरी यैसे न करितां केलिया निर्णयाप्रमाणें ज्याचे त्यास द्रव्य प्रविस्ट करून उतर पाठविलें पाहिजे वरकड वर्तमान रा। माधवराउ तुमचे हेजीब येही लिहिले आहे त्यावरून कलो.येईल भाषापत्र रा। माधवरायाचे विदमाने साउकरापासीं दिल्हे आहे पैका प्रविस्ट होतांच भाषापत्र तुम्हापासीं पाठऊन देतील जाणिजे बहुत लिहिणे तरी तुम्ही (बि) सुज्ञ असा

(बा) श्रीधर्म प्र-
द्योतिताशेष व
र्णो दाशरथेरिव
राजारामस्य मुद्रे
यं विश्ववंद्या+
विराजते

(ब) मर्या
देयं विरा
जते

ले. ४७७ } { श.
{ इ.

श्री

राजश्री सदासीव नाईक सोंधें गोसावी यांसि

-॥द सकलगुणालंकरण अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्य——प्रति राजश्री राजाराम छत्रपति जोहार उपरि येथील कुशल जाणऊन स्वकीये लेखन करीत जाणे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते रा। माधवराउ यांचे विदमाने प्राविस्ट जाले लेखनार्थ अवगत होऊन समाधान जाले लिहिले कीं पूर्वी निर्णये केलियाप्रमाणें द्रव्य त्यांचे त्यास प्रविष्ट करून भापापत्र घेतले

+ पत्राच्या प्रारंभी उजव्या कोपऱ्यांत कानडी अक्षरांनीं 'भाव सं वैशाख प्रतिपदा तिथिगे वंतु 'असें लिहिलें आहे.

पुढेंही उभयेपक्षी स्नेह उत्तरोत्तर चालोन स्वधर्माची अभिवृधी व्हावी हेच अपेक्षा धरितों म्हणौन विशदे लिहिले व कितेक वृत्त माधवरायानीं सांगितले तरी तुमचा आमचा स्नेह कांहीं नूतन नव्हे पूर्वापार तथिरूप राजश्री——कैलासवासी स्वामीपासून चालत आहे तेथें काये न्यून पडो पाहतें यैसीयास गोसावीयानी जो निश्चय केला आहे त्यास अंतराये पडों नेदितां दिवसेंदिवस सौहार्द्रता वाढे ते गोष्टी करणे ये विशींचा विशदार्थ निराले पुरवणीस व राा कोनपा नाईक यांचे पत्रीं लिहिला आहे व मध्यस्तांस व माधवरायास सांगितले आहे ते लिहितील त्यावरून कलो येईल तदनुसार निर्वाह केला पाहिजे आम्हापासून केल्या निर्णयास अंतर पडणार नाहीं तुम्ही आपणाकडून सहसा अंतर पडों न देणे (नि)बहुत लिहिणे तरी गोसावी सुज्ञ असा (मुद्रा व सीमा ले. ४७६ प्रमाणें)

ले. ४७८ } {श.
{इ.

श्री

राजश्री सवाई सदासीव नाईक गोसावी यांसि

-।। द सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य——प्रति राजश्री राजाराम छत्रपति जोहार उपरि येथील कुशल जाणऊन स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष गोसावी यानी राजकारण प्रसंगानिमित्य राजश्री मध्वराउ रखमांगद यांस आम्हापासीं पाठविलें येंही येऊन सार्यंत वर्तमान विदित केले त्यानंतर बोलीचालीचा मुशकस होऊन भाषांपत्रें दिल्ही द्रव्याचा निर्वाह व्हावा यास्तव मध्वराउ येथे राहिले होते त्यास गोसावी यानी वचनाप्रमाणे द्रव्याचा निर्वाह केला यावरून समाधान वाटले प्रस्तुत येथील प्रसंग येक प्रकार जाला आहे तो अर्थ तुम्हास कललाच असेल यैस्या विशम प्रसंगामधें सर्वस्वें सानकुलता करून स्नेह अभिवृधीस पाववावा हें तुम्हास विहित आहे तथापि हें राज्य देवांब्राह्मणाचे या राज्याचा अभिमान श्री——स आहे तो कल्याण करीलच यांत संदेह नाहीं तुम्हास ही जो उचित पदार्थ असेल तो करून आमच्या अभ्युदयाचे विभागी होणे वरकड कितेक वर्तमान येथील मुख्य सामादिकानी तुम्हास लिहिले आहे त्यावरून राजश्री मध्वराउ रखमांगद मुखवचने सांगतील त्यावरून कलो येईल बहुत लिहिणे तरी गोसावी (नि) सुज्ञ आसा (मुद्रा व सीमा ले. ४७६ प्रो.)

ले. ४७९ } पौ {श. १६१८ आषाढ शु. १५
इ. १६९६ जुलै ४

श्री

महादेव (बालबोधींत)

राजश्री सवाई सदाशीव नाईक सोंधें गोसावी यांसि

-।। द अखंडीतलक्ष्मीआलंकृत राजमान्य——— प्रति राजश्री राजाराम छत्रपति उपरि तुम्ही माा बायाजी विठ्ठल व रायाजी रखमागद यांसमागमे पत्र पाठविलें होतें तें पाऊन लिहिला अभिःप्राव व उभयेतानी कितेक स्नेहाचे प्रसंग मुखवचनी सांगितल्यावरून त्यासारिखें अंतःवर्णास आणून त्याचे उत्तर उभयेता मशारुईल्लेस सांगून त्यांहाती तुम्हास लिहिविलें व आम्ही आपलें उत्तरहि पाठविले यैसें उभयेपक्षीं उत्तर प्रतिउत्तर पाठवीत असतां मग तुम्ही आपणाकडील भले मनुश रा कोनेरपंत यांचे विद्यमाने रा मध्वाजी रखमांगद यांसमागमें निर्वाहपूर्वक सांगून पाठविलें तेंही राजश्री शंकराजी पंडीत सुमंत व राजश्री निलो कृष्ण यांचे गुजारतीने विदित केलें कीं उभयेपक्षीं पूर्वापर स्नेह सारोधार चालोन आला आहे व पुढेंही उतरोतर चालावा यैसीयासी पंजमहाल देश दुर्गादि आपणांस मोकरर करून पारंपरा चालावें यैसें निर्वाह करून भाषापत्र द्यावें यासी देऊं करार केलें मख्ता होन प्रल्ये-घटी २२२०० बावीस हजार दोनसे नेम करून लिहून पाठावलें यावरी यासी मान्य करून सदरहु पंजमाहाल देशदुर्ग तुम्हास आम्ही आपुले मनःपूर्वक भावसंवत्सरीं मोकरर करून दिल्हे बीा

ताा आंकोले देहाये	ताा कडवाड देहाये	ताा सिवेश्वर देहाये
देखील कोट व महेंद्र-	देखील कोट १	देखील कोट १
गड १		
ताा कदरें देहाये		ताा खोलगड देखील
देखील कोट व म-	ताा अडव दे-	खोलगांव १
धुरगड १	हाये देखील	
सिंदीगड १	लंग	लंग

येकून माहाल ५ पांच व कोट ४ च्यार व गड ४ च्यार यासी नख्त होन प्रल्य घटी बावीस हजार दोनसे घेऊन तुम्हास सदरहु माहाल ५ व कोट ४ व गड ४ दिल्हीं आहेत तुम्ही आपले वौशपारंपरेने अनुभऊन सुखरूप असणें तुमचे देश विलायत सोंधे देहाये देखील हुडवा वगैरे मुलूक तालुका बंकापूर व आम्ही क्रियापूर्वक दिल्हें माहाल पांच व कोट च्यार व गड च्यार यैसें तुमचे असे सदरहु विलायेतीस आम्हांकडून उपसर्ग होऊ देणार नाही यासी दरसाल पैके आम्हास देणे तरी हालीं तुम्ही यवनासी देत आहा त्यास भग्न करून मग तेंच द्रव्य आम्ही घेऊन या वीतरीक्त तांब्रांचे कबजातील राज्य तुम्ही

बांधून घेणे त्यासी दरसाल तुम्ही कांये द्रव्य देणे करार कराल तेच आम्ही आपुले सामराज्य वैभवादि तें द्रव्य तुम्हापासून घेणारास भग्न करून तेच प्रा दरसाल द्रव्य आपण सालेसाल घेऊं तेही मुलूक तुम्हासच चालउन देऊं शत्रूचा उपसर्ग तुम्हास जालियाने त्याविषई आपली फौज पाठऊन उपराला करून स्नेहासि कधी अंतर पडणार नाही क्रियापूर्वक दिल्हीया वचनासी या लिहिलेमधें काहीं अंतराय पडेल तरी आम्हास आपले श्री ची आण असे अंतःकर्णपूर्वक.या प्रसंगासी श्रीचा बेल व कसेची माल व रोटी काढून पाठविलें आहे तें घेऊन तुम्ही याच प्रा स्नेह चालऊन दिवसेंदिवस अभिवृधी करणे (नि)बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा (मुद्रा व सीमा ले. ४७६ प्रो.)

पो धाता सं आषाढ सुा १५

ले. ४८०) पौ) श. १६१९ वैशाख शु. ६
)) इ. १६९७ एप्रिल १६

श्री.

वाराणशि (बालबोधीत)

राजश्री सदाशिव नाइक सोंधें गोसावी यांसि

-॥द अखंडितलक्ष्मी आलकृत राजमान्य—— प्रति राजश्री राजाराम छत्रपति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन कीजे विशेष राजश्री कृष्णाजी भास्कर यांसी श्री यात्रेस जावया आज्ञा होऊन रवाना केले आहेत हे तुमचे देशातून जातील तरी तुम्ही यांस मदत आपणाकडील लोक देऊन सुरक्षीत आपले सरहद पावेतों पावते करणे याविशई अंतर पडो न देणें हे कार्य आम्हांस अगत्य असे यैस जाणोन लिहिलेप्रमाणे मशारूनहलेस आपले सरहदपर्यंत सुरक्षीत पावते करणे जाणिजे बहुत लि॥ तरी (नि)सुज्ञ असा. (मुद्रा व सीमा ले ४७६ प्रो)

पौ ईस्वर वैशाख सुद्ध ६

ले. ४८१) पौ) श. १६२० पौष शु. १०
)) इ. १६९९ जानें. १

श्री.

बहुधान्य संवत्सर पुण्य शु. १० मी
(कानडी अक्षरें)

१.राजश्री सदाशिव नाईक सोंदे गोसांवी यांसि

द सकलगुणालकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य ——प्रती राजश्री राजाराम छत्रपति उपरि सांप्रत कटे फौजेनिसी स्वार होऊन आम्ही कर्नाटक प्रांतास जात

आहों या प्रांताचा कुल मख्तीयार राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांवरि देऊन ठेविले आहेत व तुमचें राजकारण यांकडे दिल्हें आहे तरी तुम्ही आपला हेजीब यांजपाशीं पाठऊन देणें हे तुम्हाकडील जो तह रह करून देतील तेणेंप्रमाणे आम्ही चालऊन व प्रयोजन प्रसंगेंकडून पंडित मशारनुले तुम्हास जमावाविसीं लिहितील ते समई तुम्हीं स्वारांचा व हशमाचा जमाव पाठऊन देत जाणे हर येक कार्यभागविसीं लिहीत जातील तें चालवायास अंतराये सर्वथा न करणें हे तहरह जो करितील तो आम्हींच केला येसें मानून यांसीं अनकूलतेने वर्तत जाणे जाणिजे बहुत लिहिणे तरी (नि)सुज्ञ असा (मुद्रा व सीमा ले. ४७९.प्रो)

ले. ४८२ } { श. १६२४ वैशाख व. १०
इ. १७०२ मे १०

श्री

श्रीमहादेव श्रीसुबया

राजश्री सवाई सदासीव नाईक सोंधे गोसावी यांसि

द श्रीमंत् सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य——स्नेहपूर्वक हिंदुराउ घोरपडे ममलकतमदार रामराम उपरि येथील क्षेम जाणून गोसावीयानीं आपले स्वानंद वैभव लिहून पाठविले पाहिजे सांप्रत रा रंगो त्रिमल यांसमागमे पत्रिका पाठविली होती त्यावरून व मारनिलेनी कितेक स्नेहाभिवृधीचा प्रसंग सांगितल्यावरून सर्व भावार्थ कलो आला माघें चंद्रदीस असतां समई माहाराज कैलासवासी राजश्री——स्वामीचे संनिधेसी रा कोनेरपंतांचे विद्यमाने मध्वाजी रखमांगद या बराबरी पत्र लेहून पाठविलें होते तेथे त्याने राजश्री शंकराजीपंत सुमंत व राजश्री निलो कृष्ण व आमचे गुजारतीने दर्शन घेऊन पत्र प्रविष्ट करून सर्व वर्तमान श्रुत केले (पहा ले. ४७९) व सांगितले कीं उभयपक्षीं स्नेह चालोन आला आहे पुढेही दिवसेंदिवस आधिकोतर सख्यत्व वाढवावा घांटांखालील आकोलें वगैरे माहाल पांच व कोट ४ व मौजे देखील गड ४ इनाम करून देऊन वांशपरंपरा चालवावयास अंतर न होये सारिखे क्रियापत्र लेहून द्यावे म्हणोन विनंती केली त्यांसि राजश्री कैलासवासी स्वामीयानीं मनास आणून मान्य करून इनाम करून दिल्हेचे महाल व कोट व मौजे देखील गडहाये बितपशील (ले. ४७९ प्रो.) येणेप्रमाणें माहाल ५ पांच व कोट ४ च्यारी व मौजे देखील गड ४ च्यार इनाम करून दिल्हे आहे वांशपरंपर अनभवणें या वेगली विलायेती सोंधा देहाये देखील हुडवा वगैरे मुलूक तालुका बंकापूर ऐसे तुमचे असे सदरहू विलायतींस आम्हांकडून उपसर्ग होउ देणार नाही या वितरीक्त तांब्राचा देश व घाटावरी व घांटाखाली जे काये देश संपादाल व त्या देशास्तव येवनासी जे द्रव्य प्रतिवर्षी द्यावयाचे करार कराल त्यास आपले सामराज्यादि

माहादजी यादव दिमत दरुनी माहाल वाडा दुसरा-माहादजी सालोखे कमावीसदार मौजे लोणी प्रांत सुपे-सलास आबैन-हाली मौजे मजकूर खाजगीकडे जाला आहे नारो शंकर सचीव इहीदे सलासैन

श्री मद्रा
मकृपाधाम प्रा
प्तकामस्य माह +
नारायण वि +
प्रता जगदधाम
विराजतां

ले. ५७२ } { शके १६५२ जेष्ठ शु. ३
इ. १७३० मे ९

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५६ साधारण संवत्सरे जेष्ठ शुद्ध त्रितीया भृगुवासरे क्षत्रीये कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी पा॥ इंदापूर यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री धुंडिराज गोसावी बीन मोरेश्वर गोसावी वास्तव्य क्षेत्र श्री मोरेश्वर याणी हुजूर स्वामी संनीध येऊन विनंती केली की आपले आजे रा॥ मोरेश्वर गोसावी थोर माहापुरुष होते त्यास पूर्वी माहाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामीनी पा॥ मजकुरी इनाम करून दिल्हा आहे बी॥

मौजे सेलगाव येथे जमीन	मौजे काझड	जकायेत पैकी
चावर येक	येथे जमीन	दररोज टाक-
१	चावर येक	साली रुके नव सण्या
	१	१८६

येणेप्रो दोन चावर जमीन व खुर्दा टाकसाली नव सण्या दिल्हे आहे त्याप्रमाणें चालत आले आहे आलाकडे धामधुमेच्या प्रसंगामुले भोगवटा चालत नाहीं. याकरिता स्वामीनी कृपाळू होऊन पूर्ववतप्रमाणे इनाम करार करून भोगवटियास नूतन पत्रे करून देऊन चालवावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणून विनंती केली व पूर्वी पत्रे आणून दाखविली त्यावरून मनास आणून गोसावी थोर सत्पात्र यांचें वंशपरंपरेने चालविलिया स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण ऐसे जाणून स्वामी यावरी कृपाळू होऊन सदरहूप्रमाणें टाकसाली नव सण्या व दोन चावर जमीन दुतर्फा कुलबाब कुलकानू देखील इनाम तिजाई हाली पटी व पेस्तर पटी सरदेशमुखी व साहोत्रा खेरीज हाकदार करून इनाम करार करून दिल्हा असे तरी तुम्ही जकातीपैकी नवसण्या दरोज व देहाये मजकूरपैकी दोन चावर जमीन पुत्रापौत्रादि

वंशपरंपरेने इनाम चालवणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन हे असल पत्र भोगवाटियास गोसावी यांजवल परतोन देणे जाणिजे (नि) लेखनालंकार

मर्यादेयराजते

रुजू सुरु	संमत	साा	साा	
निर्वीस	सुमंत	मंत्री	सरकार	
बार सुद	सुरु सुद——बार	बार	बार	बार

ले. ५७३ } { श. १६६४ इ. १७४२

श्री

अखाडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री त्रिबक निराजी गोसावी सेवक सदासिव चिमणाजी नमस्कार सुा सलास आर्बैन मया व अलफ पा रासीन येथील मामला राजश्री आपाजी सोमवसी (अपूर्ण)

(पाठीवर)

गज इलाही

॥ लबु तडना जवान ॥ तयाच्या च्यार वीती जाण ॥ येका गजाचे प्रमाण ॥ ते तीन येका पाडाचे ॥ १ ॥ याज परीस उणा तसु येक गज शरई ॥ ऐसा हिशोब आहे

———

ले. ५७४ } { श. १६७३ ज्येष्ठ व. ६ इ. १७५१ जून ४

श्री

राजेश्री सर्वोत्तम गोसावी यांसि

सरकत रोखा संभाजी व संताजी सणस+++हिरोजी गायेकवाड हाली वस्ती मौजे लोणी प्रा सुपे सुा इसने खर्मसन मया आलफ कारणे सरकतरोखा लिा दिल्हा यैसाजे मौजे मारी तुमचे इनामाचे सेत आहे त्यामध्ये आपण उभयेता वा आणीक सरकती घालून आसामी कबूल केली त्याची वाटणी

१ सन हजार ११६१ तिसरा वाटा दिवाणाचा
१ सन हजार ११६२ पासोन पचादेव दोन वाटे दिवाणचे तीन वाटे रयेत
१ याचे साली निमे दिवाण वाटा व निमे रयेत भाग

येणे प्रा कौल पुर तोपर्यत तुम्हास लिाप्रा वाटा देऊ सेतात मेहनत करू आवघे सेत तयार करून देऊ हे लिा सही छ २० माहे रजब बिा राघो योगिराज कुलकर्णी मौजे मार

निशान नागर

साक्ष

जानोजी न्हावी मौजे
माार सुभानजी सुतार
मौजे पणदरे

ले. ५७५ }

{ श. १६९८ श्रावण शु. ९
{ इ. १७७६ जुलै २५

श्री.

यादी सर्वोत्तम गोसावी इनामदार मौजे मोरगाव याचा व गावकरी याचा इनामाच्या तफावतीमुले कजिया होता सबब हुजूरून सुभ्याकडून कारकून पाठऊन चौकसी करविली त्याची मोजणी सुा सबा सबैन मया व आलफ छ ८ जमादिलाखर मोजणी बिघे सुमार

पाच पट्या थल रुके

आज	बारायणी तुल
१५॥- उतर	१५॥ पश्चम
१८॥ दक्षण	११॥ पूर्व
३४।	२७
निमे बिघे	निमे
१७८॥	१३॥

२३० तपशील अदमासे

बिघे सुमार
१८० अवल
४० दुम
१० खडक माल व सीम जमीन

२३० बिघे
दोनसे तीस बिघे
माहरीक रुके ८६

आज	तुल
१८॥ पूर्व	१०८२ उतर
२१८२ पश्चम	५।१ दक्षण
	६॥४ मध्ये
३९॥२	२२८२

जनादन गोसावी ८३॥

आज	तुल
१७॥।= दक्षण	२॥।= पूर्व
१६॥≫ उतर	३॥।४ पश्चम
३४॥	६॥८=
निमे बिघे	तिजाई
१७।-	२८≫॥

६४॥ तपशील अदमासे

बिघे सुमार
३५ आवल
२० दुम
९॥ सीम

६४॥ बिघे
साडे चौसष्ट बिघे
सर्वोत्तम गोसावी -।-

वाहती

आज बिघे	तुल बिघे
२२ पश्चम	१०।१
२३।१ पूर्व	६८२ दक्षण
	९।१ मध्य
४५।१	२५॥४

निमे	तिजाई
१९॥।१	७।२

बिघे सुमार
१४५।-
तपशील अजमास
५० दुम
९५। सीम

१४५।

येकून येकसे पचेतालीस बिघे आलोपंत इनामदार रुके ८३॥ यास तपशील किंवा डाग रुके ८२
दुम जमीन

आज	तुल
१४८२ पूर्व	२।- दक्षण
१४ पश्चम	२।४ उतर
	२॥१ मधम

७।

निमे	तिजाई
१४८१	२।३

बिघे सुमार
३३॥४।-
किा जनीन रुके ८१॥
आवल बिघे

आज	तुल
७।२ दक्षण	१।४ पूर्व

निमे	तिजाई
२२॥३	८॥१

बिघे सुमार
१९४॥।३
तपशील अजमास
१२० आवल
७४॥।३ दुम

१९४॥।८३

पड जमीन खडक माल व पठार

अज	तुल
८ पूर्व	६८२ उतर
७ पश्चम	३।४ दक्षण
—	—
१५	९॥१
निमे	निमे
७॥	४॥।-॥

बिघे सुमार
३५॥३
बेरीज तपसील
१२० आवल आजमास
७४।॥८३ तुम आजमासे
३५॥३ सीम कनिष्ठ पड जमीन;

१६।। उत्तर	१।३ पश्चम
	१।३ मध्ये
———	—
३४८१	४।-
निमे	तिजाई
१७	१।३

बिगे सुमार
२३।।।१
बिघे सुमार
५७।।
साडे सतावन बिघे

मोजणी बिा त्रिबक मुकुद कारकून निा हवालदार ता हवेली साडस व मवानजी गौली निा नाईकवाडी ता हवेली साडस प्रा पुणे व भगवानसिग निा देवीसिग लोक निा किले पुरधर गावलावी याचे व समाकूल पाढर व सर्वोतम गोसावी याचे व निलो गोपाल निा देव याचे गुा मोजणी केली आसे

कारी-जेधे.

ले.५७६ } { श. १५३८ चैत्र व. १
इ. १६१६ मार्च २४

नकल

आजम मरिखान ठाणे सिरवल ता हिरोजी धोंडा मोकदम पाटलि मौजे चिखल गाव ता रोहिडखोरे सुा सीत अक्षर अलफ तू आर्ज केलास जे मौजे मारची संचनी करण्यास हुकूम फरमाविला पाहिजे तेणेप्रो गावची संचणी करणे आणि पाटीलकी खाणे चतमाबा नजराणा होन आठसे तू दिल्हे असेत ते दिवाणात जमा केले असेत तेणेप्रो पाटीलकी मिरासी बा इनाम टके तीन वगैरे पासोडी व कुल मानपान खाऊन गाऊची चाकरी मुकरद आवलाद आफलाद खाणे आणि गावची वसाहत करून दिवाणात रुजू राहाणे ये बाबे कौल असे जाणिजे छ १५ रावल मोर्तब (फारसी.)

ले. ५७७ } { श. १५४४ ज्येष्ठ व. ३
इ.१६२२ मे २५

महजर हजीर मज्यालसी ता भोर ता रोहिडा बितेरिख १६ माहे रालवल.

कान्होजी देशमुख सिका असे नरसप्रभु देशकुलकर्णी
बापोजी जेधा हिरोजी मोकदम

बागोजी मोकदम मौजे
चिखलगाउ ता॥ भोर नांगर अर्धे
बाबाजी मोकदम मौजे
पोमरडी नांगर असे
सोनजी मोकदम मौजे
चिखलवडे नांगर असे
हरी सुतार मौजे
वडतुंबी वाकस असे
जईत नाक वार्तिक मौजे
आंबवडे विळा दोर असे

बाबनाक वार्तिक मौजे
आंबवडे विळादोर असे
चिटरटा मेहत्र्या ता॥ भोर मोगरी असे
गोदनाक वार्तिक
मौजे आंबवडे

ता॥ भोर नागर असे
इंद्रोजी मोकदम मौ-
जे कर्नवड नांगर असे
साव ठाकूर प्रां
भोर मजकूर कटार असे

नागोजी महाडिक कटरा असे

माजजी चौगुला मौजे
आंबवडे नांगर असे
येसजी मोकदम मौजे
आंबेघर नांगर असे

बाबा सुतार मौजे
आंबवडे वाकस असे

सुहुर सन इसने असरीन अलफ कारणे महजर लेहून दिल्हा यैसाजे लखजी भडाळा मोकदम मौजे आंबवडे इसाफती देशमुख यास इनामती मोकदम मारास नवत टके २ दोन व उक्ता टका १ येक यांस टके १० दाहा व खाचर हे रकमे वेगले चिचवले खालील हे देशमुखाच्या वडिलानी दिल्हे होते त्यावरी नवा कुसूर जाला मग हुजूर येऊन मालूम जाले तरी लखजी मोकदम माराचा भोगवटा मनास आणिता सालाबाद चालिले आहे तैच बार निा ज्या खाचराचा कुसूर होता व इनामती टके १० दाहा व खाचर चिंचवल्यापुडील लिहून दिल्हे असे हे तू लेकराचे लेकरी खाऊन सुखे असिजे तुज इनामती टके २ दोन व उक्ता टका १ येक यास टके १० दाहा व खाचर खाऊन देसमुखाची चाकरी करून मौजे मजकुरची मोकदमी खाऊन सुखी आसिजे

ले. ५७८ } { श. १५५७ कार्तिक शु. १
इ. १६३५ नोव्हे. १

श्री सके १५५७ युवानाम सवछरे कार्तिक शुद्ध द्वितीया वार आदीतवार तदिसी राजेश्री कान्होजी नाईक देसमुख ता॥ भोर ता॥ रोहिडा यासि तुकोजी बिन विठोजी व बाबाजी बिन येलबाजी मोकदम मौजे नायेगौऊ पा॥ सिरवल आत्मसुखे साहेबाचे सेवेसी लेहूनु दिल्हे यैसे जे आपला दाईज लखमोजी बिन रामजी माली मोकदम निमे मौजे मा॥ त्याणे दिवाणात चाहाडी करुनु आपले घर बुडविले व परागदा केले ए सबबे साहेबाचे पाठी निघालो तरी ए सबबे साहेबी पाठी राखिली पाहिजे आपली मोकदमी मौजे मा॥

निमेचा तर + + आहेती व (पुढील एक दोन ओळी फाटल्या आहेत) चावर २-३ व हकलाजिमा मिरास करुनु लेकराच्या लेकरी दिल्हे आसे यास दुसरा विचार नाही जरी आपले कोण्ही दाईज गोत्रज अथवा दिवाण देसमुख इस्कील करील ते आपण जाणे यास आनसारिखे करीन तरी श्री—व आपल्या पूर्वजाची आण आसे हे लिहीले सही आपले खुसीने दिल्हे आहे हे सही

गोही

रांज पाटील व येस पाटील
मोकदम मौजे महुरी ता॥

नाईकजी तुपा मोकदम
मौजे म्हकोसी ता॥ रोहिडा

गु(ज)ण मावळ

ता॥ भोर

ले. ५७९ }

(सिका) { श. १५५९ कार्तिक शु. ७
इ. १६६३ आक्टो. १५

नकल फर्मान पारसीची इदलशा हाचे फर्मानाची

इा छ ६ माहे जमादिलाखर सुा॥ समान व सलासीन अलफ तपे रोहिडे याचे कारकुनाचे नावे कीं सांप्रत हुजूर विदीत जाले कीं कानोजी जेधे देसाई ता॥ भोर किले मजकुर याणी मेहनत करावयाविसी कोताई न केली व दुष्टांदन केले या करिता बहुत कृपा करून मौजे चिखलगाव किले मजकूर कानोजी देसाई मजकुरास इनाम दिल्हा असे तरी मौजे मजकूर मयेकुलबाब व कुलकानू त्याचे स्वाधीन करणे तो मेल्यावरी त्याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालविणे फर्मानाची तालीक घेउन असल फर्मान त्याचे स्वाधीन करणे व फर्मानाप्रमाणे चालणे परवानगी हुजूर व आज्ञा अनवान बुलंदखान खान अलिशान सादतनिशान रफीउलकद्र बुलंदमकान एखलासखान वजीर हुकमत मोहर असे.

ले. ५८० }

{ श. १५७५ भाद्र. व. २
इ. १६४३ आगस्ट २१

श्री

येजितपत्र शके १५६५ सुभानु नाम सवछरे हाजीर मजालसी समस्त देशक ता॥ रोहीडखोरे.

कान्होजी नाईक जेधे
देशमुख ता॥ मार

नरसप्रभु देशकुलकर्णी
ता॥ मार

सिका

१

आंबाजी बलाल हेजीब

१

कृष्णाजी पदमनाभी

१

आलीभाई कारभारी

१

कृष्णाजी
१

हिरोजी पाा कोा भोर
१

बापोजी पाा मौजे पोमर्डि
१

येसजी पाा मौजे
आंबेघर १
भिकाजी पाा मौजे
नाटबी १
कान्होजी पाा मौजे
वडतुंबी १
रुद्रभट जोसी
१

लखनाक वरगणा
१

देशक ताा मार
कान्होजी चव्हाण व सोनजी भोरपी पाा
मौजे वेनवडी
१

राघोजी पाा मौजे
सिरवली
१

बालोजी व नाइकजी
पाा मौजे करंजे
१

जाख माहाला
१

भिवा सुतार
१

यासी बागोजी धोंडो पाटील मौजे चिखलगांव ताा रोहिडखोरे दिल्हे येजितपत्र जे मौजे मार ची रसद घेऊन दिवाणात गेलो आणि मालुमती समजावून रसद बारासे होन पूर्वी देऊन आपले नावे फरमान कुल मोकदमीचे आणिले यास पूर्वी बाई देशांत आमचा व हिरोजीचा वेगलचार वडिलापासून जाला त्याजवर हिरोजीने मुठमर्द करून या प्रांती येऊन चिखलगावची मोकदमी मेलविली त्याजवर बाई देशात आम्हावर कसाला पडला सबब भावाचे गावी आलो त्यास हिरोजीचेही उपयोगी बाकीचे पडलो आहे त्यास आम्हाकडून लबाडकी कागदाची आपले नावे करून घेतले म्हणोन आली त्यास मोकदमी व मानपान वैगरे हिरोजीचे त्यास आम्ही वेगळे झालो तरी हिरोजीचा भाऊ त्यानी मुठमर्द केलीच वतनही त्याचेच त्यास याचे वतनासी मला संबंध नाही जे तुमचे गोताचे विचारास येईल ते करावे इनाम पो जो हिसा मला हिरोजी देईल तो घेईन वरकड हिलाहरकत करणार नाही मोर्तब असे.

ले. ५८१ } {श. १५६५ भाद्र. व. २
{इ. १६४३ आगस्ट २१

करिणा हिरोजी धोंडो पाटील मौजे चिखलगाव ताा रोहिडखोरे सुरु सन आर्बा आबनं आलफ बागोजी धोडे याचा व आमचा खटला म्हावयास कारण जे दिवाणची

रसद वाराव्यास पाठविला तिकडे दिवाणांत माळुमती समजावून आपले नावे फरमान करून आला आम्हासी कज्या करू लागला जे मी वडील माझी मोकदमी व मानपान इनाम पासोडी माझी याप्रो बागोजीचे म्हणणे त्यास बागोजीचा व आमचा वेगलचार पूर्वीपासून चाई देशांत कुसगावी असता जाहाला त्याणी मुठमर्द करून मेळविले तरी आम्हास समंध नाही व आम्ही मुठमर्द केली असता बागोजी मौजे मारी येऊन राहीला कारण त्या प्राती दिवाणचा कसाला वोढेना सबब आम्हाकडे आला थोरला भाऊ यास परागंदा होऊ देऊं नये त्याजवरून आपले जवल ठेविला म्हणोन वतनास आधिकारी होऊन आपले नावे वतन करून घ्यावे हाही धर्मन्याये नव्हे परंतु कलिमहात्म पूर्वीपासून खस्त मेहनत माझी हिरोजीची हे तुम्हास देशमुख देशपांडे यास माहितच आहे आता तुमचे समस्ताचे म्हणणे तुझा भाऊ बागोजी वडील तिकडील वतनवर होता त्या वतनास तो मुकला आता त्याणे मुलखावर जावे की काय तुझे गावची बाकी तरी तुम्ही त्याने दिल्ही याचे कसे त्यास बागोजीने येजितखत द्यावे कुल मोकदमीस व मानपानास समंध नाही असे येजितखत दिली यास बागोजीस जो हिसा इनामपो मात्र होईल तो देईन वरकडा गावातील वगैरे दाइते मागणार नाही या प्रो तुम्हा जमीदाराचे देशकाचे गोहीने येजित खत द्यावे त्यास राजी आहे म्हणजे कांही हिसा देईन हा करिणा लेहून दिल्हा सही छ १५ जाखर.

ले. ५८२ } {श. १५७७ चैत्र शु. १०
{इ. १६५५ एप्रिल ५

द सौजनी परउपकार राजमानी राजश्री परसोजी पाटील मोकदम मौजे विग पा पुणे यास सर्जाराऊ फर्जद कान्होजी राजे जेधे माहालीदार जोहार उपेरी मौजे मजकुरी आमची वरात होन ८८ आहे त्यापैकी होन ५८ हवाला केला बाकी होन ३८ राहिले आहेती याबा मिया माहालदार पाठविला आहे तरी झाडा करुनिया यापासी मा बाबासाहेब सुपा आहेती खर्च एक घडचे दिरंग न कीजे मो
सुा खमस खमसैन आल्फ
तेरीख ७ माहे जमादिलाखर

ले. ५८३ } {श १५८० मार्ग. व. १३
{इ. १६५८ डिसें १२

श्रीसके १५८० विलंबी नाव सवसरे मार्गस्वर वदी त्रयोदसी ते दिवसी धनको नाम बाजी सर्जाराऊ देसमूख ता रोहिडा याणि रिनको नाम मलजी करवर मुा दिघीची अठफाडकर करयाती मानदेस अत्मसुखे परवतसमथ्ये अरवत केला मुदल होनू १०८ दाहा दर माहे दर होनास कलातर रुके ॥- चोवीसप्रमाणे जालिया दिवसा उगवणी करुनु इा भाद्रपद त्रयोदसीस उगवणी करुनु मुदतीस उगवणी न करू तरी हडागे देउनु हा कतब सही

गोही

त्रिमलराऊ सिलेदार
खडोजी राजे गुजर
मुधोजी जाधव

गवरोजी राजे मदने
कोडाजी ताबट मुकाम पुणे

ले. ५८४ } { श. १५८२ मार्ग. व. ७.
इ. १६६० डिसें. १४

द मसुरल हजरती राजमान्य राजश्री सोमाजी विस्णु हवालदार व कारकून ता। रोहिडखोरे यासी राघो बलाल नामजाद माहालानीहाय नमस्कार विनति सुा इहिदे सितैन अलफ कान्होजी जेधे देसमुख तपे मजकूर याचे बाबे आम्ही बखैर राजश्री साहेबाचे सेवेसी लिहिले होते त्याचा जाब राजश्री साहेबी लिहिला आहे तुम्ही लिहिले की कान्होजी जेधे निमे देसमुख रोहिडे याचे दस्त मनास आणिता देखील इनामती व किरकोल हक व गावखडी मिलोनु मोजना टके पाच हजार आहे यैसियास यापासून इनामती खडणी पेशजी गडकरी दरसाल होनु ३० घेत होते हाली साहेबांचे कारकिर्दीस होनु तीस घेतले आहेती यैसीयास निमे घेतले तरी अडीच हजार टके होत आहेती तरी याची काय रजा म्हणौनु लिहिले तरी जैसे काही सालाबाद चालले असेल तेणेचप्रमाणे चालवणे नवे न करणे ते साहेबाचेच चाकरलोक आहेती त्यावरी नवे न करणे छ २ रबिलाखर यैसा जाब राजश्री —— साहेबी लिहिला आहे तरी जैसे सालाबाद ता। सालगुदस्ता चालत आले असेल त्याचप्रमाणे (अ) श्री त्यापासून घेत जाणे वरकड सालाबादप्रमाणे त्याचा दुमाला करणे तालीक राघो बलाळ लेहोन घेऊन असल देममुखापासी फिराउनु देणे छ२० रविलाखर (ब) मोर्तब सुद

ले. ५८५ } { श. १५८७ वैशाख शु. ६
इ. १६६५ एप्रिल ११

(फा. अ. शि.)

आज दिवाण ठाणे ता। रोहीडखोरे दा। बो भिकनाक बिन येसनाक विर्तकारी मौजे नाटिबी ता। भोर ता। मजकूर सुा खमस सितैन अलफ कारणे साहेबाचे बंदगीस कतबा लेहून दिधला यैसाजे साहेबी बोलाऊन आणून ना। मा। पुसिले की खोपडे व नाटिबे आपण आपणामधें भांडिले हा समाचार मिनवान सगणे तरी हिरोजी नाटिबा याचे घरी सिकिलगर राहिला होता त्यापासी आपले लोखंड व रामजी खोपडा याचे लोखंड यैसे सिकिलकरास दिधले होतेसी आणावया आपण गेलो रामजी खोपडा मोकदम यैसे हर दोजण गेलो त्यावरी हिरोजी नाटिबा आपणास बोलिला जे तुम्हा आम्हास करांजे चल्या काये कराव्या पण बोलिलो की कां मी बाजीन म्हाव्या यावरी हिरोजी बोलिला

रामजी म्हणतो जे नाटिबे कोठे झगडले आहेती त्यावरी आपण बोलिलो जे यैसे कधी रामजी बोलिला यावरी हिरोजी बोलिला जे बोलिल्यास महिने ६ जाले आपण बोलिलो जे सा महिने बोलिल्या जाले तरी आजी काये होते त्यावरी कोडजी नाटिबा हिरोजीचा पुतन्या बोलिला की रामजी तुज खवखवं मोठी आहे तरी तूं मज कोडजीसी भांड यावरी रामजी बोलिला जे तू साहेबांचा सेरकर मी साहेबांचा पाटील तुज मज भाडण करावयास निसबती नाही त्यावरी कोडजी बोलिला जे तूं पाटील काये चोटाचा यैसी बेस्ताकी बोलिला यावरी रामजी कराचली घेऊन ओढिली यावरी आपण रामजीस हाती धरून वाड्याबाहेर नेला आणि मागे सवेच करांचली घेऊन ओढून कोडजी आडवा आला त्यावरी कोडजीस लिल्हाई दिधली पर लिल्हाईस न मनून कोडाजीवरी घाये टाकिला मग हर दोजण कराचलीने भाडो लागले यास कमपेश होये तरी साहेबांचा गुन्हेगार हा कतबा सही मग याचे बापभाऊ व याचे बापभाऊ मिलाले आणि तोंडातोंडी केली हा कतबा सही मोर्तबू

गोही

बाबजी चिकणे मोकदम
मौजे कारले
तेरीख ५ माहे सौवाल
सवाल

ले. ५८६ } { श. १५९०
{ इ. १६६८

श्री (तालीक)

अज रा० रा० सिवाजी राजे साहेब दाम० ब ताा बजोनबू कार० व देश० ताा रोहिडखोरे बिदानद के सुरसन तिसा सितैन अलफ येसाजी बिन इद्रोजी जेधा हुजूर येऊन अर्ज केला जे ताा मारचे देशमुखास इनाम च्यार गाव व हकलाजिमा सारा दुबाला होता ते वख्ती मौजे आबवडे ताा मार इनाम देसमुखीपैकी आपणास सेत टके ३ तीनचे इनाम चालवीत होते हाली देसमुखास येक गाव व हाकलवाजिमा दुमाले करून बाकी अमानत जाले आहे याबदल आपला इनाम सदरहू सेत चालत नाही तरी मेहरवान होऊन आपला इनाम सेत सदरहू दुबाले केले पाहिजे म्हणून बिनाबरा खातिरेस आणून येसजी माचे सेत दर सवाद मौजे आबवडे माा टके ३ तीन टकीयाचे पेशजी देशमुखाचे तर्फेने चालत होते तेणेप्रमाणे हाली दुबाला केले असे देखील माहासूल कुल० दुबाले करणे दर० सनदेवरून० तालीक० सदरहू सेत इनाम हा सन सबैन अलफ पासून चालवणे

ले. ५८७ } { श. १६१३.कार्तिक शु. ५
इ.१६९१ ऑक्टो. १६

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १८ प्रजापतिनाम सवत्सरे कार्तिक सुध पचेमी भृगुवासर क्षत्रीये कुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणि राजेश्री मुद्राधरी व लेखक किले रोहिडागड

(ले.ब.) श्रीा राजाराम नरपति हर्ष निदान मोरेश्वर सुत नीळक ठमुख्य प्रधान

(अ) श्री लक्ष्मि नृहरिप्रीते मुद्रा निराजि जन्मना राजा राम प्रतिनिधी प्रल्हादस्य विराजते

यासि आज्ञा केली यैसी जे किले मजकुरी पूर्वी जामदार होता तो दूर करून हाली विठोजी बिन चागोजी पवार जमासुदगी करून पाठविला आसे यास किलियावरी घेऊन याचे हाते जामदारीचे काम घेणे यास वेतन मोईनप्रमाणे हा सनद पोपासून परबार सेरीस्ता दडकप्रा वजा करून उरले वेतन देत जाणे यास जमान किले मजकुरी घेणे (नि)जाणिजे निदेश समक्ष

रुजू

तेरीख ४ माहे सफर सुा इसन बार सुद

सुरू सुद बार

(ब)मर्या देयं विरा जते

———

ले. ५८८ } { श. १६२२ चैत्र शु. १५
इ. १७०० मार्च २३

श्री नकल

राजश्री सरदार लस्कर पागा व सिलेदार व किलेहाये व हुजराती व मुलकी लोक गोसावी यासी

द अखंडीतलक्ष्मीअलकृत राजमान्य श्रो——रामचंद्र निलकंठ आमात्य सुा मया आलफ मौजे आंबोडे हा गाऊ जेधे देशमुख याचे इनामतीचा आहे व बाजार मौजे मा भरतो त्यास आमदरत्फीमुळे जो येतो तो उपसर्ग देतो त्यामुले रयेत परागंदा होते म्हणोन कळो आले त्यावरून हे पत्र सादर केले असे तरी जो कोण्ही आमदरत्फीमुळे बाजारास व गावास उपसर्ग देईल त्यासी (येथें सिका) भीड होणार नाही हे पष्ट समजणे जरी बलेच जाऊन धामधूम करील तर मताजी जेधे तुमची भीड धरणार नाहीत मग कष्टी व्हाल हे पष्ट समजणे छ १२ सवाल वरकड गाव देशमुखांचे आहे त्यास उपसर्ग न देणे

(नि) निदेश समक्ष ——— मोर्तब

ले. ५८९ } { श. १६२३ श्रावण शु. १२
इ. १७०१ आगस्ट ४

श्री

राजश्री शाहाजी मोहिते हवालदार व कारकून श्री माची पदमावती गोसावी यांस

॥द अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य----श्री शंकराजी नारायण सचीव आसिर्वाद व नमस्कार सुा इसने मया अलफ राा त्रिंबक मलहार कारखानीस किले चंदन-गड याची मनुशे माची मारास आली आहेत तरी त्यास गडावरी घेऊन घरठाण करून देणे हरयेक विशइ परामृश करीत जाणे छ १० रबिलौवल

(ब) श्री
नारायण सुत
शंकर

(लं.ब.) लेखनावधि
रयं भाति

सुरु सुद

ले. ५९० } { श. १६२७ चैत्र व. ८
इ. १७०५ एप्रिल ६

श्री

राजश्री मताजी सर्जाराऊ जेधे देसमूख ता। रोहिडखोरे गोसावी यासि

द अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्य—श्रेहाकित विसाजी खंडागले हवालदार व कारकून किले मगलगड जोहार आा आसिर्वाद सुा खमस मया व अलफ विनती (ये) थील कुशल जाणून स्व (कीये) कुषल लेखन केले पाहिजे यानंतर गोसावी यानी पत्र पाठविले पावोन बहुत समाधान जाले लिहिले कीं आपल्याकडील लोक किले मास येऊन चाकर राहिले आहेत (ते) पाठऊन देणे म्हणऊन (लि) हिले तरी ते लोक माहाराज राजश्री--छत्रपती स्वामींचे सनदेने किल्यावरी चाकर राहिले या उपरी किल्याची आसामी धण्या (खे) रीज दूर होऊन निरोप दे (ता) येत नाही पाहिलेच + + + रास गुतो नये गुतलेयाउपरी आसामी तुटत नाही कलले पाहिजे यानंतर गोसावी याकडे किले मारचे दास्तन पैकी गोसावी यास कर्ज गला ४४ मण दिला त्याची दिडी -।१ साहा मण + के त्यापैकी रुपये + + + + विले त्याच गला दर रुा ४॥१ सात पाइली प्राणे -।-। सवा पाच मण जाला बाकी ४॥। पाइली उरला तो पाठविला पाहिजे बहुत काये लिहिणे कृपा असो दीजे छ २२ जिल्हेज हे विनती (ष) मोर्तब

सुद

ले. ५९१ } {श. १६३३ वैशाख व. ८
इ. १७११ एप्रिल २९

(ब) श्री
शंकराजी
नारायण

अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री नारोपंडित सचिव ताा खेलोजी कुंभार मौजे आंबवडे ताा भोर तो रोहिडखोरे सुा सन इहिदे अशर मया अलफ दिल्हे अभय पत्र यैसे जे तुझा व उत्रोलीच्या कुंभाराचा तह पूर्वापासून विचित्रगडी जे उत्पन्न होईल ते दोघानी दो ठाई वाटून घ्यावे यैसे चालत असता हाली उत्रोलीचा कुंभार कथला करितो याची मनसूफी करावी म्हणून तुवा हुजूर येऊन विदित केले त्यावरून उत्रोलीच्या कुंभारास आज्ञा केली की तू हुजूर येणे गोतमुखे निर्वाह होईल त्याप्रमाणे चालविले जाईल यैसी आज्ञा केली असता उत्रोलीकर कुंभार हुजूर आला नाही पळोन गेला तू हुजूर आलास हुजूरून तुजला अभयपत्र सादर केले असे तरी तू कोणे बाबे शक अंदेशा न धरिता सुखरूप राहोन वतनाची चाकरी करणे तुजला कोणे विशई आजार लागणार नाही अभय असे छ २१ रबिलावल पाा हुजूर.

सुद सुद.

ले. ५९२ } {श. १६३९ मार्ग शु. १०
इ. १७१७ डिसें २

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री भिमाजी नरसिह दि॥ सरदेशमुख गोसावी.

सेवक पंताजी सिवदेव नमस्कार सुा समान अशर मया अलफ देशमुखीच्या इनाम गावी सरदेशमुखी घ्यावयाचा सालाबाद तह नाही त्यास सांप्रत तुम्ही देशमुखाचे गावी सरदेशमुखीचे मावल प्रांते रोखे केले आहेत म्हणून विदित जाले तर सालाबाद हे गोष्ट होऊन न आली त्यास हाली तुम्ही कज्या करावा यैसे नाही व देशमुखाकडची पटी हुजूर घेतली असता त्यासी सरदेशमुखी घ्यावी यैसे सालाबाद नाही यैसे असता मताजी नाईक जेधे याच्या भावाबंदाच्या कथल्यामुळे त्याकडे सेरणी घेतली त्यास तुम्ही सेरणीची सरदेशमुखीचे रोखे केले म्हणौन कलो आले तर हे गोष्ट बरी नव्हे सालाबाद इनाम गावास व सेरणेस देशमुखाचे सरदेशमुखी घेत नाही तुम्ही कथला येकदर न करणे छ ९ मोहरम

(वा) श्री ० भार्गवचरणी तत्पर पंताजी शिवदेव निरंतर

(वा) मोर्तब
सुद

सुद सुद

ले. ५९३ } {श. १६४० श्रावण व. २
{इ. १७१८ आगष्ट २

द मा अनाम देसमुख व देशपाडे ता॥ रोहिडखोरे यासि जोत्याजी केसरकर आ॥ सरदेसमुख सु॥ तिसा अशर मया अलफ ता॥ मजकुरी सरदेसमुखींचे कमाविसी स रा॥ भिमाजी नरसी होते ते दूर करून हली राजश्री गोविंद हरी यासि कमावीस सागितली आहे तुम्ही यांसि रुजु होऊन सरदेसमुखींचा आकार परमाणे उसूल देणे दिवाण बेरीज येक हजार व खड कमावीस दरसदे पचोत्रा देणे व भेटीबकर कानूबाब देणे छ १५ रमजान मोर्तब सुद

(चौ)स्वस्ति श्री सुखदा मुद्रा प्रतापोत्कर्ष वर्धिनी ॥ सरदेश सुखस्यैषा शाहू राजस्य राजते

(चौ) लेख

बार नावधि

ले. ५९४ } {श. १६४० श्रावण व. १०
{इ. १७१८ आगस्ट १०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४५. विलबीनाम संवत्सरे श्रावण बहुल दशमी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणि देशमुख व देश-पांडिये व मोकदमानी शेटे महाजनान ता॥ रोहिड खोरे प्रा॥ भावले यासि आज्ञा केली ऐसीजे सरदेशमुखींचे (व) तन स्वामींचे पूर्वीपासून चालत आले आहे हाली अजपेथगाहा फजल व कर्म खिलाफत व ज्यांहादारी पातशाह अलम अलमियां याणी मरहामत केले त्याच्या सनदा नबाब अमिरुलउमराव यांच्या आहेत ऐसियासी तो॥ मजकूरची सरदेशमुखींचे कमाविसीस राजश्री जोत्याजी केशरकर अजहत सरदेशमुख यांणी आपले तफने गोविंद हरी यास कमावीस सांगोन पाठविले आहेत तरी तुम्ही यांचे विद्यमाने ता॥ मारचीं जमाबंदी व पटी व तह रहकरणे तो करीत जाणे दुतर्फा येकंदर जमाबंदी मुले आकार होईल त्यास व कमाविसबाबे सबजकातीस हक रयेत निा॥ दर सदे दावोत्रा प्रमाणे वसूल देत जाणे तुमार व महजर व रोजनामेवरी सरदेशमुखींचे निशाण आर्धा घेत जाणे (नि) लेखनालंकार.

(शिका बाळाजी विश्वनाथाचा)

• श्री
श्री आई आदि पुरुष
श्री राजा शाहू छत्रपती
स्वामी कृपानिधि
तस्य श्रीनिवास
परशुराम प्रातिनिधि

(ष.) मर्या
देयं विरा-
जते

रुजु सुरुनिविस सां॥ मंत्री

बार सुद सुरु सुद बार बार

ले. ५९५ } { श. १६४० कार्तिक शु. ५
{ इ. १७१८ आक्टो. १७

द मा॥ अनाम देशमुख व देशपांडे॰ ता॥ रोहिडखोरे यासि पंताजी सिवदेऊ सुा॥ तिसा अशर मया व अलफ सरदेशमुखी राजश्री—स्वामीचे वतन आहे साल मजकुरी दुतर्फा आकारप्रा॥ वसूल घ्यावा येसा तह जाहला आहे तरी मोगलाई तर्फेचे मख्ता करून दिला आहे त्यास दर सदे पंचोत्राप्रमाणे॰ वसूल देणे वरकड साल गुदस्तप्रमाणे माहालचा बसूल देणे जोत्याजी केशरकर याचे तर्फेने रा॥ केसो रघुनाथ कमाविसदार पाठविले आहेत त्याकडे सदरहू तहप्रा॥ वसूल देणे छ ३ जिल्हेज. (वा.) मोर्तब

सूद

सुरु सूद

ले. ५९६ } {श. १६४० कार्तिक शु. १२.
{ इ. १७१८ आक्टो. २४

राजश्री देशमुख व देशकुलकर्णी तो॥ रोहीडखोरे गोसावी यासि

लेा॥ शामजी हरी नामजाद सुभा प्रांत मावले आसिर्वाद व नमस्कार सुा॥ तिसा अशर मया॥ अलफ बा॥ सनद राजश्री पंताजीपंत तेथे आज्ञा की सरदेसमुखी राजश्री स्वामीचे वतन आहे त्यास॰ दुतर्फा आकारास पंचोत्रा घ्यावयाचा तह आहे त्यास मोगलाईची खंडणी जाली आहे त्यास॰ सरदेसमुखी देणे सालाबादप्रा॥ देवणे खुद सेते गडकरी याची असतील त्याची सरदेसमुखी हक मुा॥ खर्च लिहीणे बाकी सरदेसमुखी दिा॥ जकाती वसूल देणे म्हणून आज्ञा त्याप्रा॥ तुम्हास॰ सनद सादर केली आहे तरी दुतर्फा सरदेसमुखी वसूल घेणे गडकरी याची खुद सेते इनाम॰ गाव वजा करून बाकी सरदेसमुखी दुतर्फा पंचोत्राप्रा॥ देवणे जाणिजे छ १० जिल्हेज.

ले. ५२७ } {श. १६४१ ज्येष्ठ शु. ४
{ इ. १७१९ मे १२.

(मु. व सी ले. ५९२ प्रेा॥)

द मा॥ अनाम देशमुख व देशकुलकर्णी ता॥ रोहिडखोरे यासि पंताजी सिवदेउ सुा॥ सन तिसा असर मया॥ अलफ राजश्री स्वामीकडे इरसाल पिकले आबे ता॥ मजकुरीहून सुमार १००० हजार अणविले असेल तरी उत्तम अबे इरसाल गावगना आहेत ते उतरोन अळ्या घालोन हुजूर हजार आबे पाठवून देणे व ताग अगर वाख पक्का ८॥ आदमण या कामास जानोजी चिवा दिा॥ स्वारी पा॥ आहे यास रुाये -॥- निम देविला असे देणे छ ३ रजब

सुरु सुद बार

ले. ५९८ } {श. १६४१ आश्विन शु २
{इ. १७१९ सप्टे ४

राजश्री मताजी सर्जाराऊ जेधे देसमुख ताा भोर गोसावी यास

श्री शामर्जा हरी नामजाद सुभा प्रांत मावले असिर्वाद सुा असरैन मया अलफ तुम्ही पत्र पाठविले ते पावले लिा वर्तमान कलो आले लिहिले की नागोजी जेधे राजश्री पंताजीपंताकडे सातारियास गेले आहेत आपणास मसाला करून बोलाविले आहे त्यास जाणे लागते तरी राजश्री पंताजीपंतास पत्र देणे म्हणवून लिहिले त्यावरून पत्र पाठविले असे आम्हास आठ च्यार दिवसांत बरे वाटले म्हणजे आम्हीही सातारियास येतो तुम्ही काही चिंता न करणे जाणिजे छ २९ सवाल. (वा) मोर्तब

सुद.

———

ले. ५९९ } {श. १६४१ पौष शु. ५
{इ. १७१९ डिसें ३

राजश्री मताजी सर्जाराउ जेधे देसमुख ताो भोर गोसावी यांसि

श्री शामजी हरी नामजाद सुभा प्रा मावले असिर्वाद सुा अशरैन मया अलफ विसोबा नाईक व बाजे उदम याचा मक्ता तुम्हास देविला मोईन टके १२ बारा करून दिल्हा आहे त्याप्रा तुम्ही घेणे जाजती तगादा येकदर न लावणे छ ३ रबिलाबल

(वा)मोर्तब

सुद

———

ले ६०० } {श १६४३ आषाढ शु. ७
{इ. १७२१ जून २

॥ द मा अनाम मताजी सर्ज्याराव जेधे देशमुख ताा भोर ता रोहिडखोरे यांसि नारो शंकर सचिव सुहुर सन इसने अर्बैन मया अलफ खणपटीची पटी गावगना जाजती घातली आहे यामुळे वसुलास खलेल जाले आहे तरी पटीचा याद श्रीपाने केली आहे ते पटा शामराउ व धुलोजी याजबराबरी पाठवून देणे छ ३ रमजान या कामास बाजाजी कालभर जुा खंडोजी अबीले पाठविला आहे त्यास ताा ८० चवल देणे पा हुजूर

लेखना

सुरु सुद बार वधि मुदा बार

———

ले.६०१ } { श. १६४४ माघ शु. २
इ. १७२३ जाने. २७

श्री

तालीक

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये राजेश्री शामजी बलाळ नामजाद प्रा जावळी गोसावी यासि.

लेा श्रीनिवास परशराम प्रतिनिधि आसिर्वाद सुा सलास अशरीन मया अलफ मताजी सर्जाराव जेधे याची पेसजी मनसुफी होऊन कागदपत्र जाले आहेत यैसे असता हली तुम्ही येविसीचा मनसुबीचा उद्घाट करून याच्या इनामास ६॥ (स) पटी घातली आहे म्हणोन हुजूर विदित जाले तरी येक वेळ कागदपत्र जाले मनसुबी होऊन चुकली असता तुम्हास येविसी उद्घाट करावयास प्रयोजन काय या उपरी तुम्ही यात मन न घालणे पेसजी पत्रे जाली आहेत त्याप्रमाणे इनाम देखील चालविणे येविसी फिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे छ १ जमादिलावल.

ले. ६०२ } { श.
इ.

श्री

श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब याणी राजश्री नागोजी नाईक जेधे यासी आज्ञा केली यैसी जे तुमचे प्रयोजन आहे तरी साहेबाचे दर्शनास जमावसुधा हुजूर येणे येविसी कितेक राजश्री भिवजी कासुरडे ख सखेल यास आज्ञा केली आहे याणी आपले पत्रे तुम्हास लिहिली आहेत त्यावरून कळेल जाणिजे रा छ २८ जिल्हेज (नि) बहुत काय लिहिणे.

लेखना
वधि

ले.६०३ } { श. १६४४
इ. १७२२-२३

श्री

द मा अनाम मताजी नाा जेधे देशमुख ताा भोर ताा रोहिडखोरे यांस नासे शंकर सचिव सुा सन सलास अशरैन मया अलफ राजश्री———स्वामींचे घरी लग्न आहे या कारिता मडप घालावा लागतो तरी ताा भोरपैकी वेठे १० दाहा असामी आले आहेत तरी सदरहू दहा वेठीयाबराबरी मेठे लांब हात ७ व खरा लांब हात ११ व वासे सिताबीने रवाना करणे येक घडीचा दिरंग न लावणे या कामास रघोजी पवार व माहादजी येल-

(ब) श्री श्री म छं क रसुत नारायण

गुदा पाठविले आहेत यास रुपये -॥।- पाऊण रुपये आदा करणे आणि सामान सिताबीने रवाना करणे

(वा) लेखना
वधि मुद्रा

सुरु सुद

ले.६०४ } (मु. व. सी. ले. ५९२ प्रो) {श. १६४५ आश्विन शु. १४
इ. १७२३ आक्टो. २

श्री

ाद मा अनाम मताजी जेधे देशमुख ता भोर यांस पंताजी सिवदेव सुा आर्बा असरीन मया अलफ तुम्ही लिहिले वळो आले लग्नपटीचे बाबे लिहिले तरी मराष्ट तर्फेची लग्नपटी सिस्तप्रा पटी करून देणे मोगलाईची पटी आरबा दरसदे शा १० दाहा जाली आहे त्याप्रो घेतील नागोजी जेध्यांचा व तुमचा वतनाचा वथला लागला आहे त्याचा इनसाफ करावा लागतो तरी तुम्ही लौकर येणे छ १३ मोहरम.

सुरु सुद

ले.६०५ } {श. १६६७ चैत्र शु. १२
इ. १७४५ मार्च २३

श्रीनागेश

जबानी मताजी नाईक देशमुख ता भोर तपे रोहिडखोरे मौजे आंबवडे ता मार येथे कारकीर्द राजश्री कान्होजी नाईक थोरले देशमुख याणी मौजे मारची खोती कासारास सांगितली होती तो करीत असता दिवाण निजीमशाहचा टका कासाराचे वेलेचा गावात बाकी टके १००० येक हजार बाकी राहिली ते वसूल नव्हे म्हणून खोती कासाराची दूर करून निमळास सांगितली त्यावर राजश्री कान्होजी नाईक थोरले मयत जाले त्या-उपरी त्याचे पुत्र रा नाइकजी नाइक देशमुखी करू लागले त्याचे वेलेसही टका फिटेनासा जाला म्हणून राजश्री नाइकजी नाइकानी मुलुखचा ठाणगा यास गावीचा कारभार लावणी उगवणीचा सागोन टेविला त्याणेही खोतकीची चाकरी केली त्यासही टका फिटेनासा जाला मग संभाजी भडाला याचा वडील रा नाईकजी नाइकाकडे चाकरमान्याची नाइकी होती त्याणे रो नाइकजी नाइकास आर्ज केला जे साहेबी मेहरवान होऊन मजला खोती दिल्ही म्हणजे मी टका देऊन खोती करीन म्हणून त्याजवर रा नाइकजी नाइक देशमुख मेहेरवान होऊन खोती करण्यास सांगितली त्याणे हजार टके कबूल करून हजार टकिया-तून टके १५० दीडसे दिल्हे बाकी साडे आठसे राहिले म्हणून ठाणगा पाठविला त्यास आज उद्या देतो ऐसे म्हणता साहा महिने जाले दिवाणचे मागणे निकडीचे लागले म्हणून राजश्री नाइकजी नाइकानी आपला बंदा रा घोजी जेधा संभाजी भडाला याचे वडिलाकडे

पाठविला त्याणे जावून पैका मागू लागला तीन दिवस आठ केला तिसरे दिवसी हाती धरला की तू देशमुखाकडे चल म्हणून राघोजी जेधे व संभाजीचे वडीलामध्ये कटकटी जाली त्यावर संभाजी भडाला याच्या वडिलाचे हाती कुदळी होती तीं राघोजी जेधा याच्या डोईवर मारून जिवेच मारिला ही खबर राा नाइकजी नाइक देशमुख यास कलली मग त्यास आणावयासी माणसे पाठविली तो भडाला रातोरात पलोन गेला थाक लाविता कोठेही थाक त्याचा लागेनासा जाला त्यावर खोतीं काळोखियास सांगितली ही खबर लखजी भडाला कुरळोर्साहून तिटेघर ताा मारी येऊन राहिला होता त्यास कललेयावर लखजी कारीस आला राजश्री नाइवजी नाइकास बोलिला जे मौजे मारचा मोकदमी दिवाणचा टका भरून देतो मजला मौजे मारची मोकदमी नेहमी करून दिल्ही पाहिजे त्यावर लखजीने टका भरला म्हणोन मेहेरवान होऊन त्यास मोकदमी करून दिल्ही महजर जाला नाही टका भरून घेऊन दिवाणचा वारला महजर देतो म्हणता राा नाइकजी नाइक मृत्य पावले त्यावर त्याचे पुत्र कान्होजी नाईक देशमुखी करू लागले त्यास . खजी भडालि-याणे आर्ज केला की साहेबी मजपासून टका भरून घेऊन दिवाणचा वारिले परंतु महजर करून दिल्हा नाही तरी मेहरवान होऊन महजर करून दिल्हा पाहिजे त्याजवरून राजश्री कान्होजी नाइकानी महजर करून दिल्हा त्याजवर लखजी भडाला पाटिलकी करू लागला तो पाटिलकी करिता काल पडला कालामुले परागंदा होऊन मुलखावर मलजी व लखजीची गेली त्यावर अवरंगशा पातशाची चाली या प्रांती जाली मुलूख वाताहात होऊन गेली मोगलाई जाली त्यावरी सिरवलास ठाणे आले मुलुखास कौल करार देउ लागले तो मौजे आंबवाडियास पाटील नाही पाटलाची वाजपुस करू लागले त्यास रो सरज्याराव याणी महाराज राजश्री संभाजी राजे यापासी कोठावला रामजी भडाला होता यास चवथी तक्षिम देऊ वेली गावात टेऊन लावणी उगवणी करणे मोगलाचा टका वसूल वालीस लाविला रेखोजीवर कसाला बहुत पडला खोडेबेड्या घालोन टका भरून घेतला यैसे आहे

ले.६०६} {श. १६६७ चैत्र शु. १
इ. १७४५ मार्च २३

श्रीनागनाथ

चिरपत्र हजीर मज्यालसी संनिधश्री याचे देवालई मौजे अंबवडे ता भोर ता रोहिडखोरे शके १६६७ क्रोधन सवछरे चैत्र सुध प्रतिपदा जे संभाजी बिन नागोजी भडला चिरपत्र जे आपल्या वतनात वाजी बिन तान्हाजी भडाला उभा राहिला यास्तव इनसाफ मुलेश्री-ची क्रिया नेमिली जे वाजी आपले वंसींचा नव्हे. आपले वडिली काही वतन दिल्हे नाही आपणास वडिली सांगितले

नाहीं हे खरे वतन आपले बाजीस समंध नाही यैसे वदोन श्री-बरी बेलपत्राचा दिव्य केला आपण बेल काढून बाजीस दिल्हा आपणास दशरात्रीत अथवा पंचरात्रीत श्री—ने काहीं घात मृत्याचा आपले घरचे माणुस व चतुषपाद मृत्य पावले तर आपण खोटा आपण-श्री चा बेलपत्र दिव्य केला हे खरे.

ले. ६०७ } {श. १६६८ आषाढ शु. १
{इ. १७४६ जून ९

॥ द मा अनाम नागोजी सर्ज्याराव जेधे देशमुख ता भोर ता रोहिडखोरे यास चिमणाजी नारायण सचीव सुा सबा अबैन मया अलफ राजश्री—स्वामी यानी

(ब) श्री गोवणकोटेचे मसलतीबद्दल लोक इसाफतीपैकी हुजूर आणविले
शंकराजी असेत तरी इसाफती पैकी लोक आा २० वीस जण चतुर्मासची पोटाची
नारायण बेजमी करून सिताब हुजूर पाठवून देणे ढील केलिया इसाफती दूर

होतील यैसे पष्ट समजोन सदरहू लोक लौकर पाठवून देणे या कामास कान्होजी निगडा पाठविला यास हा १५ येक इसापती पैकी लोक सिताब आदा करणे पा छ ३० जमादिलौ (वा) पत्रा
वधिरयं
भाति

सुरु सुद बार

ले. ६०८ } {श. १६६८ भाद्र. शु. २
{इ. १७४६ आगष्ट ७

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री महादाजीपत स्वामी गोसावी यासि पो आनंदराउ बाहिरव नमस्कार विनंति उपरी येथील कुषल ता भाद्रपद सुध द्वितीया सुा राजपुरी जाणून स्वकीये कुषल लेखन केले पाहिजे या नंतर ता रोहिडखोरे या मावलात मोगलाईचा तगादा केला म्हणून देसमख ता मार यानी विनंतिपत्र लिहिले त्यावरून विदित जाहाले यैसियास मोगलाईचा यैवज दरमहात मजुरा राजश्री -स्वामीनी दिल्याविाचून मोगलाईचा यैवज सुटतो यैसे नाही हा विचार तुम्हासही कलला आहे आम्हासही कळतच आहे येथून राजेश्री फत्तेसिंगबावा मोसले दरबारा गेले त्यानी दरबारी मोगलाईची बोली घातलीच आहे सांप्रत राजश्री—पंतप्रधान याची पत्रे राजश्री स्वाचीचे सेवेसी पाठविली आहेत की राजश्री पंतसचीव यास दरमाहात मोगलाईचा यैवज मजुरा द्यावा आणि लोकास उपद्रव न करावा म्हणून राजश्री—स्वामीस व राजश्री—पंत सचिव यास पत्रे पाठविली आहेत निर्वाह होइल तोपर्यंत तुम्ही मोगलाईचा तगादा महालात न करणे तह होये तोपर्यंत तकूब असो देणे वसूल घ्यावयास दिरंग लागतो यैसे नाहीं येके दिवसी वसूल घेतला जाईल

आमचे लिहिणे इतकेच कीं दरबारी होऊन तह होये तोपर्यंत वसूल ने घेणे बहुत काय लिहिणे) येथून लोक उठोन गेले तरी हे बदनामी केवल आमचेच सिरी आहे ऐसे नाहीं राजश्री पंतावरी निमित्य येईल या निमित्य येथें लोक गाठून राबावें लागले आहे मोगलाईच्या ऐवजावरी कापसाचे बे लोकास दाखवून आजीवरी वोढिले येथेही रोजमरा दीड मास पावला नाहीं आणी घरी ही तगादा लागलियाउपरी हे लोक काशास राबतील होणार असेल ते होईल आमचा येतन काय सारांष राजश्री × प्रधानाचें उत्तर ये तोवरी सबूरी करावी हे विनंती.

ले. ६०९ } { श. १६६८ इ. १७४६

करीना खंडनाक वलद रामनाक महार मौजे कारंजिये ता। भोर ता। रोहिडखोरे सुा सन सबा अर्बैन मया अलफ साहेबाचे सेवेसी करीना लेहोन दिल्हा ऐसाजे इदिलशाहा निजामशहाचे कारकिर्दीस किले रोहिडा येथे आपले बापाचा चुलता काळनाक महार मोजे मार व येसनाक महार सोंडकर या दोघांच्या नाइवया होत्या ते समइ वतनदारीचे चाकरीस कमळनाक महार मौजे नाटबी ता। मार व वाडी व धावडी ता। उतरोली हे दोघेजण दुतर्फाचे महार होते निमेनिमप्रमाणे उत्पन्न घेऊन चाकरी करून होते त्या दोघानी बदमामली केली म्हणोन अजम सेखजी किलेदार किले रोहिडा याणी दोघाची डोचकी मारावियी केली व मुलेबाले ढाणकास द्यावीसी केली तेव्हा सोंडकराने रदबदल करून कमळनाक महार मौजे नाटंबी यासी आपले हातीं घेऊन खंड कबूल केला तो दिवाणात दिल्हा वाडी धावडीचा महार अटकेत ठेविला ते समई नाटंबीच्या महारास खंडाचा पैसा न मिळे म्हणून त्याने आपले महारकीच्या वतनाची चौथी तक्षीम येसनाक सोंडकर यासी दिल्ही तेही येसनाक कबूल न करी आपला पैकाच मागो लागला तेव्हां महारकीच्या वतनाची चौथी तक्सीम व किल्लाचे वतनदारी मुले उपेंद्र होईल ते खाणे व वतनदारीची चाकरी करणे म्हणोन सांगितले त्या प्रमाणे येसनाकाने कबूल करून त्या-प्रा। चालत आले त्यावरी किला महाराज राजश्री थोरले—स्वामीस हस्तगत जाला मोगलाई बुडाली तेव्हां कालनाकाची नाइकी व सोंडकर महाराची नाइकी करार केली आणि वाडीचा महार अटकेत होता त्यास खंडाचा पैका न मिळे याकरिता त्यास सर्जा-बुरुजाच्या खाले पायांत घालावयाचा हुकूम महाराजानी केला त्यावरून वाडीचा महार सर्जा बुरुजाच्या पायाखाले घातला त्यावरी काळनाक व सोंडकर महार मयत जाला पोरांडा जाला देशावरी गेले त्यावरी रामनाक आपला बाप गावावरी आला त्याणे रायेगडास जाऊन महाराज राजेश्री—कैलासवासी याणी पूर्वीचा दाखला मनास आणून पूर्ववत प्रमाणे सनद दिल्ही ते किल्यास आणिली मेटे आठ वसाविली नाइकी वतनदारी चालवू लागला

× प्रधानाचें येथपासूनचा पुढील मजकूर पत्रावर श्रीकाराशेजारी आडवा लिहिला आहे

पुरातन घरठाणा बांधला टाके पाणी खावयासी एक दिल्हे तेथील पाणी खावून वतनदारीची चाकरी व नाइकी केली तो मृत्य पावला त्यास सर्जा बुरजाखाले पुरिला तेथें चिरा रोविला आहे त्यास त्याचा लेक आपण आपले लग्न जाले नव्हते तेव्हां भोजनाक राजाणी वस्ती वाडी ताा उत्रोली त्याची लेकी लग्नाची केली ते लहान म्हणवून त्याचे घरी येकेठाई राहीलो आणि वतनदारीची चाकरी व किलाचीं नाइकी करीत होतो त्यावरी भोजनाक बोलला की तू एकला तुजला दोन्ही चाकऱ्या ओढणार नाहींत तरी वतनदारीची चाकरी मजला सांगणे व तूं नाइकी करणे म्हणोन बोलिला त्यावरून आपण त्यास बोलिलो कीं तुजला वतनदारीची चाकरी सांगता येत नाहीं तरी तूं माझे नाइकींत + + + + राहोन माझे निसबतीने वतनदारीची चाकरी करिसील तरी तुजला सांगेन यैसे बोलिलो त्याप्रा भोजनाकाने कबूल केले त्यावरी त्याची आसामी आपले नाइकींत घालून त्यास वतनदारीची चाकरी करावयासी सांगितले आपण नाइकी करीत होतो त्याउपरी आपण वेगळा निघालो तेव्हां वतनदारीबद्दल भोजनाक कजिया करू लागला दसरियाचे शांतीच्या टोणग्याचे सींर आपले वडील व आपण घेत भोजनाकाने कजिया खाले सींर घेत होता त्यास आपण दोही दिल्हीं त्या तागाईत दरवाजा नजीक श्री—जननजिवळ टोणगियाचे सींर पुरु लागला.

इंदापूर-देशपांडे

ले. ६१० } { श१६२४ फाल्गुन व. ७
इ.१७०३ फेब्रु. २७

(फा. वा. शिक्का)

देसमुखानि व देशपांडियानी प्रा इंदापूर सुा ११११२ मालूम दानद प्रा मजकुरी राजश्री येकोजी राजियाची जागीर साहीम दस्तूरबदल जाली परवाना आमील घेऊन पेसजीच आगारीस अले आहेती करोडियान व मोकदमानी नस्टाई करून जबेच्या कामास तथवत तफावत केले आहे माल सोडिला आहे जागीरबदल असता रयेतीने यैसे खेळ केले तुम्ही माकूल लोक अवघ्या नियेमे नेले असतील अगर रयतीने माल नेला रयेतीकडे यैसे थारले आहेत मोकदमास ताकीद करून बमोजीब तनखा जमाबंदी करून वसूल करवणे यात तुमचा मजुरा आहे तीर्थस्वरूप राजश्री आबासाहेब दौंडस गेले आहेत आलियावर त्याच्या मोहरेनासि तुम्हास परवाना येईल हतपासून तुमच्या आमचा घरोबा चालत आला आहे त्याप्रमाणेच तुम्ही घरोबा राखोन स्नेह राखणे मोहिमेत राजश्री येलोजी राजे खुशाल राहेत ते करणे हर घडी आपली खुशखबर लिहीत जाणे छ सा सवाल (ष. मो.)

ले. ६११ } { इ. श.

॥ श्रीमद्दत्तात्रेयायनमः ॥

मोगलखान

राजश्री गोविद कान्हो व गोमाजी सुरो व नारो माणकेस्वर व माहादाजी भास्कर देशपाडे पा इदापूर गोसावी यास

॥द श्रीमत्सकळ गुणालंकरण सौजन्यैक निकेतन राजमान्य-अतीं स्नेहपूर्वक कान्होजी राजे प्रभानवलीकर दंडवत येथील क्षेम पर्यंत येथास्थित जाणउन स्वकुशल लेखन केले पाहिजे डपरी सांप्रती राघोपंताचे लिहिलियावरून कलो आले कीं चौऱ्याआसीचे पाटील व कसबियाचे बलुते मिलोन देशमुखाची पाटिलकी कसबियाची म्हणऊन शाहिदी द्यावी यैसा करार केला हे वर्तमान लांडियास कलोन परगणियास आपण राजी नाही गोतामधे जाईन आगर साकरोजीस हुजूर घेऊन जाईन म्हणतो तरी गोतामधे आगर हुजूर जावयास अम्हीही राजी आहो व सेख सदू साकरोजीस व राघोपंतास म्हणतातीं की लांडा खाने आजम व हालीमवाली व काजीस आठ हजार रुपये कबूल करून देतो की महजर करून देऊन पैके घेणे यैसे म्हणतो तेच आठ हजार रुपये तुम्ही कबूल करणे तुम्हास महजर करून देऊन ये गोस्टीस तुम्ही आनमोदन देऊन त्याचसारखे बोलता म्हणे तरी आम्ही पाटिलगी नवी साधायास आगर खरीदी करावयास आलो नाही की आठ हजार रुपेये कबूल करून महजर करून ध्यावे ज्या गावास पाटील नाही तेथे देसमुख पाटील व कुलकर्णा नाही तेथे देशपाड कुलकरणी हा दस्तूर बुनियाद आहे नवा नाही आठ हजार रुपेये कबूल करणे म्हणऊन सेख सदू कैसे म्हणतातीं व तुम्ही कैसे आनमोदन देता हे कळत नाही गोतामधे जायास आम्ही रजावंत असतां पैकियाची लालुची धरून सेख सदू लाडियास महजर कैसे करून देऊ म्हणतातीं हे कैसे घडो पाहते जोरावारीने महजर करून देऊ म्हणतील तरी तुम्ही आपले हाती महजर न लिहिणे व चोऱ्याआसीचे व बलुते त्यावरी शाहिदी करावयास समध नाही सेख सदू कैसे महजर करितील जोरावारी करून तुम्हास माहजर ल्याहा म्हणतील तरी तुम्ही आम्ही भाऊ आहो वृतिवंताची नीति आहे की मार खावे बंदी पडावे परंतु येकाची वृतीवरी मेंक उठो नये यैसी भाऊपणाची नीति तुम्हास व आम्हास उभयपक्षी आहे पाढरीवरी शत भीष्म होऊन गेले असतील सात पांचसें वरषे वतनावरी नाही तो आजी वतनावरी उभा राहिला म्हणिजे पाचसे वरषाचे वृतिवंत आसतील ते येकावरी येक उभे राहतील यैसी गोस्टी आहे यैसियास सेख सदूचे म्हणणि यावरून तुम्हा व चौऱ्याआसीचे पाटील महजर करून न देणे तुमचे हस्ताक्षरे व चौऱ्याआसीचे पाटील दसखतेनिसी येक शाहिदीनामा करून देणे की कसबियाची पाटिलगी बुमीयार देसमुखाची आहे त्यावरून आम्ही व लांडा गोतामधे आगर हुजूर भाडत असून शाहिदीनामियावरी काजी मोहर करितील तरी बरे नाही तरी तुम्ही व चौऱ्याआसीचे पाटील मिलोन शाहिदीनामत करून देणे त्यावरून लाडा जेथे जाईल तेथे वाद सागोन कस

(चिकटविलेला फा. वा. शि.)

बियास देसमुख नावास पाटील आहो कसबियामधे आम्हास काये उत्पन्न आहे व तुम्हास काये उत्पन्न आहे हे आपले जागा समजणे. जो विचार कराल तो बहुत समजोन करणे बहुताच्या बऱ्याकरितां आम्ही भांडतो कलले पाहिजे

ले. ६१२ } { श. १६३८ मार्ग. शु.४
इ. १७१६ नोव्हे ७

श्री

वस्तिश्री राज्याभिषक शके ४३ दुर्मुख स्वत्सरे मार्गसीर्श सुध चतुर्थी सौम्यवासरे क्षेत्रिये कुला तंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी राजश्री कृष्णाजी नाईक जोसी यासी आज्ञा केली यैसीजे रामाजी कान्हो देशपाडे पाा इदापूर यावर तुम्हास वरात रुपये२००० दोन हजार दिल्ही त्यास शंकराजी वेदाजी जमान होऊन + तले दोन दिल्हे त्यापैकी सोलासे रुपये पावले +हा+च्यारसे रुपये राहिले ते रामाजी कान्हो यांस माप केले आसेत तर तुम्हापासी शंकराजी वेदाजी यांचे खत आहे ते फिरोन देणे ४०० च्यारसे रुपयाचा तगादा न लावणे जाणिजे बहुत काये लिहिणे

बार सुरु सुद बार बार
असल बमोजीब नकल

ले. ६१३ } { श. १६४२आषाढ व. ७
इ. १७२० जुलै १५

कौलनामा राजश्री देसमूख व देशपांडे पाा इदापूर ताा भिवजी नरसिह माहाजन व नारो नरसिंह त्रीगुळ मौजे च्याबली पाा मजकूर सुा सन ११३० दादे कौलनामा यैसाजे तुमचे बाबे मोकदम मजकूर यानी येऊन आर्ज केला जे त्रिगुल मजकूर परागदा होऊन परमुलकास गेले आहेत त्याचा दिलासा करून गावावरी आणून मौजे मजकुरी पानमळे लावावयाची उमेद धारताती आणि थोरले माहाराज राजश्री शाहाजी राजे भोसले यानी कौल दिल्हा होता त्याप्रमाणे चालविलिया त्रिगूल मजकूर मौजे मजकुरास येऊन पानमळे लाविताील म्हणौन आर्ज केला बराये आर्ज खातिरेस आणून तुम्हास कौल दिल्हा आसे आपली खातीरजमा राखोन मौजे मजकुरास येऊन पानमलेयाची कीर्द करणे तुम्हास थोरले माहाराज यानी पेशजी कौल दिल्हा होता त्याप्रमाणे हालीही तुम्हास कौल दिल्हा आसे बीतपशील.

(अस्पष्ट मराठी शिक्का)

पाने विकितील त्या विकरियातील पाच त्रिगुलास खुडणी दर कुडतानास तांबोली

तक्सीमा तुमच्या साहावी तक्सीम सरकार कलम १

सरकारची जकाती तांबोलियापासून दर कुडतनास रुके ८६ कलम १

पानमलियात आंबे व चिचा लागतील त्यास च्यार तक्सीमा रयेत पाचवी तक्सीम सरकार कलम १

गुन्हीयात हर जिनस अगर तरकारी होई + + तीस माफ असे कलम १

येरडी मलियात गीर्दन पईत ताटवा सभोवते लागतील त्यास दिवाण देणे नाही.

+ + वजनास हक दर कुडतनास उभे रासीस रुके ८६ साहा आहेत कलम १

लंग

यापासून रुपये -।- पावला घ्यावा कलम १

पानमलियात जुई जुई केले व निबे हर जिनस तरकारी व झाडे लागतील त्यास दिवाणचा वाटा नाही कलम १

पानमलियास्ति गुन्ह जमीन बिघे -।१० तिसा पांडाने बिघ्याने द्यावी कलम १

पानाचे बीज गावी विकून वि (करी) करील त्यास सरकारचा वाटा नाही परगावी बीज विकील त्यास सरकारची सहावी तक्सीम वाटा द्या [वा] कलम १

त्रिगुलाची बैल मेला तरी कातडे महाराने द्यावे माघारीं कलम १

त्रिगुलाचे सरीम व चाकर जे आसतील त्यास सारा माफ कलम १

येणेप्रमाणे तुम्हास कौल दिल्हा असे ब्याज मलियाच्या गुन्हे क ट बा न दर बागास होन २।॥ पावणे तीन धाग द्यावा येणेप्रमाणे (पुढील दोन ओळी अस्पष्ट) येऊन पानमलियाची लावणी करून सुखरूप राहून आबादानी करणे येणेप्रमाणे माहाराज राजश्री स्वामीचाही तुम्हास कौल सादर आसे दरिबाब आसे रा छ १९ माहे रमजान. (वा.मो.)

ले. ६१४ } { श.१६४३ भाद्र. व.८ इ.१७२१ सप्टे ३

श्री

रो रखमाजी बापोजी व त्रिबक माणकेश्वर व रघोजी दामोधर देशपांडे प्रा इंदापूर यासी धोंडाजी गोविंद व माहादाजी दाजी देशपांडे पा मजकूर सुा हजार ११३१ कारणे कागद लेहून दिल्हा ऐसा जे पूर्वी आपल्या वडिलानी शामराज नीलकठ राजेकर

यास मौजे पलसदेव प्रा मार येथील गाव कुलकर्ण तुमचे त्यास दिल्हे औसीयास हाली राजश्री नागो दादाजी रोजेकर येऊन उभे राहिले त्यानी आपल्या वडिलाचे कागद दाखऊन आपल्यापासून मौजे मजकूरचे कुलकर्ण दरोबस्त तुमच्या हावाला केले आसे तरी तुम्ही ते कुलकर्ण खाणे जो पावेतो नागो दादाजी रोजेकर याजकडे मौजे मारचे कुलकर्ण गुंतले आहे तो पावेता आपणास कसबे मजकूरच्या कुलकर्णास बोलावयास संमध नाही हाकदक घुगरी व कुलकर्णाचा मानपान तुम्ही खात जाणे तुमचे कुलकर्ण नागो दादाजीकडे गुंतले आहे ते तुमचे सोडून देऊ तेव्हा आपण कसबे मजकूरचे कुलकर्ण आपल्या विभागे करूं यास हिला हरकत करूं खोटे हे लिहिले सही कसबे मजकूरचे कुलकर्ण समाईक आहे म्हणौन तुमचे हावाला केले आसे हा कागद लेहून दिल्हा सही छ २१ जिलकाद

गोही

रायाजी पा सिगाडे
मौजे सलगाव
शामजी पा गौली
मौजे भाट निंबगाव

गोमाजी पा मौजे पलसदेव

सिवाजी चांगो कुलकर्णी
कसबे बावडे
सक्राजी वेदाजी
आा देशमूख

लिंगोजी सोनदेव पा
मौजे निरगुडे
खंडोजी पाटील
मौजे भिगव्हाण
येसाजी पा
मौजे लाहासुर्णे
कुमाजी पा राणोजी पा
मौजे सेटफले हवेली

विठल आनंत सभासद हुजरात.

ले.६१५ } (मु. व सी. ले. ५९२ पो) { श.१६४६ पौष शु. १४ स. १७२४ डिसें. १८

श्री भार्गवराम

ाद मा अनाम देशपांडे पा इंदापूर यासी पंताजी सिवदेव सुहूरसन खमस आसरीन मया अलफ देशमुखीची मुतालकी राजश्री शंकराजी वेदाजी यांचे नावे होती ते मृत्य पावले या करितां देशमुखीचा मामला राजश्री माधवराव शंकर यांस हुजरून करार केला असे तरी तुम्ही व ते येकमते वर्तोन परगणाचा आमल करणे देशमुखीचा हकलाजिमा इनामती इसाफती कुल काइदे मानपान तश्रीफ देखील सुदामतप्रमाणे आमल राजश्री माधवराव शंकर यांकडे सुरलीत चालवणे जाणिजे छ १२ रविलाखर

सुरू सुद
पौ छ २१ रालाखर
सुा सन ११३४

ले. ६१६ } {ए. श.

श्री शंकर

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री धोंडोपंत स्वामी गोसांवी यांस पो यादव सामराज नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करणे विशेष राजश्री स्वामीनी इंदापूरची देशमुखी व पाटिलक्या व शेऱ्या या वतनांचे मुतालकी आम्हांस सांगितली आहे आठा पंधरा दिवसांनी तिकडे येऊन भेटी होईल वर्तमान कलेली कागदपत्र राजमुद्रेचे सिद्ध करविले आहेती आम्ही येऊन तेव्हां घेऊन येऊन तूर्त राजश्री पंताजीपंताचे कागद पाठविले आहेत हे जिकडील तिकडे पावणे वरकड कित्येक वर्तमान जानो सिवदेऊ याणी लिहिले आहे त्यावरून कलो येईल माणसे पाठविलीं आहेत यांस खर्चास देविले आहे त्याप्रो तुम्ही ताकीद करून पावणे बहुत काये लिहीणे लोभ आसो दीजे हे विनती

ले. ६१७ } {इ. श.

(विकटविलेला फारशी शिक्का)

ता द श्री सकलगुणसवजन्य अखंडितलक्ष्मीआलकृत राजमानी राजश्री देशमुख व रा देशपांडिये पा इदापूर गोसावी आसि स्नेहकीत कृष्णराउ हरकारे सा जुनर कृतानेक सा नमस्कार आनुक्रमे आसिरवाद विनती उपरी येथील क्षेम ता छ २१ माहे जमादिलावल जाणऊनू तुम्ही आपले क्षेम कुशल लिहीत जाणे (पुढील एक ओळ अस्पष्ट) लिहीत नाही हे तुम्हापासून दूर गोष्ट आहे हाली रा खडोजी विठल आपले नायेब तेथ आहेत त्यानी लिहिले आहे की तुम्ही पातशाही कामास तन देत नाहीत तरी हे तुमच्या अहस्तपनापासून दूर गोस्ट आहे जे जरूरी हकीकत असल तर आमचे नायेबास जाहीर करीत जाणे व बक्षी व सवानीगार याची कामकाजे आवघी चालविता आजी आमचे कामकाज आजी दोनी वरसे जाली की काही होत नाही ऐसी तुमची शान नव्हे हाली रा खडोजी विठल तेथे आले आहेत जे सुदामद आपले मामूल आहे तेणे प्र (पुढील दोन ओळी अगदी अस्पष्ट) खट करितो तरी तो भला मनुश नव्हे आजी मुदती वीस वरसे जाली की मिर्जा आलीबेग यानी पातशास आर्ज करून सरकार जुनर दस्तक असालतन करून दिधली आम्ही काही कोन्हाचे नायेब नाही जैसे रा भास्करराऊ व रा वेंकटराऊ याची मकाने तैसी आमची मकाने आहेत त्यास काये पोहचते त्यास माकूल कीजे आनी त्यास दखल न देणे सनदे बमोजीब आमल कीजे रा प्रतीतरायाची सनद आनील ते काये मजूर आहे हजुरी सनद आमची तागिरी आनील ते मजूर आपलीहि ताजी सनद आहिदी इदापूरची आनखिली आहे तेहि पधरा विसा रोजा येऊन पोहोचल हे जागा आपली वतने खुलद मकान पातशाहा यानी दिध- (ले) आहेत सनद बमोजीब समजोण करणे रा खडोजीपताची हरयेक बाबे साहेता कीजे यास कोताई न कीजे आजी कामकाज आमचे चालविणे याहवि-

येखतियार तुमचा आहे तुमची कर्म जे आहेत ते जाहीर आहेत दर गुजर ग्रहस्तपणे करजेती बहुत काये लिहिन हे विनती.

भंगळूर-साटे

ले.६१८ } (फा. मु. व मज.) {श. १५०७ आश्विन व. ८ {स. १५८५ अक्टो. ६

कौलनामा आज दिवाण किले स्यादुर्ग ताा सर्जाराव मोकदम मौजे मंगळुर सा मा रु णे (नु) द र बाव आकी सुा सीत समानीन व तिसा माया तुम्हा बाबे मोकासाई मौजे मा इळेतमेसी केळे जे मौजे मजकुरीचे पाटीलगी तुम्ही बदलखरीदी कबूल केले असे साहेबाचा कौल किले मा होउनु सादर जाहालेया मौजे मजकुरास येउनु पाटेलगी व सचणि करीन म्हणउन तारि बराइलतमेसी मोकासाही मौजे मजकुर खातिरेसी आणौन तुटमासी कौलनामा तकवेती सादीर केले अ(से)कोणे बाबे काही अदेसा न करिता किले मजकुरास येउनु अफळे हवाळ माळम कीजे तुझे ये इतमांम करून मौजे मजकुरीचे पाटिलगी करून गाव कीर्द मामुरी अबादानी कीजे छ २१ सौवाळ.

ले.६१९ } {श. {इ.

श्री समळगुणसदण राजश्री सर्जाराव साटे मोकदम मौजे मंगळुर प्रति मुधोजी वीस्वासराव देसमुख किळे स्यादुर्ग आसीर्वाद विनंति उपरी तुम्ही मौजे मजकुरीची मोकदमी खरीद केली आहे तुम्हास विळाचा नैबगैबत साहेबांचा कौळ व मोकासाही मौजे मजकुरीचे त्यांचा कौळ पाठविळे आहेती त्या कौळावरून तुम्ही मौजे मजकुरास तूर्त येउन कीर्दमामुरी करिजे कोणे बाबे तालुक अंदेसा न करितां तु से (ह्मी) मौजे मजकुरास येउन मोकदमी चाळवीजे सुखे असिजे हे विनंति

ले. ६२० } खर्डे-पीर {श. १५२६ कार्तिक शु. ६ {इ. १६०४ आक्टो. १८

(वा) राजश्री
येमाजी पत
गराव

अज रख्तखाने राजश्री पतगराऊ राजे दामदौलतहू बिजानेबु हुदेदारानि हाल व इस्तकबाल व मोकदमानि मौजे (खरडे) ताा जाबखेड सुा खमस अलफ सेख गुस्लीम वा इनामती जमीन मस्याखती बाबा रमजान पीर मौजे मजकुरु हुजुरु येउनु मालूम केले जे इनाम चावर नीम भोकरपटी बाबती वाडींचा ग न + मौजे मजकुरु देखील नख्तयाती बुलबाब आहे भोगवटेयास + + + मलिक लालबरीचे खुर्दखत मठी· (ढी ?) मधे होते रख्तखाने इनाम + + गवटे याचे खुर्दखते गावात होती सन अर्बा· मधे अता + + वा + + मसनदअली मौजे मजकरास येउन गाव जालिला व लटिला ते

वेले साहेबाची खुर्दखते होती ते जलाली सालमजकुराकारणे खुर्दखत होये मालूम जाले सेख मुसलीम इनाम जहती मस्याखती बाबा मजकुरु पीरु मौजे मजकूरु इनाम जमीन (चावर) नीम भोकरपटी बाबतीवाडी चागनाक मौजे मजकूरु + + + नख्तयाती कुलबाब भोगवटा तसरुफाती + + + + ने इजानेबु मणास आणौनु जैस चालविले असेल त × × × वीजे दरहर साल खुर्दखताचा उजूर न कीजे ता (लीक घेऊ) नु असली इनामदार मजकुरापासि दीजे

(ब) मोर्त
ब सूद

तेरीख ४ माहे जमादिलाखरू
जमादिलाखर

ले. ६२१ } {श. १५२७ कार्तिक व. ६
{इ. १६०५ आक्टो. २३

(फा. शि. कंगोरेदार)

अज रख्तखाने माा हाा राजश्री जाधवराऊ राजे दाईमदौलतहू (बजा) नेबू हुदेदाराने हाल व इस्तकबाल व मोकदमाने मौजे खरडे (ताा) जाबखेड सुाा सीत अलफ सेख मुसलिम इनामती जहती + खती बाबा रमजानु पीर मौजे मजकूर हुजूर येउनु मालूम केले जे इनाम चावर नीम भोकरपटी बाबती वाडी चाग(नाक) र देखील नख्तयाती कुलबाब आहे हाली साहेबास मुकासा (अर्जानी) जाला आहे हक मन्हामती फर्माउनु खुर्दखत मन्हामती करावया रजा होये म्हणउनु मालूम जाले बराये मालुमाती खातिरेस आणौनु सेख मुसलीम इनामती जहती मशा × × × × × (बाबा रमजा) नु पीर मौजे मजकूर जमीन चावर नीम भोकरपटी + + + + चांगनाक दीधले असे कारकीर्द पतगराव भोगवटाचा (लिला अ) सेल तेणे [प्र] माणे चालो दीजे सालाबाद खुर्दखताचा + + + + असली इनामदार मजकुरापासि दीजे तालीक घेणे (फा. मो.)

तेरीख २० माहे जमादिलाखर
माहे जमादिलाखर

ले. ६२२ } {श. १५३१ माघ शु. ८
{स. १६१० जाने. २२

(वा) राजश्री
यमाजी पत
गराव

अज रख्तखाने राजश्री पतगराउ राजे दामदौलतहू बिजानेबु का (रकुना) नि हाल

व इस्तकबाल देसमुखानीं तपे जाबखेड व (हुदे) दारानि मौजे खरडे तपे मा बिदानद
(वा) राजश्री सुा आसर आलफ बा खुा मालिक अजंम छ ७ माहे सौवाल सेख
बख्तरा मुसालिम खिजमतीगार रोजा बाबा रमजान हुजुरु येउनु माद्धम केले
व राजे जे आपणासि इनाम जमीन चावर येक देखील माल सेत भिऊ मढीकर
दर सवाद मौजे म ×× बा हुजती सेख अबदुल चालिले आहे साहेबाचे खुर्दखत होये
मा (लूम) जाले सेख मुसलीम खिजमतीगार बाबा रमजान यासी इनाम जमीन चावर येक
देखील माल सेत भिऊ मढीकर (मढीकी ?) दर सवाद मौजे मार बा हुजती सेख
अबदुला मुकासाई सुासन सीत तिसैन तिसा मेया चालिले (आसे) ली तेणेप्रमाणे
भोगवटा तसरुफाती पाहून चालविजे दर हर साल खुर्दखताचा उजूर न कीजे तुम्ही त लीक
लेहोन घेउनु असली फिराउनु (दीजे चा) वर येक बा हुजती कदीम व भोगवटे व
पतगराऊ व जाधवराऊ (कार) कीर्दीमधे चालिले असेली तैसे चालविजे व हजरती बुऱ्हान
निजा (मशा) हाचे कारकीर्दीमधे चालिले असेली तेणेप्रमाणे चालविजे.....
तालीक छ २९ साबान म्हणौनु सादर आहे येणेचिप्रमाणे भोगवटा व तसरफा चालिले
असेली तेणेप्रमाणे चालविजे (ष. मो.)
तेरीख ६
जिलकादी

ले. ६२३ } { श. १६७३ फाल्गुन. शु. ७
स. १७५२ फेब्रु. १०

श्री

(फा. वा. शि व फा. मजकूर)

रो बाबूराव बाबा सनसरे बादूर ठाणे का जामखडी

समापत्र शके १६७३ प्रजापती नाम सवत्तछरे फालगुण सुध ७ सोमवार ते दिवसी —या विदमाने नामाजी पाटील बिरादर मो स मियाखान मो व येकाजी प्रतापराव मो व बाबूराव देवाजी कुलकर्नी व नागोजी रागे भाये दादजी भुमकर पदाजी विसावे भिकाजी भुमकर सदरहु मौजे यली प्रा सेवगाऊ सुा सन ११६१ कारणे समापत्र लेहून दिधले यैसी जे रो येकाजी प्रतापराव मो बहुत दिवस बाहेर होते त्यामुळे त्यासी व आपणासी कटकट जाली याजकरता अवधी पाढरी जामखेडास तुम्हापासी आलों त्यासी तुम्ही आमचे अवाधियाचे येकचित करून दिधले याउपरि आपण पाढरी बतोलियास गेलो तो मागे भाऊ गावात होते याणी बाबत्याचे लाणे गावांत आणिले तर आपण तिघे भाऊ व पांढरी येकचिते गांवावर नादु जर तुम्हासी कोन्ही कटकट करील तर आपण रो येमाजी प्रतापराऊ मो याचे व्यापती (साबुती ?) येमाजी प्रतापराव गावावर नादतील तर आवघे पाढरी व आपण भाऊ नादो जर येकाजी प्रतापराव बाहेर राहिले तर तिघे भाऊ व पाढरी बाहेर राहू वडील

ज्या चालीने चालले ते चालीने चालोन पुढे नामाजी पाा त्या माघ मियाखान मो त्या माग यमाजी प्रतापराव मो तिघाचे ती ठाई आसे आपल्याला हिशाप्रमाण आपलाले वतन खावे यासी काष्ही फितवा फादडा करील तो गोताचा आन्याई दिवाणाचा गुणेगार हे लिहिले सही

निाा नागर
[नांगरावें चित्र]
बिाा बाबूराऊ देवजी कुलकर्णी
मौजे माार

ले.६२४ } {श. १५४९ चैत्र शुद्ध. २
{इ. १६२७ मार्च ९

(कांहीं ओळी फारसी मजकूर)

द कारकुनानी मामले रायेर मालूम दानद सुा सबा अशरिन अलफ छ २२ जाा खर झा केली. रा छ१ रजब मजमून गुजनमावल पा मुरंबदेऊ मुजाफती मामले माा येथील देशमुखी हैबतराउ कान्होजी व हाबाजी हैबतराउ चचेरभाइ हकाबदल भांडत हर दोघाचे करकरे निमित्य जमेती करून ताा माा तसवीस देउन खराब केला मुदा खातिरेस आणितां गोतास राजी जाले. हरणसखोरा उभे राहणे देशमुख निवाडा करतील त्यास यावर कान्होजीनी यासमयी दोन कमीन जागा मौजे आंबवणे ताा माा येथे राहत होता तेथे येउन अर्जोजी देशमुख गीरराव व हाबाजी देशमुख ताा मुठेखोरे याहाती कमिनास सांगोन पाठविले कीं रोहिडेकर देशमुख आपणास जिवाचे जमान होतील तरी आपण हरणस खोरियास जाइन नाही तरी नव जाय यैसे बोलोन मुरंबदेव तोरणे मुा किले कोंढाणा ते वाट धरिली यैसा खटला सदरहू दोघी सांगितला यावरी कान्होजी माा जमेतीचे जोरे कामिनाचा दिवाटिया नुकसान केला गंभीररायाचे माणूस तीन पोटावरी हाणोन पाडिले. जरूर वाचतील कान्होजीने डोंगर धरिला कमीन आंबोणियास येउन अर्दास व महजर राा केला याउर कमीन हरणसखोरियास जाउन तेथे कृष्णाजी बांदल जमेतीसी भेटला कौल व फर्मानाची व शर्तीची बळकटी करून रायाजी व बालाजी व सूर्याजी व हाबाजी हैबतराउ कमिनाबराबरी देउनु आपली जमेती देउनु ताा गुजनमावल तेथे आणिले एका दो गार्वाचे कुणबी त्यास भेटविले साहेबी बाबाजी व रायाजी याजकडे नाइकजी याचे नावे फर्मान कौल व लुगडी सादर केली पाहिजेती हे नाा दौलतरखाह असती हली कान्होजी माा मुरंबदेउ व तोरणा मुा किले कोंढाणाचे वाडीस माणूस ठेउन आपणही तेथेच राहोन छ १२ रोजी मौजे आसनीमार्ग ताा माा तेथील मोकदम दस्त करून नेक्नु त्यास बोलिला कीं आपण बाहेर पडिली तुम्हां कैसे रहाल ? यैसे रयेतीस तसवीस देउन हरामखोरी करितो त्यास मदती रोहिडेकर देशमूख देतो व आसरा किले मुरंबदेउ व तोरणा अगर कानद खोरेचे देशमूख व देसकुलकर्णी देतो तरी सदरहूचे नाव ताकीद लिहिली पाहिजे कान्होजीचे

घाके रयेती परागंदा होतातो म्हणून हे हकीकती ताा वा लिहिली तरी जो अदिकारी माा मामले माा वरी येउनु कीर्द मामुरी व दिलासा काम करितो त्यास कौलच आहे तुम्हीही दिलासा करून मामुरीस तकसीर न कीजे व जो अधिकारी बाहेर पडिला आहे त्यासही समेतंस मालूम करून आपले जागा संगिनाती राहोन व अधिकारी मास पालती लावून दस्त कीजे व जेही आसरा दिधला आहे त्यास ताकीद लिहिली असे व हाबाजी हैबतराउ व बाळाजी नाईक व कान्होजीचे सगेभाई रायाजी व सूर्याजी यास आणावयास हरणसखोरियास गेला. कृष्णाजी बांदल देशमुख ताा हिरडसमावल या नजीक होते तो बराबरी आपले जमेतीने आला सदरहूजण कौलाची बलकटी करून दिधली त्यास तश्रीफ होन पाच बाा खासा कृष्णाजी बांदलास शाल येक व विश्वासराव हेजीब शेला येक येकून व होन येणेप्रमाणे देउन सदरहू चौघास घेउन आलो म्हणौन लिहिले तरी तुमचे नजरेस दौलतखाही पडेल ते कीजे व कमिने बाबाजी व रायाजी व बाळाजीस फर्माविले की ताा माा सरखोत व रयेती आणोन मामुरी होय ते करणे यावर सरखोत व मोकदम होते ते माणूस पाठवून रयेतीचा मुदा लेहोन दिधला जे रयेतीचा मुदा समाजाकरणे लागले ढेप उगवणी घेउन तेजीपटी उलफेपटी सालमाा तकूब केली पाहिजे म्हणौन मुदा कमिने मामुरी-बदल मुदेप्रमाणे कौल पाठविले यावरी तेही सरखोत येसजी व मोकदम पारवडी व मोकदम मंडजाआसनी व मोकदम कुरंगवडी सदरहूजण भेटविले कमीने दिलासा करून बहु-डविले पेस्तर जे येतील ते लेहो म्हणून लिहिले तरी तुम्ही महालीचे कारकून आहा रयेतीचा दिलासा करुनु कौल देउनु मामुरी कीजे नुकसान हो ने दीजे. तेजीपटी उलफपटी झडतीसी उगवणी कीजे व ताा गुजनमावलीचे बाबे मोहबतखान व आ (ब) तुला कोके याचे कारकुनी आर्दास खाना केली आहे म्हणौन लिहिले तरी हुजरून पाा जालिया-वरी माकुल हाल असेल ते सरजामी होईल व ताा माा कमीने राहावे तरी जागा जागाचे काम खोलंबते म्हणोन तरी घाट तरफेस स्वारी करून जाउन तेथे सिस्त सनद दस्त आली पाहिजे म्हणौन लिहिले तरी तमाम सिस्त झाडा झडती करून तपसील खबर हुजूर लिहिणे मोर्तबसूद.

रुजु सुहानिवीस

तेरिख माहे रजब रुजु

ले.६२५ } { श. १५४५ मार्ग. शु. ५
इ. १६२३ नोव्हें. १६

श्री

नकल

सिदी आबर हावालदार किले कोढाणा

खरीदखत सके १५४५ मार्गस्वर शुध पचमी गुरुवार तदिनी लेहून दिल्हे जे भिकाजी बिन नाईकजी डिमला मौजे सिवर व मौजे कल्याण ताा खेडेबारे यासी तानजी बिन

कृष्णाजी डिमला मौजे कल्याण आत्मसुखे लेहून दिल्हे जे आपल्या वडिली सागितले म्हणून तुम्हासी मोकदमीबदल भाडिलो परतु आपल्यास मूलपुरविसी होत नाही आपन तुमचे बुडीचे नम्हे आपला वैश आगोदर कदमाकडील आहे परतु ते दिगुली ? कुडी येके आहो सबब आपली आजी गोडाई हिजपासून काही बाद आमल जाला होता ते समई राजकात मुल परागदा जाहली तो गजाहातून ? आपला बाप जाला त्याचे वौसीस आपण आपालियास वतन नाही आणि आपले कुलीसही बोल लागला वडिली सागितले ऐसे केले होते त्याजवरून भाडत होतो परतु ठाणियास खोटा जालो येविसी गुन्हेगारी आपणापासून घेतली या उपर तुमचे वतन खरे आपण खोटा जालो आपनास मुकदमीसी आर्थाआर्थी समध नाही हे आजित खत लेहून दिल्हे सही

कानजी नाईक देशमुख ताा मजकूर

बापूजी मुदगल देशकुलकर्णी ताा मजकूर

गोही

चिटोजी मोकदम मौजे राहाटड — रखमाजी मोकदम मौजे आर्वी — बाबाजी मोकदम मौजे राजे

मोकदम मौजे कुसगाऊ

रखम सुतार १ — खंड वरटा १

खंडनाक वृतीकार

ले. ६२६ } {श. १५५३ इ. १६३१-३२

श्री

आसल मोजब नकल

अज रख्तखाने राजश्री सिवाजी राजे दामदौलतहू बजानिबा कारकुनानी हाल व इस्तकबाल ताा खेडेबारे सुा इसने सलासीन अलफ दरीविले देशमुख तो मजकूर हुजूर येऊन मालूम केले जे आपला हक ताा मजकुरी गावगना चालत होता हाली साहेबी हुजूर हुकमी अमानत करून खड मख्ता करार केला या बरहुकूम घेऊन आसावे म्हणोन हुकूम हूकमाबरहुकूम चालिलो पेस्तर या बरहुकूम राहावे तो गुदरानी होईना सुदामत चालिल्याबरहुकूम जमीदार मजकुरावरी नजर देऊन दरीबाबा नजर ऐनायेत फर्माऊन दुमाले करावया हुकूम होये बिनाबरा इलतमेसी खातिरेसी आणून देशमुख ताा मजकूर यासी गावगना हाकदार करार करून दिल्हा बिताा

नख्त दर सदे रु ३ — गला कैली दर सदे ८=

येकूण शा तीन व गला दोन मण हार जिनस सालाबाद तसरुफात चालिली आसिली तेणेप्रमाणे दुमाले करणे दरम्याने तसरुफा तुटालियाचा उजूर न करणे सदरहू दर हरसाल-ताजिया खुर्दखताचा उजूर न करणे तालीक लेहोन घेऊन आसली खुर्दखत जमीदार मजकुरापासी फिरोन देणे सदरहूप्रमाणे हाक दुमाले करणे मोर्तबसुद (मोर्तब आसल पत्री आहे)

रुजू सुरुनवीस

ले. ६२७ } { श. १५६९ पौष व. ७
इ. १६४८ जाने ६

आसल बरहुकम नकल

आज रख्तखाने राजश्री सिवाजी राजे दामदौलतहू बज्यानेब हुजूर कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमुखानी व देशकुलकर्णियानी ताा खेडेबारे बिदानद सुा सन समान आरबा (इ) न आलफ दरीविले भिकाजी बिन सूर्याजी डिमले मो मौजे सिवरे व मौजे क(ल्याण) सेकिन ताा मजकूर हुजूर येऊन मालूम केले जे आपणास मोकदमीचे इनाम जमीन बिघे १२ बारा दर सवाद मौजे कल्याण ताा मजकूर देखील नाख्तियापटी व बाजे बाब व पायपोसीपटिया हाल व पेस्तर व महसूल कुलबाब व कुलकानू सालाबाद व या खेरीज ताा माारी गावगना हाक दर सवाद मौजे माारास नख्त शा १ एक व गला बारावा मण १ येक येणेप्रो वरहुकुम खुरदखत माहाराज साहेब चालिले दरम्यान आपण परागंदा होऊन गेलो होतो या करिता हाक चालिला नाही व इनामतीचे सेत नाकीर्द पडीत होते याबदल आपण हुजूर जाऊन माहाराज साहेबाचे खुर्दखत आणिले आहे सदरहू इनामकीचे सेत हाली साल माराकारणे किर्दा जाल्या आहे माहाली कारकून ताजिया खुर्द-खताचा उजूर कारिताती दरीबाब नजर ऐनायत फरमाऊन दुमाले करावयास हुकूम होये बिना बरा इल्तमेसी खातिरेस आणून भिकाजी बिन सूर्याजी डिमला मो सेकिन मौजे माार यास इनाम जमीन बिघे १२ बारा दर सवाद मौजे कल्याण व तरफ माारी गावगना हाक दर सवाद शा १ यक गला कैली बरोल मण ८१ यक ताा माारी सालाबाद तसरुफती चालिली आसल तेणे प्रो दुमाल करण दरमियान परागदा जाला म्हणौन तसरुफाती तुटालियाचा उजूर न करणे दरसाल ताजिया खुर्दखताचा उजूर न करणे तालीक लेहून घेऊन आसली खुर्द-खत इनामदार मारापासी फिराऊन देणे सदरहु हाक व इनाम सारा दुमाल करण उजूर न करणे मोर्तब

रुजू सुरुनीस

तेरीख २० माहे जिल्हेज सुरु सुद
जिल्हेज

ले. ६२८ } {श. १५९५ पौष शु. ९
इ. १६७६ जाने. ६

श्री

मशहुरल हजरत राजश्री माहादाजी सामराज सुभेदार व कारकून सुभात प्रा मावले प्रती राजश्री सिवाजी राजे दडवत सुा आबा सबईन अलफ सूर्याजी बिन भिकाजी (अ) + + + पाटील मोकदम मौजे सिवरे ता खेडेबारे हे हुजूर येऊन अर्ज केला बाजी जाधव की ता मजकुरी अपला सरपाटिलकीचा ह [क] पुरातन आहे त्यास निरतर चिमणाजी बापूजी × × ले व पाटिलकीचा हक्क चालिला नाही त्यावरून हे हुजूर येऊन अर्ज केला साहेबी मेहरबान होऊन व सेरीकरावर नजर देऊन सरपाटिलकीचा हक याजबदल माहराजानी आपले खुर्दखत देऊन पुरातन हक आहे चालवायास आज्ञा केली त्यास ता मजकुरी दरगावास येणेप्रमाण विता

खुर्दा टके	गला कैली	तूप	कोबडे
१	८१	८८१	१

येणेप्रमाणे सरपाटिलकीचा हक ता मजकुरी आहे तो सुदामत पावे ते गोष्ट करणे जाणिजे छ ७ सवाले (ष) मोर्तब†

सुद

ले. ६२९ } {श. १६६२ मार्ग. व १३
इ. १७४० डिसें. ५

श्री

सौ श्री मोकदम देहाये ता खेडेबारे यांसी देशमुख व देशपाडे ता मजकूर सुहूर सन इहिदे बिंन मया अलफ मल्हारजी बिन सूर्याजी पाटिल डिमले मोकदम मौजे सिवरे व सरपाटील ता मजकूर यांचा सरपाटिलकीचा हक गांवगना दर गावास खुर्दा टका १ तूप मापी ८८१ येक सेर व गला ८१ येक मण व कोबडे १ येक येणेप्रमाणे आहे तो गावगना वसूल ज्याचा त्याणी घ्यावा येविसी राजश्री पंत सचीव यांची आज्ञापत्रे सादर आहेत तरी सदरहूप्रमाणे हक वसूल देणे गावगना बा

१मौजे कल्याण	१ मौजे कोढणपूर	१ मौजे राहाटवडे	१ मौजे रांजे:
१ मौजे आरवी	१ मौजे गाउडदरे	१ मौजे ससेवाडी	१ मौजे सिदेवाडी
१ मौजे गोगलवाडी	१ मौजे वेळू	१ मौजे कासुर्डी	१ मौजे बरवे सोंडकर
१ मौजे बरवे भोर्डा	१ मौजे कुसगांव	१ मौजे खोपी	१ मौजे कांजले
१ को खेड	१ मौजे सिवरे	१ मौजे साळवडे	—
			१९

† पत्र शिवकालीन असून अक्षर पेशवाईच्या मध्यकाळास जुळणारें आहे.

येकूण येकूणीस गावांचा हक दर गावास सदरहू + + णे देणे छ २६ रमजान
(बा) मोर्तब (अ) मोर्तब
सुद सुद

पोढोढि-पाटील.

ले. ६३० } { श.१५५३ चैत्र शु. १
इ. १६३१ मार्च २३

न. बा आसल
देसमुख व गोत किले फतेमंगल किले मजकूर बिदस्तूर बिसाजी रगनाथ देसकुलकरणी किले मजकूर

येसा बिन बालाजी
येमाजी मोकदम मौजे कलस
येस पा मोकदम मौजे + + फल गडे
बहारजी मोकदम मौजे सेलगाऊ

बाबाजी बिन मगाजी
जाखोजी मोकदम मौजे आकोल
रामाजी मोकदम मौजे पळसदेऊ
सभाजी व यमाजी मोकदम मौजे निरगडे
मालजी व बहिरजी मो मौजे लाकडी
जानोजी व बाबाजी मोकदम मौजे काझड

किले मजकूर सुा इहिदे सलासीन आलफ श्री सके १५५३ . प्रजापतिनाम सवछरे चैत्र सुध प्रतिपदा ते दिवसी महजर जाला यैसाजे राघोजी पा आटोळे यासि संत पाटिल बिन बिमनाक मोकदम मौजे पोढोडि किले मजकूर लेहून दिल्हा यैसे जे आपण उपावासी मरू लागलो भोई पडलो बहुत बेहाल जाला याकारितां मौजे मजकुरीची मोकदमी सारी काली व पाढरी तुम्हास विकत दिधली किा होन ६'५ पासस्टा धारण करून तुम्ही आम्हास पैके दिधले आपण तुम्हास मौजे मजकूरची मोकदमी सारी काली व पाढरी कुलबाब हाकलाजिमा व मान मानणुक तमाम मोकदमी तुम्हास लेकराचे लेकरी मिरासी करून दिधली आहे तुम्ही सुखे खाऊन आसणे आजपासून मौजे मजकूरचे मोकदमीस व आपणास काही समध नाही तुमची मोकदमी तुम्ही लेकराचे लेकरी खा [ऊ]न सुखे आसिजे यासि कोन्ही आपला बाप भाऊबंद जे गोत्रीज कोन्ही उभा राहील त्यास आपण निवारून हा महजर सही

ले. ६३१ } {श. १५५७ भाद्र. शु. १२
इ. ३१६३५ सप्टें. १३

स्वस्तिश्री शके१५५७निवादपत्र वरसे ईश्वनाम सवत्सरे भाद्रपद सुद द्वादसी आदितवार ते दिनी आखंडितलक्षुमीप्रसन्न देवब्राह्मणप्रतिपालक माहामेरू राजेश्री माहादो पंडित देश-कुलकर्णी तपे बालवे गोसावी यांसी आश्रीत ब्राह्मणसभा विडभट जोतीसी ताा जनार्दन भट तालालभट आद्यापक ताा विस्वनाथभट तो मंगलवेडे ताा शंकराजीपंत मजमदार ताा कपिलाजी मुतालीक कुलकर्णी समस्त ब्राह्मणसभा को भिलोडी अनेक आशीर्वाद व नमस्कार विनंति उपरी गोसावी यानी पत्र पाठविले आंतकरणासी आले तेथे मजकूर जे उपाधे नरसिंह भट ताा संभुभट या क्षेत्रासी पाठविले जे विस्वनाथभट कसबे मजकूर त्यासी व या उभा येतासी कसबे सोरटीचे जोतीसी व उपाधीकविसी यासि बेव्हार आसे तर विस्वनाथ भट गोसी भटचे पुत्र म्हणतातो येसे मनास आणून धर्मता लेहून पाठविजे म्हणऊन लिहिले तरी विस्वनाथ भटासी बोलाऊन उत्तर फक्त केले त्यानी आपणापासी एक पत्र होते को कुर्दवडे क्षेत्री ब्राह्मण सभेने निर्णयो केला आसे ते पत्र आणून दाखविले त्यामधे लिहिले आसे जे विस्वनाथभट बिन गोसीभट म्हणऊन पत्र आसे यासि नरसिहभट बिन कालभभट व सुरेभट बिन रामेश्वरभटी लेहून दिल्हे आसे जे आपणासीं विस्वनाथ भटाचे गोत्र पुरुस व डाईज येसे स्थल जाहाले जे मौजे सिरटी व मौजे हासूर हे दोहीं गावचे जोतिषी व उपाधीक व आस्ट आधिकार चालऊ तुमचे अर्धे वाटेचे प्रातिवरसी प्रताप देऊ उक्ता देत जाऊं आमचे तकसीम आम्ही आचाल म्हणऊन पत्र लेहून दिले आसे येसे

बोरी-पाटील

ले. ६३२ } {श. १५६१ श्रावण व. ५
इ. १६३९ आगष्ट ८

महजर बतेरीख छ १६ रबिलोबल हाजीर मज्यालसी पाा इदापूर

देशमुख प्राा मार मगाजी ! येमाजी	गोदजी मोकदम मौजे से-लगाऊ	मालजी मोक दाम मौजे ला-कडी
लिंगोजी मोकदम मौ जे जाबू	जाखोजी व सिदोजी मो	चौंडाजी व लिंगोजी मो-कदम मौजे

मौजे चिखली कुरबावीकर
दाहिगाव
खंडोजी मो
मौजे वरकुटे

श्री सके १५६१ विक्रम नाम संवछरे श्रावण वादि पंचमी ते दिवसी महजर जाला ऐसा जे मौजे बोरी कुल खराब पडिली होती याजवरी कारकिर्दी राजश्री खेलोजी भोसले विलाइतीच्या मोकदमी घेत होते मौजे बोरीची मोकदमी राजश्री खेलोजी भोसले मागत होते याजवरी देशमुखानी व कुलकर्णियानी बिरोजी मोकदम मौजे लासुरणे व बोरीचे मोकदम बापभाऊ म्हणौनू बोलिले त्याजवरी खेलोजी राजे घोडी मागतातीं ती देऊन मोकदमी सोडवणे मोकदमी तुज दिधली तुवा करणे याजवरी मिरासीदार मोकदम उभा राहिला आणि दंददावा करूं लागले बिरोजीने लावणी केली होती गावीचा रोझामोझा पडिला व गांव खराव पडला याजवरी मिर्जा यासी मोकासा जाला त्यानीं बोरीची लावणी बदल धावणी करून गांव मारून चिंधीचोला केला गुरेढोरे नेता हर दो जणामध्ये कवावत जाली दिवाणचे लोक जखमी जाली घोडा येक पडला बिरोजी गांव खराब करून बाहेर पडला याजवरी सदरहू मज्यालसे मिलोन मिर्जा साहेबास घोडा येक व होन १० देऊन समजावीस करून कौल देविला सदरहू कचाट बोरीचे मोकदमीबदल जाले याजबदल सदरहु गोत मजालसी मिलोन निवाडा केला की मिरासी मोकदम तोडू नये व बिरोजीचा माल वेचक आहे मोकदमी राखिली आहे त्यास तोही तोडिता नये मग हर दो जणासी मोकदमी काली व पाढरी दोघानी दोठाई खाऊन सुखे असणे लेकराचे लेकरी मिरासी करून दिली आहे निमे गाव येलोजी व जबाजी वागमोडे याचा व निमे मउ बिरोजी पाव दिवाणातलि तश्रफि येईल ते दो ठाई दोघानी घ्यावी वाटून व नागर आधी येलदोजी व जबाजी व मागे बिरोजी येणेप्राा हकलाजिमे मोकदमी काली व पांढरी दोठाई खाणे सदरहुप्राा निवाडा जाहाला असे जो कोण्ही हिला हरकती करील तो दिवाणचा गुन्हेगार व गोताचा अन्याई हा महजर लिहिला सही

———

राहाटवडे–चोरघे

ले. ६३३ } { श. १५६० मार्ग. शु. ७
इ. १६३८ डिसें. २

श्री

नकला

अज रख्तखाने राजश्री सिवाजी राजे दामदौलतहू जानीब कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमुखानी व देकुलकर्णियानी ताा खेडेबारे बिदानद के सुहूर सन तिसा सलासीन अलफ दारीविले चिठोजी बिन रामजी चोरघा मोकदम मोजे राहाटवडे ताा मजकूर

हुजर येऊन मालूम केले जे मौजे मजकूरचा मोकदमी वाडिलपण आपले असतां आपला रबिराजर भाऊ कान्होजी बिन सिवजी चोरघा हा धाकटा असोन पोटी संतान नाही अणी मफलीस पोटाकारणे दिवाणचे कर्ज होन पंचवीस खादले आहेत ते द्यावयास मवसर नाही म्हणोन बळेंच राजश्री दादाजीपंत याजपासी फिर्याद केली जे मौजे मजकुरी आपला मोकदमीचा वाटा आहे तो दिवाणांत ठेऊन कर्ज वारून घेणे ऐसा करार केला असता कान्होजी मजकूर याचे निसबतीचे कर्ज वारावयास आपण हजीर जालो ऐसे असोन बळंच पंतसाहेबी इनामांत विहीर बांधोन मोकदमीचे इनाम वाहिले त्यावरी आपण गाव टाकून परागंदा होऊन गेलों ये बाबे राजश्री बापूजी मुद्गल देशकुलकर्णी ता॥ मजकूर यांनी राजश्री पंतसाहेब पासी अर्ज करून आपणास कौल देऊन गावावरी आणिले दिवाणचे कर्ज कान्होजी मजकूर याचे निसबतीचे होते ते आपणाकडून वारविले मोकदमीचा भोगवटा तों सालाबाद चालिला आहे दरम्याने दहशतीकरितां परागंदा जालों होतों म्हणऊन माहाली कारकून ताजिया खुर्दखताचा उजूर करितात दरीबाब नजर इनायत फर्माऊन दुमाले करावयास हुकूम होये बिनाबरा इलतमेसी खातिरेस अणोन चिटोजी बिन रामजी चोरघा मोकदम मौजे मजकूर सालाबाद मोकदमीचा भोगवटा वडिलपण चालिले असेल तेणेप्रणाणें दुमाला करणे दरम्याने तसरुफाती तुटालियाचा उजूर न करणे देखील मोकदमी इनाम सेतसारा दुमाला करणे तालीक लेहोन घेऊन असल खुर्दखत मोकदम मजकुरापासी फिराऊन देणे उजूर न करणे मोर्तब सुद

रुजू सुरु
निवीस

तेरखि ६ माहे शाबान
शाबान सुरु सुद

शके १५६० सा॥ तिसा सलासीन आलफ बहुधान्य नाम सवसरे १

ले. ६३४ } { श.
इ.

श्री

+ + तावजी पा॥ आपले मूळ पुरुष कान्होजी चोरघा मौजे वागणी येथून दोघे लेक व आपण मौजे राहाटेड सोयेऱ्याच्या गावी निघोन आले त्याचे लेक थोर होते त्याची नाव हरजी व बालाजी तिघेजण निघोन आले मौजे राहाटवडे येथे आल्यावर त्यास तिघे पुत्र जाले त्यातून वडील पुत्र सभाजी त्याच्या पाठीमागे तान्हाजी त्याचे पाठीमागे रामजी तो मौजे राहाटवडे येथील मोकदमाचा जावाई होता त्यावर काही दिवसानी माहादजी भणगा बेदरचे पत्र आले की मोकदमास घेऊन येणे म्हणोन पत्र आले ते वेळेस मोकदम भणगे पा॥ याने आपल्या भावाबदास सागितले जे सरकारात जाऊन जाबसाल करणे

---

१ याची दुसरी एक नकल आहे तिचे माथ्यावर 'सिका' असें लिहिलें आहे. तिजवर 'शके १५६०' वगैरे मजकूर नाही. हा गांव पुढे नाना फडणिसाचे खाजगीकडे होता.

तेव्हा गावानी उतर केले जे आम्ही जात नाही तेव्हा भणगे पाटील मोकदमाने आपला जावई रामजी चोरघा यास लेक म्हणोन पाठविला तेव्हा बेदरचे पातशाहाने रामजी पा चोरघा याच्या नावची [स] नद करून दिल्हे यावर भणग्याचे व चव्हाणाचे यैसे दोनी हिस आनभावीत चालत तेव्हा रामजीने आपला भाऊ कोण्ही चोरघा यास चव्हाणाचा हिसा च्यार दिवस खावयास दिल्हे त्यावर काही दिवसानी रामजीने आपला हिसा दिल्हे होता तो मागू लागला तेव्हा काणोजी चोरघा व भणगा व चवाण ऐसे मिलोन सिवाजी राजे याजपासी फिर्याद जाले जे आमचे वतन असता रामजी चोरघा आनभावितो म्हणोन विदित केले तेव्हा सिवाजी राजे यानी न्याये मनास आणू लागले तो दादाजी कोडदेव यानी रामजी चोरघा जिवे मारिला त्यावर काही दिवस मौजे राहटवड येथील वतन सरकारातून आनभावीत चालले आण तेथे विहीर व बाग सपाई केली नतर रामजी चोरघा याचा लेक चिठोजी सिवाजी राजे यापासी फिर्याद जाल जे माझे वतन नसतातुम्ही माझा बाप रामजी का मारिले ऐसे बोलो लागला तेव्हा सिवाजी राजे यानी न्याये मनास आणून विठूजी रामजीचा लेक याचे हवाली (अपूर्ण)

ले. ६३५ } (पाहिला भाग गहाळ) { श. १५७६ इ. १६५४

सुा खमस खमसैन अलफ कारणे महजर केला ऐसाजे मौजे राहटवडे ताा खेडेबारे येथील मोकदमाच्या तरफा दोन त्यामध्यें येक तरफ चिटोजी बिन रामजी चोरघा याची येक तरफ कान्होजी बिन सिवजी चोरघा याची हरदोजण चालवीत असता कान्होजी माार याचे तर्फेची लावणी होईना कान्होजी मजकुर कर्जदार जाला व दिवाणचेही लचा केले यामुले राजश्री दादाजी कोडदेव सुभेदार नामजाद किले कोढाणा याणी कान्होजी माार याची तर्फ दिवाणात घातली यामुले चिटोजी मजकूर परागंदा जाहाला होता येबाबे राजश्री बापूजी मुदगल देशकुलकर्णी याणी दिवाणात रदबदली करून चिटोजी मजकूर यासी कौल देऊन गावावरी आणिला कान्होजी माार याचे निसबतीचे दिवाणचे कर्ज वैगरे कर्ज चिटोजी माार याणे वारिले कान्होजी माार यासी द्यावयासी मवसर नाही म्हणून आपले निसबतीचा निम मोकदमीच्या तक्षिमा दोन पैकी येक तकसीम चिटोजी माार याचें दुमाला केली येक तक्षीम आपलियासी राहिली कान्जी माार याचे निसबतीचे भाऊबद याणी चिटोजी माार यासी कजिया करावयासि समध नाही चिटोजी बिन रामजी चोरघा याची तकसीम मौजे माारची निमे मोकदमी व कान्होजी माार याचे निमेपैकी तकसीमा येक येकूण तकसीमा तीन चिटोजी माार याणे खाव्या व कान्होजी माार याणे तकसी (म) येक चौथाई खावी वडीलपण नाव नागर होळीस पोळी दिवाणातून लुगडी येतील ती चिटोजीने घ्यावी हाकलाजिमा पान पोफळी जे येईल ते आथी चिटोजी माार याणे घ्यावे येणेप्रमाणे निवडले आसे कान्होजीचे निमे मोकदमीपैकी तकसीम येक चिटोजी माारास

दिधली आसे व येक तकसीम कान्होजी मार याणे खावी या खेरीज चिटोजीचे निसबतीची निमे मोकदमी चिटोजीने खावी येकूण तीन तकसिमा चिटोजी मजकूर याच्या व येक तकसीम कान्होजी मार यांची मोकदमीचे हक उतपन व पानमान व दिवाणची ताश्रिफा नाव नागर व होळीची पोली व टिला विडा चिटोजीने घ्यावा व किरकोल हकलाजिमा आधी चिटोजीने घ्यावा मागे कान्होजीने घ्यावे येणेप्रमाणे निवडले आसे हे जो कोणी मोडील तो दिवाणाचा गुन्हेगार गोताचा खोटा हा महजर सही

कोढीत-बडधे

ले. ६३६ } { श. १५६४ ज्येष्ठ व. १४
इ. १६४२ जून १६

श्री

बेहुजूर बेदरशाह हवालदार सिका असे तालीक

श्री शके १५६४ चित्रभानुनाम संवत्छरे जेष्ठ वद्य १४ ब्रहस्फवार ते दिनी सूर्याजी बिन दाद पाटील बडधे मोकदम निमे मौजे कोढीत कर्यात सासवड यासी सूर्याजी बिन माहाद पाटील जरडे मोकदम निमे व समस्त जरंडे मौजे मार सुा सलास आर्बैन आलफ कारणे लेहून दिल्हे यैसा जे तुम्ही व आपण मिळोन पेशजी गाउ संचणी उगवणी येकवटे करून दोघे सुखे होतो त्यावरी दरमेन दोघा वर्गास न पडेसे जाले मग गावीच्या तर्फा दोनी करून दोघानी वाटून घेऊन होतो तो तर्फा जालियावरी संचणी उगवणी नव्हेच जमीन काळी व बरड माळ वाटिता नयेच कुळडाळ येक येक तर्फेकडे अधिक उणे होऊ लागले यावरी आपण गाव टाकून परमुलकास गेलो यावरी तुम्हास साहेबाचा कौल देशमुखाचा कौल पाठविला तुम्ही मौजे नाझरे प्रा सुपे तेथे आलेस मग साहेब व देशमुख व आपण ऐसे मौजे नाझरे प्रा सुपेस आलो तुमची समजावीश केली तुम्ही व आपण दोघे ये [क] होऊन पेशजी तर्फा दोनी केल्या त्या दूर करून .....तुम्ही आम्ही येक होऊन गाऊ दोघे मिळून येकवर संचणी उगवणी करावी दोघी गंगाजळ होऊन आसावे पेशजी तर्फाचे कागदपत्र तुम्हापासी व आपणापासी आसतील तितुके कागद रदी असती येणे प्रो दोघे सुखे आसोन जरी काही हिला हरकती करू तरी साहेबाचे गुन्हेगार गोताचे अन्याई हे लिहिले सही मोर्तब आसे नागर आसे

गोही

बाजी तावजी देशमुख
का सासवड
सिका आसे
हिरोजी मापरा मोकदम
मौजे नाझरे प्रो सुपे

जानोजी बिन सोनाजी मोकदम
व सिताजी खळदकर व दाऊ माळी
मेहत्रा मौजे खळद बुा
सोनजी भाडळा जथे राहुजी
नाइकवाडी का सासवड

रतननाक तुकनाक जथे
नायकवाडी काा सासवड
बेल्होजी व येसोजी मेहेत्रे
काा सासवड
भिकनाक वृतीकर मौजे
कोढीत वुा

कोडाजी जथे महमद नाइक
वाडी काा सासवड
भिकाजी राजिवडा चौगुला
मौजे कोढीत

तेरीख २९ माहे रबिलावल.

खानापूर-कुलकर्णी.

ले. ६३७ }

{श. १५७३ माघ व. १२
इ. १६५२ जाने. २७

महाजर बतारिखे २५ माहे सफर हाजीर मज्यालासियानी मामले मुर्तजाबाद

काजी अबदुल कादीर हाकिम शरा
सियादत वा नीकाबत दस्तगाहा हसनशा हवालदार
सैद माहामूद बिन सैद खीद मीर होखारी
हैबतखान बजाहाती
सेख भिरा इमामखान मुतावली रोज हजरती
अली आगा बिन हसन केर मुतावली रोजे बेहतरीन
अनाम.....अलेहुम अलस कवत वासलाद

कारकुनानी वा हुदेदारानी

सभु महादेउ ठाणेदार
शकराजी जगनाथ मजमदार
सगो जनार्द न नार्जार वा निघावान
बडे मलिक अबदुल हुसेन दबीर
बाबजी तिर्मलराऊ सरनोबत
चदो बावजी हेजीब
रगोदास वरसद जाहाती माऊजी रामजी माहालनीस
तिमाजी बावा हरकार माहाल रातीब
रुकमाजी मसलत निघावान माहाल तबाकू
गिरमाजी नरसिहु सबनीस
गंगो सुरदेऊ निसिदा पोता स्वहस्त गागो सुरदे
धुमाजी नरसिहु निसीदा आबारखाना धुमाजी नरसिहु निा आबारखाना

तिमाजी नरसिहु-
निसीदा थटी को-
ठार इमारती बि
कलम तिमाजी.
नरसिहु

कृष्णाजी विठल
निसीदा जरातखाना
क्रिष्णो वि-
ठल निा जरात
खाना

खुर्द सालगानी वा सरगुरो वा
नाइकवाडियानी वा देसकानी

खुर्द सालगानी
सिदी आगा बिन अहमदजी
आली आगा
फारसी
सैद सिकदर
नाइकवाडियानी

सरगुरोयानी
रायाखान विन
आलबस
(खंजीर)

मीर अली कमाल
खान
पारसी शिक्का

हणमतराऊ
(कटयार)

नरस राऊत

देसकानी
तमाजी तिर्मल
बजाहाती अमीन

दादो विरदेऊ दे-
साई
(मराठी
शिक्का)

रग राऊत

सर्जाराऊ बिन तुको
जी नाईक
(फारशी
शिक्का)

खान हसनखान
(फारशी
शिक्का)

कासी कृष्णाजी
नाईक कासी पा

जाखोजी रविराऊ
(फारसी
शिक्का)

अदिनाईक कोमरो
जी देसाई
[नांगर]

सरदेसाई
बाबजी चौलराऊ
देसाई
[नांगर]

रगाजी नाईक
(फा. शि.)
नूरखान
पतक
यैसवतराऊ
(फारशी
शिक्का)

धुमाजी व विरोजी
नाईक (फारसी
शिक्का)

सोनजी नाईक
(फारशी
शिक्का)

ब्रह्माजी कोडा
देसाई

भैरो जखरस हx
xx वेकटाद्री वि-
ठल वा रगो नरह-
री देसकुलकर्णी

मिया नाईक
अली नाईक
दरिया नाईक
लाडले नाईक
लखमोजी नाईक
(फारशी
शिक्का)

पटेलानी व सेटी माहाजनानी कसबा

जखगौडा पटेल वा खंडेराऊ पटेल (नांगर)		वली बडोमिया सेटी	रामणा बिन तिमणा वा नर सणा बिन बस वण माहाजन
लखमगौडा चौग ला	रुद्रसेटी बिन पदमसेटी कोरडी कस (तागडी)	मगसेटी बिन लख मसेटी गाधी (तागडी)	बिकलमऊ नरसो बिन चौडो श्रीपत मेहतर सरोफानी
खलोजी बिन इसरो मेहतर तेली (लाट)	नरसो बिन सगो मेहतर तेली	दानलिग वा राचेपा वा देया मेहतर अहिनिगर वा दुरोदेगर	बिा नरसोबा मेहतर
सितो बि न बस्वा वा तु को बिन मोकदे ऊ माली मेहतर (खुरपे)	होनसेटी वा लख मसेटी वा जखणा मेहतर कुभार (चाक)	नरसु बिन सख ला मेहतर हटी· गार	देया बिन अज· णा मेहतर + + (धूपार्ति)

हेमुक्ष समस्त मामले मजकूर सुद्दरसन इसने खमसैन अलफ कारणे जाहला माहाजर ऐस जे जाखो निलकट वा साबाजी महादेऊ कुलकर्णी काा खानापूर वा मौजे पेडे वा मौजे मौहे वा मौजे कोलविरे वा मौजे सुलतानगादे वा बाजेखडे काा मजकूर हुजुरु येउनु मालूम केले जे आपुले कुलकर्णी वडील वडील तागायेत पिढी दर पिढी चालत आले असे दरीवख्त आपुले भाऊ तमाजी नरसीम्ह वा सटवाजी खडरस वा नरसो बालाजी वा जिवाजी बालाजी बिरादरानी यापासी कुलकर्णीचे तकसीम मागाब्या गेलो होतो त्यानी आपणसवे शिरजोरी करून तकसीम मागितलिया दिल्हे नाही मग अमचे बाप महादेऊ खिरदेऊ वा निलो विठल यानी मा ले मजकुराचे सदरेसी महालूम केलेवरी ठाणे मामले मजकुराचे किताबती वा मिसाल काा खानापुराचे वा मौजे पेडेचे कारकुनासी वा हुदेदारासी वा मोकदमासी घेऊन गेलेवरी तेथील मशरुलअनाम निबाजी दत्ताजी पडीत नामजात काा भिलोडी वा देहाये वा कारकुनानी वा पटेलानी वा शेटी महाजनानी काा खानापूर यानी तपे वालवेचे स्थलासी जाखो निलकट वा बाबाजी महादेऊ वा तमाजी नरसीम्ह वा बिराजर सटवाजी खंडरसासी पाठविलेवरी तेथील तपे मजकुरीचे कारकुनानी वा पटेलानी वा देसकानी वा सेटीमहाजनानी वा समस्त लहान थोर बैसोन हरदो जणेचे तकरीर लिहून घेतले वा पिढी मूल पुरुश खातिरेसी आणऊन हर + + + न

सफा करून माहाजर लिहून देऊन का॥ खानापुरासी पाठविलेवरी का॥ मजकुरीचे कारकुनानी वा पटेलानी वा सेटीमहाजनानी वा खोतानी वाडिहाये बैसोन तकसीमेचे विले करून कागद लिहून दिल्हे बा॥

कसबे खानापूर तकसीम	मौजे पेडे तकसीम तिसरे
तिसरी दोघानी वाटून खावे	दोघानी वाटून खावे
खेडेहाये	का॥ मामले मजकुरामधे बाजे-
मौजे मोहे १ मौजे कोलविरे १	कुलकर्णी २
मौजे सुलतानगादे १	तेलीचे १ बकालचे १
हे वरी दिलेप्रमाणे दोघानी चालवावे	हे दोघानी चालवावे.

येणेप्रमाणे तकसीम वा हक लवाजिमा वा इनायात वा ठिकणात वा बाजे हक तकसीम करून वाटून खावे येस लिहून दिल्हे असे याणेप्रमाणे माहाजर मामले मजकुराचे होवे म्हणऊनु इलतमास केले बराये मालुमाती खातिरेसी अणुउनु बा॥ माहजर तपे वालवे वा कसबे खानापूर वा का॥ इसापुराचे खातिरेसी अणुऊनु मामले मजकुराचे कारकुनानी वा सरगुरो वा नाइक-वाडियानी वा देसकानी वा सेटीमाहाजनानी समस्त मिलोऊनु माहजर लिहून दिल्हे असे त्याणेप्रमाणे तकसीम खाउनु खेडेहाये चालऊन असावे यासी जो कोणी हिला हरकत करील तो दिवाणाचे गुन्हागार वा गोताचे आन्याई आणि कसबे मामले मजकुरामधे रोजे हजरतीचे वा + + + + वा दिवटियाचे चाकरीचे तकसीम तमाजी नरसिम्ह वा सटवाजी खडेरस मागो लागले म्हणे तरी हे चाकरीचे अमल असे + + ... + + + ...+ + खडरस वा नर + + + +

पेड–धनगर.

ले ६३८ } (फारशी मजकूर) { श. १५७५ पौष व. ८ इ. १६५४ जाने. १

बहाजीर मज्यालस

मौलाना माहामद हुसैनी दबीर जमारिकाब

मसुरूल हजरत रायाजी रो पाडित मजालसी

वराती.....दार

येमाजी नारायेण मजमुदार

हाल रातीब खासे शेरीफा

.....सैद मियाजी खवास जमा-रिकाब हवाले माहाल रातीब

रंगो तिमाजी निघावान माहाल रातीब खासे शेरिफा

जानो नागोजी जमारिकाब नामजाद माहाल रातीब

नारो बनाजी व
नागोजी नमगोजी दफ्तरदार
येल नाईक बिन नागोजी नाईक
.....नाइकवाडी माहाल रातीब

सखावतखान अलीशान मा-
हालदार जमारिकाब

जाहाला माहाजर ऐसा जे अज सुहुर सन अर्बा खमसैन व अलफ परवानगी हुजूर बतारीख २१ माहे सफर बमारिफत मजले शाहा सर परदेदार अवर्दे बावाजी हसन माहालदार जमारिकाब ठाणा पुरनूर माहमदापुर तेथून मौजे पेडचे पटेलासी व मौजे डोगर सोनीचे पटेलासी सियादत पन्हाः.....सरखेळ ममालिकाचेथे मुनसिफीसी हवाला करणे म्हणौन बमोजिब परवानगी माहालदार मशारनुलेने तुकोजी बिन हमराजी धणगर पटेल मौजे पेड मामले मूर्तजाबाद व केदारजी बिन रवलोजी झाबिरा पटेल डोगरसोनी पाा कागळ यासी घेऊन आला मग हरदोचे अहवाल खातिरेसी आणिता केदारजी झाबिरा डोगरसोनीकर बोलो लागला जे मौजे पेडेचे पटेलगी आपली म्हणौन व तुकोजी धणगर पटेल मौजे पेड याने बोलो लागला जे डोगरसोनकिारासी कधी इलाखा नव्हता आपण सात पिढी पटेलगी करीत येतो दरीवख्त झाबिरा यानी दुकाल खवासखानाचे मुदती तधी धरून गरगशा लाविला असे या वाबेचे माहाजर हक जवारीचे व काा नादरेचे असे व फर्मान हुमायून हक जवारीचे माहाजरवरून कारकीर्दी खाा याकुतखान सर्जा व खाा सिलेहदार खानचे मोकासा जाहालेवरी हजरती हुकमत वजीराने अहवाल खातिरेसी आणून फर्मान हुमायून करून दिले जे झाबिरेसी निसबत नाही सजा फर्माविले आहे म्हणऊन इतके होऊन ही हालखुद न राहाता मागुती गरगशा करू लागला मग हरदोसी तलब होऊन हुजूर आलो हजरत दिवाण साहेबी ठाणेमधे मुनसिफीसी हवाला करविले केदारजी झाबिरा डोगरसोनीकाराचे व आपुले उत्तर होऊन कतबे जाहाले असे जे मौजे पेडचे मिरासी ४ बिघा आणाजी नेम चौगला कुलकर्णी बालोजी खोत पदा बेगारी हे चौघाची नाऊ केदारजी झाबिरा घेऊन बोलिला की यानी जरी अपले पटेलगी म्हणौन बोलिलियाने आपणासी पेडेचे + + देवे यानी जरी नव्हे म्हणतलिया आपण + + खता व ख्यानतीचे तागायेतचे निघा करून म्हणौन व त्याणेप्रमाणे आपण ही राजी जाहालो की हे चौघानी तुकोजी धणगरचे पटेलगी म्हणतलिया आपण पटेल जरी नव्हे म्हणतलिया हारीके खता ख्यानगीचे तागाईतचे निघा करून म्हणौन त्यावरी सदरहु चौघासी ठाणे होऊन मिसाल तलबेचे जाहाली ते चौघेही हुजूर आले ते चौघेहि गोही गुदरिले ठाणेमधे

पदा बेगारी केला तकरीर
ऐसाजे मौजे पेडेचे पटेलगी
धणगर खरे धणगर व अम्ही
मिलोन गांऊ करीत येतो

आणाजी चौगला केला तकरीर
ऐसाजे मौजे माचे पटेलगी
धणगराचे अम्ही व ते मिळोन
पांच पिडी गांऊ करीत येतो

अपाजी कुलकर्णी मौजे पेड केला

बालोजी खोत केला तकरीर ऐसा

तकरीर ऐसा जे मौजे मजकुरीचे पटेलगी धणगराचे अम्ही व ते मिळोन पांच पिडी गांऊ करीत येतो

जे अमचे वडील बोल्त होते जे पेडेचे पटेलगी जाधवाचे म्हणौन व धणगर विणकार म्हणौन अमचे वडील बोल्त होते मज माझे बापाने सागितले जे जाधवाचे पटेलगी म्हणौन माझे बापासी माझे आजियानी सागितले

याणेप्रमाणे सदरहू लोकानी गोही गुदरिलेवरी ठाणेमधे गोहीदारासी व अपणासी व केदारजीसी अदबखाना ठेविले रोज १५ मग मोकासाइयानी मौजे मजकुरीचे उगवणी व संचणी सागोली जाहाले पाहिजे म्हणौन चौगलेसी व कुलकर्णीसी व पदा बेगारी सोडाऊन गावासी पाठविलेवरी मौजे डोगरसोनी व मौजे बोरगांऊचे मोकासाई खुर्दसालेयानी माहाल जामदारखाना यानी हजरत———चे बदगीसी फिर्यादी केले जे ठाणेमधे निवाडा होत नाही म्हणौन तेथून हर दोघे जणासी हजरत साहेबाचे हुकुमेने साहेबाचे दरबारासी आलो येहतमाम फर्मावावे म्हणौन त्यावरी हजरत साहेबाचे हुकुम बाा सरखेल ममालिक व मजालसियानी व सभानाईक बैसोन हरदोचे तकरीर मनासी आणिता हरदोने तकरीर केले बितपसील

केदारजी झाबिरा पटेल डोगर सोनी तकरीर केले ऐसा जे सदरहू गोहीदार गावीचेवरी राजी होऊन कतबे दिले होते ते हकीकत गोहीदारासी साहेबी हुजूर आणौन गोही मनासी आणावे तेचे गोहीदारानी माझे पटेलगी म्हणतलियानी अपण खरा पटेलगीचे सदरहू लोकानी तुकोजी धणगराचे पटेलगी म्हणौन बोलिलिया अपणासी पटेलगीस निसबत नाही

तुकोजी धणगर पटेल मौजे पेड तकरीर केला ऐसाजे सदरहू गोहीदार गावीचे वरी राजी होऊन कतबे दिले होते तहकीक सदरहू गोही गुदरलेवरी यामधे ३ जण बिाा अणाजी चौगला अपाजी कुलकर्णी पदा माहार अपणासी अदबखानात राखिले गांवीचे उगवणी संचणी होवे म्हणौन रजा देवाऊन पाठविलो त्यावरी साहेबाचे हुकूम जाहाले जे त्यासी अणवणे म्हणौन साहेबाचे हुकमेसी येतील हुजूर आलेवरी ते ही माझे पटेलगी म्हणतलिया अपण खरा जरी

केदारजी झाबिरा डोगरसोनीकाराचे
पटेलगी म्हणौन बोलिलेया अपणासी
पटेलगीस निसबत नाही

ऐसे दोघाचे तकरीर जाहालेवरी सरखेल महालीक हुकूम फर्माऊन गोहींदारासी तलबेने मौजे मजकूर होऊन आणविले ते हुजूर आले मग सरखेल महालीक व मजालसियानी बैसोन मग तुकोजी धणगर पटेल मौजे पेड व केदारजी झाबिरा पटेल डोगरसोनीकारासी कोतवालखानेमधून काहाडून आणविलेवरी त्या हुजूर हे तिघाचे तकरीर जाहाले बितपसील

आणाजी चौगला केला तकरीर
ऐसाजे मौजे मजकुरीचे पटेल
धणगराचे अमहीं ते मिळोन
पाच पिडी गांऊ करीत येतो
अपाजी कुलकर्णी मौजे मजकूर
केला तकरीर ऐसाजे मौजे मजकुरीचे
पटेलगी धणगर व अमही मिलोन
पांच पिढी गांऊ करीत येतो

पाला बेगारी बिरादर पदा केला
तकरीर ऐसाजे मौजे पेडचे
पटेलगी धणगराचे खरे धणगर
व अमही मिळोन पांच पिडी गांऊ
करीत येतो

येणेप्रमाणे सदरहू लोकाचे गोही गुदरले त्यावरी केदारजी झाबिरा डोगरसोनीकार बोलिला की यानी धणगराचे धाशतीने धणगरसारिखे बोलिले पदा बेगारी तो होवा म्हणौन सदरहू तिघानी बोलिले जे पदा बेगारी मलूलने अडला होता व साहेबाचे हुकूम गावासी आले तेचे बिरादर निमे तकसमिचे धणी पालासी घेऊन आलों अमही साहेवाचे बदगीसी तकरीर होऊन दिलें असो यासी तकरीर जाहालिया दिवाणाचे गुन्हेगार असो म्हणौन मागुती केदारी बोलिला की ठाणेमधें अपणासी व तुकोजीसी व गोहींदारासी ठाणेमधे अदबखाना ठेविले तेथे पदाबेगारी बोलिला असे जे धणवर मारतील धाशतीने त्यासारिखे बोलिलो पेडचे पटेलगी महराटे झाबिरे डोगरसोनीकाराचें खरे म्हणौन या गोस्टी अदबखानामधील लोक गोहीदार असे हे जरी खरे जाहालेयानी अण खरे नाही तरी खोटा म्हणौन त्यावरी तुकोजी धणगर पटेलासी सभानाइकाने पुसिले जे तो तरि यैसे बोलत असे तुवा यासी काय म्हणतोस म्हणौन मग तुकोजी पटेल या गोस्टीसी कबूल असो हक असेल ते होईल म्हणौन मग दोघाचे राजीपणे नेम उतरचे कतबे जाहाले बिा

केदारजी बिन रवलवजी
झाबिरा डोगरसोनी कतबा
दिला जे पदा बेगारी मौजे
पेड यानी अदबखानाचे
लोकाहुजूर बितपसील
हाजीभाई बंदीवाला बोम नाईक बंदीवाला

तुकोजी बिन हमरोजी धणगर
पटेल मौजे पेड कतबा
दिला जे पदा बेगारी याने
अदबखाने लोकाहुजूर बितपशील
हाजीभाई बंदी वाला बोम नाईक बंदीवाला
बसव नाईक दिवटे देवणा काबाडी

बसव नाईक देवणा काबाडी
दिवटे मुला
जखणा टाकली
याहुजूर बोलिला जे पेडचे
पटेलगी झाबिरा डोगरसोनीकार
महराटेचे खरे
अपणासी धणगर मारतील
ते धाशतीने त्यासारिखे बोलिलो

मुला जखणा टाकली
याहुजूर बेगारी मा झाबिरे
डोगरसोनीकार पटेलगी
म्हणौन बोलिले असलिया
अपणासी पटेलगी निसबत
नाही

म्हणौन त्या गोस्टीस सदरहू लोक सदरहू दोघाचे कतबेवरून खा नेमतखान हवालदारपासी सखावतखान माहालदार जमारिकाबसी पाठविलें वरी सदरहू ६ जण बंदखानाचे लोकासी खान मशारनुलेने माहालदार हुजूर बोलाऊन पाठऊन खबर घेता सदरहू बदीखानाचे लोकी तकरीर केले जे पदा बेगारी व पेड अपणाहुजूर कांहीं बोलिला नाही जरी आइकिले असोन पन्हाम करीत असोन तरी दिवाणीचे गुन्होगार म्हणौन तेचे तकरीर घेऊन माहालदार मा आला त्यावरी केदारजी झाबिरा डोगरसोनी व तुकोजी पटेल पेड यासी कोतवालखान्याचे अदबखानेतून आणून केदारजी झाबिरा डोगरसोनीकारासी सभा नाइकाने पुसिले जे तुवा जे नेम उतरचे कतबे दिला होतासी अदबखानेचे लोक तुवा कतबा दिले बरहुकूम आइकिले नाही अपण कांहीं जाणत नाही ऐसे बोलिले तुवा खोटा तुजे कतबेबरहुकूम जाहालासी व सरखेल महालांक व मजालसियानी व सभानाइकानी केदारजी झाबिरा डोगरसोनीकार पेडचे पटेलगीचे गरगाशा लाविला होता तेसी वम्हार खोटा केला तवा लाइनी अर्जी तागाईत खता व ख्यानती केलासी इतुकेचे निघा झाबिराने करावे पटेलगीस तुज व तुझे देखील वारिसासी आयेआर्थ समध नाही तुकोजी बिन हमरोजी धणगर पटेल मौजे पेडचे सही जाहाला व पेसजीचे हक जवाराचे महाजरवरून फर्मान हुमायून वरून ठाणेचे मिसेलीवरून व गावी गोहीदारवरून व हाली सरखेल ममालिकाचे मुनासिफीवरून मौजे पेडचे पटेल तुकोजी बिन हमरोजी धणगर पटेल सही

ले. ६३९ } { श १५७९ मार्ग. व. १३
इ.१६५७ दिसें. २३

कांदाट-मोरे

श्री.

नकलेची नकल

महजर बतारीख छ माहे रबिलावल मोकदम स्थळ कसबे ब्रामणोली तो कांदाट-खोरे व देहे तो तांबी सुा समान खमसैन अलफ बेहुजूर हजर मजालस.

देवस्थान.

१ श्री वागजाई तो ताबी संमत सोलसे.
१ श्री वागजाई मौजे मोर्णा तो कांदाट खोरे; मोर्तब असे.
२

१ श्री मल्लकार्जुन मौजे परवत तो कांदाटखोरे
१ श्री बहिरबदेव तर्फ कसबे बामणोली.
२

सुभा जावली

१ राजश्री गोरखोजी दिनकरराव काकडे सुभेदार मोर्तब असे.
१ राजश्री विसाजी नागनाथ नामजाद सुभेदार मोर्तब असे.
१ आपाजी महाजन कसबे जावली निा तागडी असे.
३

१ परसोजी आरवा रा सुभा निा कठार असे.
१ गणसेट सेट्या निा तागडी असे.
१ बापोजी सोनार को जावली निा हातवडा असे.
३
६

कारकुनसमस्त—बामणोली.

१ अंताजी सिधनाथ हवालदार; मोर्तब असे.
१ शंकराजी नागनाथ मुजुमदार.

किले वासोटे.

किले सातारा.

१ मलोजी बिन रवलोजी गाडवे देसाई निा नांगर असे.
१ पिलाजी बिन मलोजी देसाई किले मजकूर.

तर्फे बामणोलीचे गांवदेशक.

१ अनाजी रंगनाथ हवालदार सरदेशमुख मोर्तब असे.
१ विसोदेव कुलकर्णी व मलाहरपंत मुा तालीक का मा
१ चांगोजी बिन जावजी बामणे मोकदम को बामणोली.
३

१ वालाजी अंबाजी अंगोडे देसाई मोर्तब असे.
१ दादजी कोडबा कुलकर्णी कसबे बामणोली
१ गोंदजी नाइकजी जांमला निा नांगर असे.
३
६

१ सोनसेट बाळसेट सेट्या निा असे.
१ बाबाजी रिकामा मोकदम मौजे गाढवली निा नांगर असे.
१ मालजी बिन होनाजी कदम मौजे

१ कोंडाजी बिन पाकोजी कदम मौजे सावरी निा नांगर
१ सोनाजी जांबला मो वाडी सोनाडी को बामणोली.

तेटली निा नांगर असे,
१ दादजी अंधारा मौजे आंधारी निा नांगर असे. ४

१ सोनाजी फळणा मोकाा मौजे सेमडी निा असे. ७

मार्ग आकलपे.

१ कडत सेटी बिन सेटिया.
१ कानोजी डाग्या.

देशक तर्फे तांबी.

कृष्णाजी व रत्नोजी व बालाजी व हरजी भातोसे व हिरोजी येसजी मोकदम मौजे आकलपे निा असे. हिरोजी व बाबाजी मोकादम मौजे पिंपरी निा नांगर असे. हारजी व कानोजी गोगावले मोजे दरे निा

मुकाशियाणी.

१ हिरोजी बिन कृष्णाजी अहिरा रा मौजे म्हावसी निा सिके कठार असे.
१ राजजी बिन रामजी गोगावला मजरेवाडी पावसे को बामणोली निा कठार असे.
१ बाबाजी बिन राघोजी मोकदम मजरे वाडी मेटे महाल कसबे बामणोली निा कठार असे
१ जावजी बिन येसजी अंधारा मुकासी मौजे अधारी निा कठार असे. ४

मौजे आहिर

१ कृष्णाजी बिन सोनजी अहिरे निा कठार असे.
१ तानाजी मालजी अहिरे निा कठार असे.
१ दादजी बिन सूर्याजी निा कठार असे. २
१ राजजी बिन कान्होजी अहिरा निा कठार असे. २ ४

मौजे फळणी भेटकरि

१ संभाजी फळणा. १ येलोजी फळणा. १ कुंधाजी फळणा. १ सोमाजी फळणा. ४

मौजे कास.

१ नाइकजी किर्दत नाईक.
१ कृष्णाजी बिन सोनाजी किर्दत नाईक

मौजे माथा वलवण.

बाबाजी बिन धारोजी नाईक उचाटकर निा कठार असे.
१ अंतोजी बिन गोंदजी नाईक उचाटकर.

मौजे कोलघर

१ रागोजी बिन जावजी जांबला निा कठार असे.

१ अबाजी बिन सोनजी जावला निा कठार असे.

तर्फ कांदाटखोरे.

चलेसरी मौजे परवत. १ माललिंग जंगम चकदेव. १ विरलिंग बिन हारलिंग जंगम.

१ लिंगापा बिन माललिंग जंगम. १ कोंडलिंग बिन बाळलिंग जंगम.

थलसरी मौजे मोरणी.

१ बालोजी बिन राजकोजी सिंदे.

१ तानाजी बिन राजजी सिंदे.

मोकासियाणी कांदाटखोरे.

१ सूर्याजी बिन हबाजीराव मुकासी कांदट खोरे मोर्तब असे.

१ हिरोजी बिन सोनजीराव मौजे सिंदी.

१ अंदोजी बिन अंतोजीराव मौजे सिंदी.

३

१ लखमोजी हिरोजीराव.

१ हिरोजी बिन सोनजीराव रवदीवाडी. महालुंगे.

१ विठोजी बिन तानाजीराव सिंदकर.

३

६

मोकादमानी कांदाटखोरे.

१ नागोजी बिन कानोजी मोकदम मौजे निवळी निा नांगर असे.

१ सोनजी बिन कुमाजी मोकदम मौजे लामज निा नांगर असे.

१ गोंदजी बिन नागोजी हिरड्या मोकदम मौजे लामज निा असे.

१ चंद्रोजी बिन पाकोजी पास्ती मोकदम मौजे महालुंगे

१ हरजी बिन बाबाजी उतेकर मोकदम मोा रवदी निा नांगर.

